वैरवरीसी ॥ इच्छवरमागमीप्रसन्नतुजसी ॥ दुर्वासमहंता ॥ १२० ॥ स्वामीह्मणेगाअगस्तिमुनी
॥ ऐसाप्रसन्नझालासूळपाणी ॥ दुर्वासलज्जावंतझालामनीं ॥ मगपाहेअधोदृष्टीं ॥ २१ ॥ मगतो
सोडूनियांअवगुणां ॥ दुर्वासप्रवर्तलाशिवस्तवना ॥ ह्मणेजयजयाजीत्रिनयना ॥ मीअन्यायीथोर ॥
॥ २२ ॥ दग्धोमाझेंजीविलअवगुणाचें ॥ वृथाहेंमाझेंशरीरक्रोधाचें ॥ आतांतुमच्यादर्शनेंगुणाचें ॥
झालेंतत्काळ ॥ २३ ॥ मगशिवासिप्रार्थीऋषीश्वर ॥ म्यांजेंलिंगस्थापिलेंशंकर ॥ त्यासिप्राप्तकीं
जेऐसावर ॥ कामेश्वरलिंगतें ॥ २४ ॥ त्र्यंबकामीअनाथदीन ॥ माझाऐसाचिस्वभावक्रोधीगुण ॥
माझासंसारींनिष्फळअपमान ॥ होतसेजेथेंतेथें ॥ १२५ ॥ स्वामीह्मणेगाऋषिअगस्ती ॥ दुर्वासें
शिवाचीकेलीस्तुती ॥ तेंश्रवणकरूंगातुजप्रती ॥ मित्रावरुणासुता ॥ २६ ॥ शिवामीलोहतूंपरीस ॥
॥ तेणेंमीहोईनहिरण्यांश ॥ हातुमचियेभक्तीचाप्रकाश ॥ व्हावयामज ॥ २७ ॥ तुमच्याआश्रयेंझा
लोंसुवर्ण ॥ त्यावरीजडलेंतुमचेंनामरत्न ॥ तेंजन्मवरीमिरवीनभूषण ॥ माझियाहृदयीं ॥ २८ ॥
शिवामीमंदबुद्धिज्ञानभ्रष्ट ॥ जैसेत्याऔदुंबराचेफळांतीलकीट ॥ त्यासिनभासेजीव्योमकूट ॥
मंदमतिगुणें ॥ २९ ॥ शिवामीअष्टादशज्वरपावकु ॥ जराव्यथाव्याधिपीडेंभोगिकु ॥ परीतुझेंना-
मरसेंज्वरांकु ॥ पराभवीमहाव्यथा ॥ १३० ॥ शिवामीअमंगळजीकृपण ॥ परीसाचेंतुझेंनामसुव

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

र्ण॥जैसेंचर्मपात्रीचेंजीवन॥प्राशिजेतउत्तमलोकीं॥३१॥नातरीतेंचर्मपात्रीचेंउदक॥तेणेंसिद्धहो
तोमिष्टान्नपावक॥तैसेंमाझेंशरीरकोंधिक॥तेथेंनामतुझें॥३२॥भलतसेंअसोप्रासादमंदिर॥त-
येंलिंगरयापिलेंपवित्रविश्वंभर॥तैसेंमाझेंकाथशरीर॥परीनेथेंनामतुझें॥३३॥धेनुकेसिअमंग
ळाचीप्रीती॥कासेपंन्नामतपयस्नवती॥तैसेंमाझेंशरीरमंदमती॥परीशुभनामवसेतुझें॥३४॥
शिवाजैसातोवंद्यमूर्तिपाषाण॥त्यासिपूजाअर्पितीसर्वजन॥तैसामीमतिनष्टअज्ञान॥परीशु
भनामतुझें॥३५॥जैसातुरंगमपशुजाती॥त्यावरीआरूढहोयनृपती॥वरीदिव्यदंडचामरेंमि
रवती॥स्वामित्वपणें॥३६॥तैसामाझेंमनांतूंस्वार॥माझ्याहृदयींतुझानामस्मर॥तेणेंमीपशुजं-
तअविचार॥वंद्यझालोंशिवा॥३७॥ऐशीदुर्वासऋषीचीस्तुती॥तेणेंसंतोषलापशुपती॥ह्मणे
तुझीपावलीभक्ती॥ऋषिदुर्वासा॥३८॥अगस्तीसह्मणेशिवकुमर॥त्यालिंगींलयपावलाशं
कर॥सुखीकेलातोऋषीश्वर॥त्रिपुरांतकें॥३९॥दुर्वासेश्वरतेंलिंगप्रथम॥मगशिवाचावरजाहला
उत्तम॥शिवेंलिंगासिप्रयोजिलेंनाम॥कामेश्वरऐसें॥१४०॥कामकुंडींकीजेस्नानदान॥कामेश्वरीं
कीजेपूजन॥तेणेंसर्वमनोरथसंपूर्ण॥सुफळहोती॥४१॥याअध्यायाचीसांगोंफळश्रुती॥ह्माअ
ध्यायजेश्रवणपठनकरिती॥जन्मांतरींचेदोषपराभवती॥निमिषमात्रें॥४२॥ऐसाअगस्तिस्वामी
चासंवाद॥जैंजैंपृच्छातोंतोंदार्घानंद॥येथूनिकथारसाळविनोद॥परिसावेंश्रोतीं॥४३॥शिव-
दासगोमाश्रोतयांप्रती॥भावपूर्वकप्रार्थीबद्धहस्तीं॥आतांस्वामीसप्रार्थीलअगस्ती॥तेकथाम
हाआश्चर्य॥१४४॥ ॥इतिश्रीस्कंदपुराणेकाशीखंडेवीरेश्वरोत्पत्तिवर्णनंनामचतुःषष्टितमो
ध्यायः॥६४॥ ॥श्रीसांबसदाशिवार्पणमस्तु॥ ॥अध्याय॥६४॥ ॥ओव्या॥१४४
॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥५॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कास्वं श्रीगणेशायनमः ॥ ॥अगस्तिवदेजीषडानना ॥ कृपालुवास्वामीअष्टदशलोचना ॥ तुह्मांशरणजोशि अ०
॥१॥ वनंदना ॥स्वामीषण्मुखा ॥१॥ कल्पूनिअपत्याचीउदरचिंता ॥देशावराक्रमिजेद्रव्यहिता ॥ मार्गीव ॥६५॥
रपडाहोयअवचिता ॥तस्करासिपें ॥२॥ तैसाकाशीवियोगहादीर्घचोर ॥ह्माशिवमार्गीचातस्कर ॥ तु-
ह्मीदेतांमजपीयूषाचाआहार ॥तोमध्येंचिहरीहा ॥३॥ मगबोलताजाहलाशिवनंदन ॥ अगस्तितु
वांजिंकिलेंब्रह्मस्थान ॥तरीयातस्कराचाअवगुण ॥नमानिजेतुवां ॥४॥ काशीवियोगहानव्हेतस्करु
॥हातुझासखावाविवेकविचारु ॥जेणेंप्राप्तहोइजेपूर्णगुरू ॥ब्रह्मविद्येचापें ॥५॥ घडेवियोगाचास-
सर्ग ॥ तेणेंवाटेपृच्छेचाप्रसंग ॥ मगदृश्यहोयपरमार्थमार्ग ॥सायुज्यमुक्तीचा ॥६॥ तरीहाऐसा
वियोगप्राप्तकरी ॥मुक्तिपावनहोयकाशीपुरीं ॥जेणेंसानुकूलहोयत्रिपुरारी ॥ तोचिहावियोग
॥७॥ अगस्तिवदेजीशिवसुता ॥स्वामीमजतृप्तिहोईलकेंआतां ॥मीकल्पवृक्षातळींअसतां ॥
राहिलोसेंक्षुधाक्रांत ॥८॥ स्वामीजेंप्रश्नीलमाझामनोभाव ॥ तोफेडावाजीमाझासंदेह ॥भक्ति
विरहितमजदेव ॥ प्रसन्नहोतोसी ॥९॥ तरीएकप्रश्नअसेजीस्वामी ॥जैसाअमृतकरशोभेव्यो
मीं ॥ तैसातोमुक्तिमंडपधामी ॥नंदिकेश्वर ॥१०॥ जेणेंशिवासिनामजाहलेंपशुपती ॥तोनंदि-
केश्वरमहाबळाकृती ॥ मजनिरूपाजीबळउत्पत्ती ॥त्यानंदिकेश्वराची ॥११॥ हात्रिविधा
कारकेंसाजीनंदी ॥ह्मासर्वकाळशिवाचासंवादी ॥ मजश्रुतकराजीयाचीआदी ॥ मूळअवसान
॥१२॥ स्वामीह्मणेगामैत्रावरुणी ॥ तुजयोगप्राप्तहादिनमणी ॥ तेणेंलाधलासिपूर्णखाणी ॥
शिवकथारत्नांची ॥१३॥ तरीपरियेसीमूळउत्पत्ती ॥शिवाचीइच्छातेकाशीअविमुक्ती ॥तेअ-
विनाशप्रलयांतीं ॥ शिवधाम्निनीते ॥१४॥ तैसाहानंदीप्रलयींअविनाश ॥हासाक्षातसदाशि
वाचाअंश ॥ अक्षरहोतापरमपुरुष ॥ तोक्षरजाहला ॥१५॥ षण्मुखह्मणेगाअगस्तिऋषी ॥ ॥१॥
बरवीपृच्छाकेलीत्वांआह्मासी ॥हेंमहादोषांचेंहरणमानसीं ॥उद्भवलेंतुझ्या ॥१६॥ तुजसु

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

चलेंपरोपकारक॥ तरीपरियेसीगाभावपूर्वक॥ जेणेंपराभवतीदोषादिक॥ सहस्त्रजन्मांचे॥ १७॥ त
रीयानंदीचीमूळकथाऐशी॥ हाकैसाप्राप्तजाहलाशिवासी॥ येणेंपराभविलेंकवणासी॥ आपुले
नीपुरुषार्थपणें॥ १८॥ विरिंचिनाथाचाजोकुमर॥ त्वताश्युनामेंमहाऋषीश्वर॥ जयाचेअध्योजि
ळींअवतार॥ मत्स्यजाहलाप्रथम॥ १९॥ त्यावृत्ताशुऋषीपासूनी॥ महाऋषिजन्मलाशिखिमुनी
॥ शिखेपासावजन्मलाह्मणोनी॥ हेंचिगुणनाम॥ २०॥ तोगेलाहोतात्अमरभुवना॥ भेदावयाक
श्यपनंदना॥ महातपसाधकप्रज्ञा॥ देखिलावज्रधरें॥ २१॥ सुरेंद्रबैसलासेसिंहासनीं॥ जयंत
कुमरशचीनंदिनी॥ सभेहोतसेपेरवणी॥ नृत्यांगनाची॥ २२॥ ऐसासर्वदेवेंसिअमरेश॥ तेणें
देखिलाशिखिमुनीतापस॥ देखोनिऊद्भवलामहाद्वेष॥ सुरेंद्रचित्तीं॥ २३॥ मृत्युमंडळींचाजो
तपेश्वरी॥ तोसुरेंद्राचाअत्यंतवैरी॥ देखोंनशकेत्यासभेमाझारी॥ त्याऋषीश्वरासी॥ २४॥ ऋषी
नेंकेलेंआशीर्वचन॥ परीराजमदाचेंउन्मत्तपण॥ तापसियाचाकीजेसन्मान॥ हेंनाहींअमरप-
दीं॥ २५॥ अगस्तिवदेजीशिवकुमरा॥ तूंपृच्छापरिहाराचेंभांडारा॥ तरीसन्मानुकैसादाता
रा॥ निरूपावामज॥ २६॥ षण्मुखह्मणेगामहातापसा॥ आतांसन्मानतोह्मणिजेकैसा॥ सत्व
गुणाविरहितपुरुषा॥ नउद्भवेमानसीं॥ २७॥ वृद्धअथवान्नृपतीज्ञानी॥ सत्पात्रदेवमहंतमु
नी॥ तरीसन्मानकीजेनम्रहोऊनी॥ करिजेगाकैसें॥ २८॥ प्रथममधुरशब्दींस्वधर्मी॥ यावेंजीऐसें
ह्मणिजेस्वामी॥ तरीतोपूर्णचंद्रवतव्योमीं॥ आल्हादभरित॥ २९॥ बैसकारआणिकआसनें॥ पू-
जाविधिआणिदक्षिणादेणें॥ सप्तपदेंबहुधाकारणें॥ ऐसाहासन्मान॥ ३०॥ इंद्रसभेसिगेलातो
शिखिऋषी॥ हासन्माननव्हेचित्यासी॥ ऐसेनम्रगुणलक्ष्मीवंतासी॥ अल्पचिअसतांमहीमं-
डळीं॥ ३१॥ तेथेंउभाराहिलाशिखिमुनी॥ सन्मानकरीवज्रपाणी॥ त्याचेंआशीर्वचनअव्हेरूनी
॥ नपाहेसुरनाथ॥ ३२॥ स्वामीह्मणेगामहातपेश्वरी॥ हेकथाजुनाटपूर्वापारी॥ तैंनव्हतीसुर

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कारवं- ॥२॥

पतीच्यामंदिरीं ॥ चतुर्दशरत्नें ॥ ३३ ॥ बहुतइंद्रमेलेहोऊनी ॥ तैंविरिंचिहोताएकाननी ॥ क्रोधायमान
झालामहामुनी ॥ देखोनीनिर्भर्त्सना ॥ ३४ ॥ क्रोधेंसंतप्तझालातोशिखी ॥ मगप्रत्युत्तरवदलामुखीं
॥ तुजऐसाकरीनसहस्राक्षी ॥ दुसराअमरेंद्र ॥ ३५ ॥ जंवदेखिलेंनाहींवृषभध्वजा ॥ तंवसन्माननाम
ठेवसहजा ॥ ऐसेंइंद्रासिबोलोनिपैजा ॥ निघालातोऋषी ॥ ३६ ॥ मगविंध्यगिरीचेंपाठारीं ॥ ऋषिआ
लासासरोवरीं ॥ तेथेंविरिंचिनाथेंपर्वतावरी ॥ साधिलेंतप ॥ ३७ ॥ तेणेंमांडिलेंजीतपदारुण ॥ पंचा
ग्निआणिधूम्रपान ॥ सहस्रवर्षेंअनुष्ठान ॥ साधिलेंतेणें ॥ ३८ ॥ मनींधरूनिपुत्रकामना ॥ तेणेंआरा
धिलेंचतुराननाः ॥ देवाधीशसुरेंद्रघालीआंकणा ॥ ऐसादीजेपुत्र ॥ ३९ ॥ ऐसेंजाणोनियांसृष्टिकर ॥ दे
खोनितपाचागिरिवर ॥ मगपावलासावित्रीवर ॥ मानससरोवरीं ॥ ४० ॥ विरिंचिह्मणेगाजाहलोंप्रसन्न ॥
तवब्रह्मचारीवदेवचन ॥ अमरपदजिंकीइंद्रापासून ॥ ऐसाद्यावापुत्रमज ॥ ४१ ॥ मगमनींविचारी
विरिंची ॥ ह्मणेहेपरात्परसिद्धीनव्हेआमुची ॥ आह्मीरचनाकरितोंसृष्टीची ॥ नदेखोंवेदीं ॥ ४२ ॥
तरींमुनिपरियेसीमाझेंवचन ॥ काशीस्थळींपूजिजेपंचानन ॥ विश्वंभरआराधलियाविण ॥ हा
वरनव्हेप्राप्त ॥ ४३ ॥ विरिंचिह्मणेगामहामुनीश्वरा ॥ काशीमध्येंपूजीकर्पूरगौरा ॥ तेथेंभक्तिके
लियाईश्वरा ॥ तत्काळपाविजेल ॥ ४४ ॥ मगविधीनेंतयासिसांगीतलामंत्र ॥ जेणेंप्रसन्नहोयपंचव
क्त्र ॥ ह्मणेआराधीत्रिनेत्र ॥ सुफळहोतीलमनोरथ ॥ ४५ ॥ मगऋषिआलाआनंदवनीं ॥ पूर्वभ
क्तीचेअवसानीं ॥ लिंगस्थापिलेंपंचाननीं ॥ तंवपावलाशिव ॥ ४६ ॥ शिवेश्वरलिंगस्थापिलें होतें ॥
अनुष्ठानेंकेलींसहस्रशतें ॥ मगपूर्णभक्तिदेखोनिउमाकांतें ॥ प्रगटलाशिव ॥ ४७ ॥ ध्यानींबैसलाहोतामग
हाऋषी ॥ शिवेंकरेंस्पर्शिलेंत्यासी ॥ ह्मणेइच्छावरदप्राप्तजाहलासी ॥ याकाशीस्थळीं ॥ ४८ ॥ ऋषी
नेंदेखिलात्रिपुरारी ॥ मगपूजाअंबुघेतलेंकरीं ॥ शिवनामस्तोत्रेंवाचेंउच्चारी ॥ मगकेसेंवर्तलें ॥ ४९ ॥२॥
॥ मानसींविचारीउमाकांत ॥ वरदीजेपाहूनियाचीआर्त ॥ मगविचारूनियांआपुलेंमत ॥ केसादी-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दीधलावर॥ ५० ॥ तृतीयनेत्रस्फुरिलाशंकरें।त्रिमूर्त्तिआकर्षिलीत्रिविधाकारें ॥ त्यासिउत्पत्तिजाह-
लीयाच्याद्वारें ॥ त्यात्रिविधाकवणी ॥ ५१ ॥ पृथ्वीपरिघकरावयासी ॥ वरुणपुत्रदीधलाकर्दमासी॥
शिवाच्याभाललोचनींतयासी॥उत्पत्तिजाहली ॥ ५२ ॥ कश्यपासिदीधलाजोकुमर॥ तोही तृतीय
नेत्रीचासमीर॥दितीचेगर्भीजायतोवज्रधर ॥विजयीजाहला ॥ ५३॥ आणिकएकावैश्वानरब्रा
ह्मणासी॥ प्रसन्नजाहलातोकाशीनिवासी॥गार्हपत्याग्निपुत्रदीधलातयासी॥ तृतीयभालचक्षुतू
नी॥ ५४॥ऐसावरुणवायुआणिगार्हपती॥ यांचीशिवेंआकर्षिलीअर्धशक्ती॥शिखिमुनीकेलाअति
तृप्ती॥ महादेवें॥ ५५॥ यात्रिवर्गाचीआकर्षिलीशक्तिपूर्ण॥ तीनचिअक्षरेंकरीपंचानन॥ तोत्रिविधाकार
कवणकवण॥ समर्पिलेंमुनीसी ॥ ५६॥ त्रिअक्षरांचाकरूनियांमंत्र॥ मुनीसिदेताझालात्रिनेत्र॥ ह्मणेइ
च्छेसारिखापावशीलपुत्र॥ हामंत्रजपतां॥ ५७॥ तरी तोत्रिअक्षरमंत्रकेसा॥जोशिवेंप्राप्तकेलातापसा ॥
स्वामीह्मणेअगस्तिऐसा॥ परियेसीआतां ॥ ५८ ॥बकारअक्षरींघेतलावरुण॥सकारअक्षरींशिवअ
पण॥वकारअक्षरींसाक्षातपवन ॥हात्रिअक्षरीबसवा॥ ५९॥ षण्मुखह्मणेगाअगस्ती॥ कींहोईल-
त्रिदेवांचीशक्ती॥शिवेंप्रेरिलीमंत्राचीयुक्ती॥कींतेत्रिदेवांची ॥ ६० ॥ बकारूतोबोलिजेब्रह्मा॥ ब
कारतोसाक्षातपुरुषोत्तमा॥सकारह्मणिजेपूर्णआगमा॥शंकरतो ॥ ६१ ॥ आतांअसोहाशुभशृं-
गार॥ श्रोतियांनिरूपूंउघडविचार॥शिखिमुनीसदीधलाकुमर॥ कवणियेशक्तीचा ॥ ६२॥ श्रोतयांस
महाराष्ट्राचीआवडी॥ तेथेंकायसीसंस्कृतांपांझडी ॥ यांउभयामाजीअत्यंतगोडी ॥ तेमहाराष्ट्राची॥
॥ ६३॥ त्यांदोहींमाजीजेसेंप्रति अंतर ॥जैसेंतडागकूपनीर॥ यांउभयतांचाऐसाविचार॥ प्रति
अंतरें ॥ ६४॥ वापीकूपोदकतें अप्राप्त॥ पात्रदोरेंवीणनव्हे प्राप्त॥ तैसेंजाणावेंजीसंस्कृत॥ इ-
तरजनांसी ॥ ६५ ॥जेंतडागसरितांचेंजीवन॥ तेंकरांजळींप्राशितीसर्वजन॥ ह्मणोनिप्रतिष्ठा-
वदतीपूराण॥ महाराष्ट्राची॥ ६६॥ ह्मणोनिअसोह्याशुभप्रकार॥ब्रह्मातोबोलिजेजलधर॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

विष्णुरूपतोसाक्षातसमीर ॥ शिवतोहुताशनी ॥ ६७ ॥ ऐशायात्रिविधदेवमूर्ती ॥ हाचिमंत्रस्थापि
लाजीपशुपती ॥ मगशिखिमुनिजपतसेयुक्तीं ॥ त्रिसहस्त्रवर्षी ॥ ६८ ॥ मगत्र्यंबकह्मणेरेपुत्रा
र्था ॥ तूंत्रासहोसीचिंतिल्यापदार्था ॥ परीमाझियाशब्दपरमार्था ॥ चित्तएकाग्रकरी ॥ ६९ ॥ चतुर्दश
मन्वंतरवरी ॥ इंद्रभोक्ताअसेअमरपुरीं ॥ पुण्यांतींलोटेलपृथ्वीवरी ॥ आपणचितो ॥ ७० ॥ परी
तुझापुत्रतोसकळांसी ॥ जिंकीलसुरेंद्रादिदेवांसी ॥ स्वर्गमृत्युपाताळपुटवासी ॥ नघतीसमफ
ळीयातें ॥ ७१ ॥ त्र्यंबकह्मणेगाशिखिमुनी ॥ तोहोईलचतुर्दशरत्नांचीखाणी ॥ ऐसेंबोलिलेंसें
वेदपुराणी ॥ भविष्यमाझें ॥ ७२ ॥ मस्तकींठेविलाअभयकर ॥ शिवेंअभ्यासिलातोऋषीश्वर ॥ म
स्तकींजन्मेलतुझाकुमर ॥ त्रिविधमूर्तितो ॥ ७३ ॥ ऐसाप्रसन्नकेलाशूळपाणी ॥ मगऋषीआ
लाआपुलेस्थानीं ॥ मंत्रविधिबैसलाअनुष्ठानीं ॥ यामानससरोवरीं ॥ ७४ ॥ शिखेसिग्रंथीघा
लूनियांशिरीं ॥ मगसहस्त्रमंत्रजपकरी ॥ त्र्यक्षरमंत्रत्रिमूर्तिस्मरी ॥ विधिहरिहर ॥ ७५ ॥ म
गशिखेचीसोडोनियांग्रंथी ॥ तंवतोपडिलादिव्यदीप्ती ॥ वत्सरूपजेसामहामूर्ती ॥ वत्सरूपतो
॥ ७६ ॥ पीतांबरमिरवीतसेमौळीं ॥ हिरण्यवर्णमिरवेकंठस्थळीं ॥ रक्तांबरवर्णमुखमंडळीं ॥
मध्येंवर्णजळधर ॥ ७७ ॥ गार्हपत्याग्नीचेंपरिधान ॥ तेंचिमौळींपीतांबरवसन ॥ हेंआणिलेंपैसा
क्षीकारण ॥ महाऋषीप्रती ॥ ७८ ॥ ध्वजाउभारिलीपुत्रनंदीची ॥ तेथेंजाणोनियांआलाविरिंची
॥ तेणेंघटिकापाहिलीमुहूर्ताची ॥ केलेंनामधारण ॥ ७९ ॥ विरिंचीनेंजन्मकाळपाहिला ॥ तं
वतोहस्तार्कीअसेउद्भवला ॥ मगनिश्चयकरोनिवदताझाला ॥ सृष्टिकरता ॥ ८० ॥ विधीनेंजा
तकवर्णिलेंवेदीं ॥ तोजाहलाहस्तार्कतृतीयपदीं ॥ ह्मणोनिजन्मनामझालेंनंदी ॥ विरिंचिमुखें
॥ ८१ ॥ विरिंचिह्मणेजीमुनीवरा ॥ हावेदीं ऐसानिघालानिर्धारा ॥ हस्तार्कीजन्मतोयोगीश्वरा ॥ ॥३॥
॥ वंद्यहोय ॥ ८२ ॥ गृहींनवनिधीवोळंगती ॥ अश्वगजरथांनाहींमिती ॥ हापराभवीलसुरप-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ती ॥ अढळजोइंद्रपदीं ॥ ८३ ॥ मस्तकींमिरवतीपट्टसूत्रें ॥ ध्वजअंकुशकुंडलछत्रें ॥ अंगींस्वरूप-
तीअस्त्रें ॥ प्रौढदशेमध्यें ॥ ८४ ॥ विरिंचिह्मणेगार्गीशिरविऋषी ॥ ऐसेंवरदानअसेत्यासी ॥ ह्मानक्ष-
त्रकाळनरमानवांशीं ॥ निर्मिलाशंकरें ॥ ८५ ॥ ऐसाह्मात्रिविधमूर्त्ती ॥ ह्मणोनिनामयोजिलें
प्रीतीं ॥ मगविरिंचिगेलाअगस्ती ॥ सत्यलोकासी ॥ ८६ ॥ मगपित्यासिप्रार्थीनंदिकेश्वर ॥ मज
देयीपीयूषआहार ॥ मींझालोंजीक्षुधातुर ॥ पीयूषआहारासी ॥ ८७ ॥ ऋषीनेंजाणूनिक्षुधातुर
॥ तेणेंमानसींकेलाविचार ॥ मगदारवविताझालासागर ॥ क्षीरार्णवतो ॥ ८८ ॥ मगतोवत्सराज
आज्ञाभावा ॥ पितृआज्ञेंगेलाक्षीरार्णवा ॥ मनोवृत्तींसंतोषलातेव्हां ॥ देखोनिक्षीरार्णव ॥ ८९
॥ मगप्राशूंलागलातोसागर ॥ तेणेंमानसींकेलाविचार ॥ ह्मणेह्मानंदिकेश्वर ॥ ह्मणोनिहेउपमा
॥ ९० ॥ कींतोक्षीरघृतेंभक्षितावन्ही ॥ अग्नितोसाक्षातनंदीह्मणोनी ॥ कींतोवृष्टीविध्वंसकगगनीं ॥ स-
मीरनंदी ॥ ९१ ॥ तेणेंशोषिलेंसागरींचेंक्षीर ॥ उर्ध्वशब्देंगर्जवीअंबर ॥ तंवधांवलेमहावीर ॥ विष्णूचे
दूत ॥ ९२ ॥ तेथेंदशकोटिरारवणाइत ॥ नंदीवरीधांविन्नलेअकस्मात ॥ तेनभींपराभविलेत्वरित ॥
पुनरपीक्षीरभक्षी ॥ ९३ ॥ तेणेंक्षीरामृताचाग्रासकेला ॥ मगतेसाचिशुभ्रवर्णझाला ॥ जैसारंगेंपा-
षाणपालटला ॥ काश्मीरतो ॥ ९४ ॥ विष्णुदूतह्मणतीनंदीसी ॥ हाशेषशायनतूंकांनेणसी ॥ श्रुतहो
ईलवैकुंठनाथासी ॥ मगतूंकैंचास्वस्थ ॥ ९५ ॥ हेंश्रुतहोईलआदिपुरुषा ॥ तेव्हांतुजप्राप्तहोईलयम
फांसा ॥ आतांतूंनेणतआलासिस्वदेशा ॥ जाईरेमागुता ॥ ९६ ॥ ऐसेंविष्णुदूतअनुवादले ॥ वीरगुं
ढीधरोनिनंदीनेंटाकिले ॥ ह्मणेजाजारेपाचारावहिले ॥ तुमचाअतुर्बळी ॥ ९७ ॥ मगहरिपाशीं
गेलेकिंकर ॥ त्यांहींहरीससांगीतलासमाचार ॥ ह्मणेभक्षिलेंजीसमस्तक्षीर ॥ पयोदधीचें ॥ ९८ ॥
इतुकापरिसोनिवृत्तांत ॥ क्रोधायमानजाहलालक्ष्मीकांत ॥ आयुधेंघेऊनित्वरावंत ॥ आलापुरु
षोत्तम ॥ १०० ॥ तोहरीनेंविंधिलासहस्त्रबाणीं ॥ महाशस्त्रेंवर्षीचक्रपाणी ॥ गदाघातेंउद्दवी

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ध्वनी ॥ मेघगर्जनेपरी ॥ १०१ ॥ जैसापाषाणपडेगिरीचेपाठारीं ॥ मगतोजैसाआपणातेंचिअव्हेरी ॥
तैशींहरीचींशस्त्रेंनंदिशरीरीं ॥ लागतीजैशींशुष्कतृणें ॥ २ ॥ नंदिकेश्वरकोपेंखवळला ॥ तेणें
हरीनासिकास्वरेंउडविला ॥ सत्यलोकापरताहीटाकिला ॥ नंदिकेश्वरेंवैकुंठीं ॥ ३ ॥ सवेंचिआ
कर्षिलाप्राणस्वरीं ॥ जैसायोगीश्वरधूम्रपानकरी ॥ तैसानंदीनेंआदळिलाहरी ॥ नासाग्रवातें ॥ ४
॥ जैसींवातचक्रींतरुपत्रें ॥ तींव्योमीं भ्रमतीवातसूत्रें ॥ तैसाहरीभ्रमविलापुत्रें ॥ शिखिमुनीचि
या ॥ १०५ ॥ ऐसातोसहस्रवरुषेंहरी ॥ भ्रमतहोतानंदीचेनासास्वरीं ॥ मगचित्तींस्मरेनिर्विचारी ॥
पद्मनाभतो ॥ ६ ॥ तेणेंहरिटाकिलाव्योमकुटीं ॥ मगनंदीपाहेऊर्ध्वदृष्टीं ॥ तंवहरीनेंहाणीतला
मुष्टीं ॥ गदाघाताचिया ॥ ७ ॥ हरीसपीडाजाहलीनासास्वरीं ॥ तेणेंदुःखमानिलेंशरीरीं ॥ ह्मणोनिग
दाघातनंदीवरी ॥ टाकिलाहरीनें ॥ ८ ॥ नंदीपाहेऊर्ध्वमुखगती ॥ तंवहरीचीगदाबैसलीद्विजपंक्तीं
॥ दशनभेदोनियांलक्ष्मीपती ॥ मानिलाजयो ॥ १०९ ॥ षण्मुखवदेअगस्तीतें ॥ विरिंचीनेंजात
कवर्णिलेंहोतें ॥ तेंनंदीसिआदानजाहलेंनिरुतें ॥ जन्मनक्षत्रींचें ॥ ११० ॥ नंदीचेदशनपाडीह
री ॥ शोणितवाहेपृथ्वीवरी ॥ तोसरितासंगमक्षीरसागरीं ॥ जाहलाजीपूर्ण ॥ ११ ॥ मगतेथेंवर्तलें
महाचोज ॥ जेदशनींचेंपडलेंरक्तबीज ॥ तयाचींनानारत्नेंजाहलींसहज ॥ नंदिशोणिताचीं ॥ १२
॥ गदाघातेंनंदिकेश्वरत्रासिला ॥ तेणेंरत्नबीजप्रसवला ॥ चतुर्दशरत्नांचाजन्मजाहला ॥ तोके-
सानंदीपासुनी ॥ १३ ॥ रत्नेंउद्भवलीआपुलेशरीरीं ॥ तींनंदिकेश्वरटाकीसागरीं ॥ षण्मुखह्मणे
महातपेश्वरी ॥ परियेसीरत्नजन्म ॥ १४ ॥ मुखांतूनिकाढीलक्ष्मीचाअंकुर ॥ रत्नें प्रसवताजाह
लानंदिकेश्वर ॥ लक्ष्मीउद्भवलीसर्वशृंगार ॥ सहवर्तमान ॥ १५ ॥ नंदीस्फुरणकरीदक्षिणहस्तीं
॥ तेथेंउद्भवलाजीदीव्यदीप्ती ॥ तोचतुर्दतशुभ्रऐरावती ॥ तोहीटाकिलासागरीं ॥ ११६ ॥ नंदी
नेंस्फुरिलाआपुलाचरण ॥ तेणेंउद्भवलावारूशुभ्रवर्ण ॥ जोसप्तमुखगतीश्यामकर्ण ॥ उच्चैः

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रवानामतो ॥ ११७॥ मगपुच्छझाडीनंदिकेश्वर॥ तोंउद्भवलामहातरुवर॥ तोजेसामहाविद्येचा
दातार ॥ कल्पद्रुमनामें ॥ १८ ॥ चकोरांस्रवतपीयूषआहार॥ जोषोडशकळींअमृतकर ॥ तोचंद्रमा
रोहिणीवर ॥जन्मलानंदिहृदयीं ॥ १९॥ मौळींमिरवीतहोतावासुकीच्या ॥जोशोभायमानकंठींवि
ष्णूच्या ॥तोकौस्तुभदिव्यतेजाचा ॥नेत्रींजन्मलानंदीचे ॥ १२० ॥ विघ्नकेलेंउद्दालकऋषीचेघरीं ॥
जेचतुर्दशाकदाक्षनिशाचरी ॥तेजन्मलीनंदीचेवामकरीं ॥लक्ष्मीसरिसी ॥ २१॥ मळयांतमांडिला
होतासमय ॥शिवेंत्रिपुरासीकेलाक्षय ॥त्र्यंबकधनुष्येंग्रामकेलाजय ॥ तेंजन्मलेंनंदीचेशृंगीं ॥
॥ २२॥ अमृतकरावया कालाकूटीं ॥ महाविषपराभवीदृष्टीं ॥तोधन्वंतरीजन्मलानासापुटीं ॥
नंदिकेश्वराचे ॥२३॥सर्वदेवांभक्षावयाचीअतिप्रीत॥ मर्त्यजंतुतत्काळहोतीस्वस्थ ॥तेंनंदीचे-
जिव्हाग्रींअमृत॥ उद्भवलेंपैं ॥ २४॥ देवांपरोपकारास्तवप्राणु ॥ कल्पितांतृप्तहोतीसर्वजंतु ॥ते
नंदीचेलिंगींकामधेनु॥ जन्मलीपैं ॥ १२५ ॥शिरेंकापिलींसमुद्रमथनीं ॥असुरउन्मत्तकेलेमोहनीं ॥
तेमदिराजन्मलीस्वेदापासूनी ॥ नंदिकेश्वराचे ॥ २६ ॥जेणेंसुनीलजाहलेंव्योमपुट ॥शिवासिना
मजाहलेंनीलकंठ॥ तेंनंदीचेमुखफेणींकालकूट ॥ जन्मलेंविष ॥ २७ ॥रंभाआदिसर्वहीअप्स
रा ॥ज्याअष्टनायिकालावण्यसुंदरा ॥त्यासर्वदेवभक्तीसितत्परा॥ जन्मलियावामचरणीं ॥२८
महारणींज्याचेस्फुरणाविण ॥ महाशूरांसिनव्हेधीरत्वगुण ॥ तोदेवदत्तशंखसगुण॥ जन्मलादश
नीं ॥ २९॥ ऐशींचतुर्दशरत्नेंउद्भवलीं ॥तींक्षीरसागरींप्रवाहलीं ॥ तींक्षीरार्णवाचेहृदयींराहिलीं ॥
सहस्रवरुषें ॥ १३० ॥नंदीचियादशनशोणितें॥ समुद्रींजाहलींजळजंतें ॥ नानाजळजीवशंख
मुक्तें॥ सर्वहीपैं ॥ ३१ ॥ आतांअसोहेंपुढेंनंदीविष्णु॥ युद्धाप्रवर्तलेमहादारुणु ॥ तयेंदोघींधरि-
ला अभिमानु॥ महाशूरत्वाचापैं ॥ ३२॥ नंदिकेश्वरआणिवनमाळी॥ दोघेमल्लयुद्धाआलेसमफ
ळीं॥ गर्जनाकरितांव्योममंडळीं॥ महादीर्घध्वनी ॥ ३३ ॥ क्रोधेंआवेशलाऋषिनंदन ॥मौळि-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

झडपेंहाणीतलानारायण ॥ हृदयींहाटलादक्षिणचरण ॥ पडिलातळीं ॥ ३४ ॥ क्षितितळींपाडिलेंशार्ङ्ग
धरा ॥ पळसुटलाविष्णुकिंकरां ॥ थोरआंदोळजाहलाक्षीरसागरा ॥ तेणेंमर्यादासांडिली ॥ ३५ ॥ एक
सहस्रसाठसंवत्सर ॥ दोघांयुद्धजाहलेंअत्यंतक्रूर ॥ परीतोत्रिविधनंदिकेश्वर ॥ नाटोपेहरीसी ॥ ३६
॥ मगबुद्धीनेंविचारीनारायण ॥ ह्मणेअगम्ययाचीशक्तीपूर्ण ॥ हरिह्मणेमागेंरेप्रसन्न ॥ इच्छातुझी ॥
॥ ३७ ॥ तूंकोठीलकवणाचाआत्मज ॥ ऐसेंप्रश्नितांजाहलागरुडध्वज ॥ तंवबोलतसेवत्सराज ॥ पु
रुषोत्तमासी ॥ ३८ ॥ माझेंनावबसवानंदिकेश्वर ॥ मीशिरिवमुनीचाकुमर ॥ क्षुधाक्रांतयेथेंक्षीर
सागर ॥ प्राशूंआलों ॥ ३९ ॥ इतुकेंपरिसोनियांश्रीपती ॥ चंदनकेलेंबद्धहस्तीं ॥ साष्टांगमस्तकठे
वूनिक्षितीं ॥ ह्मणेमीभक्ततुमचा ॥ १४० ॥ मगशांतकरोनियांक्षत्रियधर्म ॥ दोघांचाविसर्जिला
संग्राम ॥ मगस्तुतिकरीपुरुषोत्तम ॥ नंदिकेश्वराची ॥ ४१ ॥ हरिह्मणेजीनंदिकेश्वरा ॥ तूंप्रभु
जीसर्वगणांचावरा ॥ आतांमीएकमागेनदातारा ॥ तेंमजप्राप्तकरी ॥ ४२ ॥ प्रथमतुह्मासजाहलों
प्रसन्न ॥ हेंहीअनुवादलोंवचन ॥ तरीतुझियारक्तबीजापासून ॥ होतीलरत्नखाणी ॥ ४३ ॥
तें हें माझेंआशीर्वचनतुह्मासी ॥ आतांइच्छावरदीजेआह्मासी ॥ जेंवसतआमुचेमानसीं ॥ तें
सांगोंतुह्मा ॥ ४४ ॥ नंदिकेश्वरासिप्रार्थीवनमाळी ॥ तुह्मीचरणठेविलामाझेवक्षस्थळीं ॥ प-
दउमटलेंहृदयकमळीं ॥ तेंमजभूषण ॥ ४५ ॥ हेंमजप्राप्तकेलेंपरमनिधान ॥ हामाझाश्रृंगा
रश्रीवत्सलांछन ॥ महाबळीदैत्यांसमर्दीन ॥ यांचेनिअधिकारें ॥ ४६ ॥ हेंपदमाझेअंगींस-
ज्जनिश्चितीं ॥ वज्राहूनिघनवटअंगींशक्ती ॥ दैत्यसंहारीनक्षितीं ॥ करीनपुण्यवृद्धी ॥ ४७ ॥
तुह्मासंग्रामानाहींजीप्रीती ॥ परीमाझीपूर्वपुण्याचीप्राप्ती ॥ मजप्रसन्नव्हावयाउचिती ॥ क्षमा-
केलीतुह्मी ॥ ४८ ॥ ह्मणोनिघातलेंलोटांगण ॥ माझेंब्रह्मतत्वगासुगुण ॥ मजक्षमाकीजेसं
पूर्ण ॥ थोरअन्यायीमी ॥ ४९ ॥ ऐशीनंदिकेश्वराचीस्तुती ॥ हरीनेंकेलीपरमप्रीती ॥ मगनंदि

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

केश्वरविष्णूप्रती ॥ प्रसन्न झाला ॥ १५० ॥ ह्मणे माग मागरे पुरुषोत्तमा ॥ तुजमी प्रसन्न जाहलों मेघ-
श्यामा ॥ तूं संपूर्ण सिद्धी आगमा ॥ सर्वविघ्नहरी ॥ ५१ ॥ मग नंदीस प्रार्थी शार्ङ्गधर ॥ तुह्मी दीधला
मज पूर्णवर ॥ तरी तुझिया मस्तकींचा पीतांबर ॥ प्राप्त करी मज ॥ ५२ ॥ मग मोळींचा दिव्य पीतां
बर ॥ समर्पिला हरीसि सपरिकर ॥ मग नाम पावला शार्ङ्गधर ॥ पीतांबरधारी ॥ ५३ ॥ नंदीमुखीं
जन्म लक्ष्मीसी ॥ ह्मणोनि श्रीवत्स ह्मणती त्यासी ॥ हें चि श्रीवत्सलांछन विष्णूसी ॥ नाम ऐसें
झालें ॥ ५४ ॥ ऐसा विष्णूसि झाला पूर्णवर ॥ मग नंदीनें अभ्यासिला शार्ङ्गधर ॥ शुभ्र होऊ नि-
या वेगवत्तर ॥ आलापि त्स्थानीं ॥ ५५ ॥ षण्मुख ह्मणे गा अगस्ती ॥ ऐशी नंदिकेश्वराची उत्पत्ती
॥ हा शिवासि प्राप्त झाला त्रिमूर्ती ॥ तो कैसा आतां ॥ ५६ ॥ ऋषिवाक्य तें ह्मणिजे निर्गुण ॥ प-
रीश्रोतेजनीं कीजे व्याख्यान ॥ तें चि हें महाराष्ट्र भाषा सद्गुण ॥ जनापरोपकार ॥ ५७ ॥ आतां
श्रवण दीजे कथेसी ॥ नंदी जाईल अमरपदासी ॥ ते कथा परिसा पुढारी केशी ॥ ह्मणे शिवदा
संगोमा ॥ १५८ ॥ इति श्री स्कंदपुराणे काशीखंडे नंदिकेश्वरोत्पत्तिमाहात्म्यवर्णनं नाम पंचष
ष्टितमोऽध्यायः ॥ ६५ ॥ ॥ श्रीसांबसदाशिवार्पणमस्तु ॥ ॥ अध्याय ॥ ६५ ॥ ॥
॥ ओव्या ॥ १५८ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः॥ ॥अगस्तीसवदेशिवकुमर॥आतांपरियेसींकथेचापुढार॥स्त्वेंमसवला
नंदिकेश्वर॥ तीटाकिलीसागरीं॥१॥ सहस्त्रएकसंवत्सरवरी॥ स्त्वें होतीक्षीरसागरीं॥ मगमथनमां
डिलासुरवरीं॥ तोकैसाआतां॥२॥ क्षीरार्णवाची करूनिकुरवंडी॥ मंदराचळकेलारविदांडी॥ मग
स्त्वेंकाढिलेंपरवडी॥ स्फरींअस्फरीं॥३॥अगस्तीसवदेशिवनंदन॥ हेंपूर्वीजाहलेंएकसिंधुमथन॥
मगजेंउत्पत्तीसजाहलानंदीपावन॥ तेंजाहलें दूसरें॥४॥ प्रथममथिला क्षीरसागर॥ चौसष्टलक्षज
याचापसर॥ दुसरेमथनींनंदिकेश्वर॥ तोउदधीअष्टलक्ष॥५॥आतांअसोपुढेंकथाकेशी॥ नंदिकेश्व
रआलापित्यापासीं॥ मगतोआनंदलाशिरिविक्रुषी॥पुत्रदर्शनें॥ ६॥तेणेंवंदिलाआपुलापितर॥ क
थिलाक्षीरार्णवींचाविचार॥ तेथेंमानवलाशार्ङ्गधर॥ सहगणेसी॥७॥ मगनंदीपित्यासिवदेवचन
मीक्षुधेनें अतृप्तजाहलोंपूर्ण॥ आतांमजभक्ष्यपाहिजेतृण॥ वृक्षवल्लीपर्णे॥८॥मगशिरिवि ह्मणेकु
मरा॥ तूंगमन करीअमरपुरा॥ इंद्रजिंतोनितूंसैरा॥ भक्षीरवांडववनत्याचें॥९॥त्रिलोकींच्यानानावन
स्पती॥ज्याअमोघअसाध्यदेवांप्रती॥तेथिंचियास्फमनेंसुरपती॥तृप्तकरीशिवासी॥१०॥मगतोकामक
रीनंदीगण॥पितृचरणींकेलेंअभिवंदन॥ मगपावलातोरवांडववन॥ स्फरपतीचें॥११॥त्यासुवर्णाचला
चेपाठारीं॥पूर्वभागींअसेतेअमरपुरी॥मेरुतळवटींक्षितीवरी॥ रवांडववनतें॥१२॥त्यारवांडववनाचाप
सर॥ सहस्त्रयोजनें असेविस्तार॥त्यापत्रींपुष्पींपूजितांहार॥ मानवेइंद्रासीं॥१३॥ ऐसेंतेंरवांडववनक्षिति
तळीं॥ भोंवतींशक्रकाश्मीराचीपौळी॥ शतएकयोजनेंव्योममंडळीं॥उंचअसे॥१४॥ मांदाकिनीचाषोडशावा
भाग॥ तोरवांडववनासिप्रवाहेजळओघ॥उत्तरभागींजावयामार्ग॥ पोळीसिअसे॥१५॥ त्याउत्तरद्वारें
नंदिकेश्वर॥ वनामध्येंनकरीसंचार॥ शृंगेंउत्पाटूनिगिरिवर॥पाडिलीपौळी॥१६॥ दक्षिणभागींमार्ग
केला॥ मध्येंनंदिकेश्वरप्रवेशला॥ तेथेंवृक्षवल्लीदेखतांजाहला॥ नानाजातींच्याओपें॥१७॥ नानाजा १
तींचेतेथेंवृक्षभार॥ अमृतफळेंफळलेअपार॥तेथेंनंदीरवुंटलामहासमीर॥ केलीपत्रवोझडी॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

१८ ॥ बहुविध्वंसी अल्पआहारी ॥ कल्पद्रुमउत्पाटी क्षितीवरी ॥ जेंइंद्रासि प्रियतें भृंगेवरी ॥ पाडिले
क्षितितळीं ॥ १९ ॥ तंव धांविन्नले रक्षाकर ॥ त्यांही दोरविला तृणचर ॥ वनविध्वंस दाविला-
अपार ॥ पुष्पतरूनानाजातींचा ॥ २० ॥ तेथें रक्षकारीं केलें धावण ॥ नदीवरी टाकिले पाषाण
॥ जैसा पर्वतीं वृष्टि करी वरुण ॥ तैसा शिळाप्रहार ॥ २१ ॥ मग नंदिकेश्वर कायकरी ॥ रक्षका
रछेदिले नासिका स्वरीं ॥ विध्वंसोनि घातले अंबरीं ॥ केली वाताहात ॥ २२ ॥ पुनरपि भक्षी
दिव्यतरु ॥ उत्तमजातीसि करी संहारू ॥ कीं रंभावनीं सुटला कुंजरू ॥ विध्वंसावया जैसा ॥
२३ ॥ दिव्यकुमुदिनी तडागनीरीं ॥ त्या विध्वंसोनि टाकिल्या बाहेरी ॥ जैशा वलीउत्पाटूनि म
हापूरीं ॥ दिसती विगलित ॥ २४ ॥ कल्पद्रुमाचीं मोडिलीं वनें ॥ मानसीं इच्छितो भक्षिणें ॥ दे
वां दुर्लभ जीं रम्यस्थानें ॥ त्यांचा क्षय केला नंदीनें ॥ २५ ॥ एक धांविन्नले अमरपुरा ॥ त्याहीं जाणवि
लें स्फुरेश्वरा ॥ वनविध्वंसोनि वज्रधरा ॥ नेणों आला कैंचा वृषभ ॥ २६ ॥ नेणो वृषभ कीं असुर ॥
कीं चरफटोनि आला गिरिवर ॥ तेणें नवें मोडूनि दिव्यतरुवर ॥ भक्षिले नानाजाती ॥ २७ ॥ मग-
कायकरी सहस्रनयन ॥ समस्त हाकारिले स्फुरगण ॥ तत्काळ आले वनीं ठाकून ॥ नंदीसीं भिडा
वया ॥ २८ ॥ ऐसा तो सहस्राक्ष महाद्भुत ॥ वेगें धांविन्नला देवांसहित ॥ तंव देखिला वनविध्वं
सित ॥ महाविशाळ तो ॥ २९ ॥ शक्र आज्ञा करी गीर्वाणांसी ॥ तुम्हीं धरोनि बंधन करावें त्यासी
॥ बहुविध्वंसी थोडे ग्रासीं ॥ दीर्घ तस्कर हा ॥ ३० ॥ मग धांविन्नले देव स्फुरवर ॥ ते टाकिते जा
हले पाषाण शर ॥ गदामुद्गर गिरिवर ॥ टाकिती नंदीवरी ॥ ३१ ॥ महा अस्त्रें हाणिती नंदिके
श्वरा ॥ पाषाणशिळावृष्टि अपारा ॥ कीं जैसें कमळें हाणिजे कुंजरा ॥ तैसीं लागती अस्त्रें ॥
३२ ॥ अस्त्र न व्हेते पुष्पवृष्टी ॥ नंदीसि समर्पी वज्रमुष्टी ॥ अस्त्रें टाकितां जाहला हिंपुटी ॥ परी अ
जित नंदी तो ॥ ३३ ॥ व्योमीं उडूवेग धर्वभार ॥ त्यामध्यें लोपे जैसा दिनकर ॥ तैसा झांकोळला नंदि

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

केश्वर ॥ देवांचियाअस्त्रें ॥ ३४ ॥ ऐसे देवांचे भार देखूनी ॥ नंदी खवळला जैसा वन्ही ॥ तो तृणदग्धीन
सैन्यलक्षणी ॥ तैसा नंदी देवांवरी ॥ ३५ ॥ मग फुंकिला नासापुटस्वरू ॥ तेणें उडविला देवभारू ॥ तंव
वातचक्रीं पडले तरु ॥ जे मोडिले नंदीनें ॥ ३६ ॥ शृंगें खोंचली एकाच्या पोटीं ॥ ते नंदीनें टाकिले गि-
रिकुटीं ॥ एकते पडले क्षितितटीं ॥ मोळीच्या झडपे करून ॥ ३७ ॥ मग ते सर्व देवगण ॥ अस्त्रें टाकून
करिती पलायन ॥ मग स्वयें चि राहिला आपण ॥ सुरनाथ तो ॥ ३८ ॥ मग योजूनि शतसहस्त्र क-
ठिणशर ॥ इंद्रें विंधिला नंदिकेश्वर ॥ परी तो द्रुमें जैसा गिरिवर ॥ न मानी वज्र जैसा ॥ ३९ ॥ ते ही बाण-
फुंकिले नासापुटीं ॥ वाताहात केले व्योमकुटीं ॥ ते आकाशीं होनि क्षितितटीं ॥ पडले चि नाहीं ॥ ४० ॥
मग वज्र घेऊनियां करीं ॥ नंदी हाणीतला जैसा गिरी ॥ तें पर्वतीं पाषाणाचियापरी ॥ आदळे आंगीं ॥
४१ ॥ सहस्त्रनयनें हाणितला वज्रघात ॥ नावेक नंदी झाला मूर्च्छित ॥ मग मूर्च्छा सांवरून अकस्मात
॥ उठावला धुधुःकारें ॥ ४३ ॥ मग कोपें खवळला क्रोधाग्नी ॥ अट्टाहासें दीधला दीर्घध्वनी ॥ मग नंदी
नें धरिला वज्रपाणी ॥ पुच्छ वेष्टोनियां ॥ ४३ ॥ मग पुच्छें भोवंडिला सुरेश ॥ त्यास दाखविला कैलास ॥
जे सभे बैसला होता महेश ॥ तेथें टाकिला इंद्र ॥ ४४ ॥ तेथें शिवसभेसि वज्रधर ॥ क्षितीं आदळला जै
सा गिरिवर ॥ आणें उद्भवला महास्वर ॥ गर्जलें व्योम ॥ ४५ ॥ तेणें थरारिला सुवर्णाचळ ॥ डुमडु
मिला ब्रह्मांडगोळ ॥ अमरनाथ पडला निश्चळ ॥ स्थावर जैसा ॥ ४६ ॥ तंव धांवले शिवाचे गण
॥ कायसी ध्वनी उद्भवली ह्मणोन ॥ तंव त्याहीं देखिला सहस्त्रनयन ॥ अमरावतीचा अधीश ॥ ४७
ऐसा आदळला वज्रपाणी ॥ क्षण येक पावला यमभुवनीं ॥ मग अंचलवातें शिवगणीं ॥ उपचारिला
तो ॥ ४८ ॥ मग अमरावती सगेला नंदी ॥ सुखें बैसला अमरपदीं ॥ जयजयकार केला ऋषिवृंदीं ॥ नंदि
केश्वरासी ॥ ४९ ॥ इंद्राचें होतें भद्रासन ॥ तें भूमंडळीं टाकिलें नंदीन ॥ मग आपुले स्वइच्छेलागून ॥ केली २
रचना ॥ ५० ॥ ह्मणोनि स्वर्गमृत्युपाताळभुवनीं ॥ ज्याज्या अमोघस्वरवाणी ॥ त्या सर्व नंदिकेश्वरापासूनी, उत्पन्न

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जाहलिया ॥ ५१ ॥ ऐसाअमरपदींनंदिकेश्वर ॥ निर्भयबैसलापराभवूनिदेवसुरवर ॥ मगआनंद
लातोऋषीश्वर ॥ पितानंदीचा ॥ ५२ ॥ इंद्रूटाकिलाहोताकैलासीं ॥ तोशिवगणींनेलाशिवा-
पासीं ॥ मगप्रेश्नितांजाहलासुरेंद्रासी ॥ त्रिपुरांतकतो ॥ ५३ ॥ मगहरह्मणेगावज्रधरा ॥ क-
वणेंपीडिलेंरेसुरेश्वरा ॥ सहस्राक्षह्मणेजीविश्वंभरा ॥ परियेसीविनंतीमाझी ॥ ५४ ॥ शिवानेण
वेकवणमहावीर ॥ मौळीश्रृंगेंजैशींगिरिवर ॥ खांडववनमोडोनियांदेवभार ॥ पराभविलातेणें
॥ ५५ ॥ व्योमींतरुपत्रांचियापरी ॥ मजउडविलेंजीनासास्वरीं ॥ मृत्युपावतोंपरीशरीरीं ॥ होतेंशि
वनाम ॥ ५६ ॥ वत्सरूपधरोनिजाण ॥ विध्वंसिलेंअमरभुवन ॥ आतांसुरपदींभोक्तातयावां
चून ॥ कोणीचनाहीं ॥ ५७ ॥ मजबंधनकरूनियांपुर्च्छी ॥ सहजटाकिलेंकैलासीं ॥ स्वर्गमृत्युपातळीं
तयासी ॥ समानदृश्यनाश्रुत ॥ ५८ ॥ अकस्मातआलाकोठूनी ॥ दीर्घपीडाकेलीजीशूळपाणी ॥ मग
कोपलाभातोभाललोचनी ॥ त्रिपुरांतक ॥ ५९ ॥ तंवगणांसिहांकारीशंकरू ॥ सज्जकेलाअग्निदत्तर
हंवरू ॥ महाध्वनीनेंगर्जिलाडमरू ॥ आणिशंखनादतो ॥ ६० ॥ वामकरींघेतलेंसुनाभचक्र ॥ दक्षिण
हस्तींत्रिशूळत्रिवक्र ॥ देवसैन्यसवेंघेतलाशक्र ॥ अमरनाथतो ॥ ६१ ॥ ऐसासर्वभारेंसिपंचानन ॥ पा
वताजाहलाअमरस्थान ॥ ऐकोनिशंखाचेंस्फुरण ॥ नंदीआलाबाहेरी ॥ ६२ ॥ तोनंदिकेश्वरदेखेकै-
लासशंकरू ॥ कींतोपूर्णिमेचाअमृतकरू ॥ कींतोसुपर्णाचलमहामेरू ॥ ऐसादेखिलाशिवें ॥ ६३ ॥
तोशिवेंकैसादेखिलागण ॥ वृष्टिकरीपाषाण ॥ एकसज्जूनिशरासन ॥ विंधीतअमितबाणीं ॥ ६४
एकहाणितीमहाखड्गघातें ॥ एकटोंचितीत्रिशूळघातें ॥ कोतियामुद्गरशरबहुतें ॥ वेढिलानंदी
॥ ६५ ॥ मगक्रोधेंखवळलावत्सराजू ॥ तोखोंचलाशिवसैन्याउजू ॥ घ्राणरंध्रींदाटलामहाफुंजू ॥
मगकेलागर्जना ॥ ६६ ॥ कंठस्वराचियादीर्घध्वनीं ॥ प्रौढशब्दउद्भवलागगनीं ॥ तेणेंबधिरत्वजाह
लेंश्रवणीं ॥ दिशाभद्रजातींचिया ॥ ६७ ॥ गर्जिन्नलींपर्वतकोवारें ॥ तेणेंथरारिलींमोळीचींशिख

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कान्खं· रें ॥ सीमासांडानियांसप्तसागरें ॥ वोहटकेला ॥ ६८ ॥ थरारिलीसप्तद्वीपवती ॥ ग्रहनक्षत्रेंपडलींमहा अ०
॥३॥ आवर्त्ती ॥ धाकेंसोमसूर्यांचीगती ॥ चलितजाहली ॥ ६९ ॥ ऐसाचालिलाशिवसैन्यावरी ॥ नभपर्यंतजे ॥६६
साम्रहागिरी ॥ देवपराभविलेनासास्वरीं ॥ एकमर्द्दिलेक्षितीं ॥ ७० ॥ जैसामंदराचलगिरिवर ॥ पृथ्वीन
साहेतयाचाभार ॥ मगघेऊनिकूर्मअवतार ॥ पृष्ठींधरिलीविष्णूनें ॥ ७१ ॥ तैसामर्दीतचालिलाबळप्रौ
ढीं ॥ सैन्यसंहारिलेंशतएककोटी ॥ जैसेंतडागजीवनींआडमोडी ॥ वारणकरकमळीं ॥ ७२ ॥ जैसा
उदयजाहलियाभास्करा ॥ व्योमींलोपतीग्रहतारा ॥ तैसेंनंदीनेंनिक्षेपिलेंसुरां ॥ शिवादेखतां ॥ ७३
॥ ऐसाशिवसैन्याचाकेलानिःपात ॥ मगकोपलाउमाकांत ॥ आत्तांयारणयागांत ॥ हापशुहोमावया
॥ ७४ ॥ हापशुकवणाचाकवण ॥ येणेंमानविलानारायण ॥ पराभविलासहस्त्रनयन ॥ दाकिला
कैलासीं ॥ ७५ ॥ एवढीशक्तियासिवगणाची ॥ शस्त्रेंभक्षिलींसर्वदेवांची ॥ आतामाझेनिह-
स्तेंआयुष्याची ॥ संख्यायाचीपूर्णजाहली ॥ ७६ ॥ ऐसाकोपेंखवळलात्रिपुरारी ॥ त्याक्रोधाचीक
वणादीजेसरी ॥ तोप्रळयींसर्वसंहारी ॥ तरीऐसाकवण ॥ ७७ ॥ शिवाचीउपमादीजेशिवासी
॥ ऐशीवेदाज्ञापुराणांसी ॥ मगत्र्यंबकेंवाहूनिनंदीसी ॥ युद्धासीपाचारिलें ॥ ७८ ॥ त्रिपुरांतक
म्हणेरेतृणचरा ॥ केवींअधीशजाहलासिअमरपुरा ॥ आतांतूंभवाहूनकोसेरा ॥ साहेंसंधानमाझें
॥ ७९ ॥ मगत्र्यंबकेंधनुष्यवाहिलेंवामकरीं ॥ नंदीविंधिलासहस्त्रशरीं ॥ तेंप्राणवातेंवरिच्याव-
री ॥ उडविलेनंदीनें ॥ ८० ॥ जैसेंवातचक्राचेंभ्रमण ॥ व्योमींप्रवाहेजेसेंशुष्कतृण ॥ तैसेंनंदीनेंवि
रूपाक्षाचेंसंधान ॥ उडविलेंनंदीनें ॥ ८१ ॥ ऐसेंदेखोनित्रिपुरांतक ॥ मगखवळलाजेसाप्रळ
यपावक ॥ तोशांतनव्हेत्रैलोक्यदाहक ॥ कोणेहीपरी ॥ ८२ ॥ कोटिसूर्यांचेंतेजदारुण ॥ जेणेंमा- ॥३॥
र्तंडजाहलासंतप्तउष्ण ॥ तेंसुनाभचक्रपंचानन ॥ योजिताजाहलानंदीवरी ॥ ८३ ॥ क्षणेंक-
ल्पांतकरीत्रिभुवनीं ॥ हेप्रतिसाक्षजयाचीपुराणीं ॥ तोमहात्रिशूळभाललोचनी ॥ प्रयोजीनंदी-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सी ॥ ८४ ॥ दोन्हीशस्त्रेंप्रहारीपंचानन ॥ तेव्हांनंदीनेंविकाशिलेंवदन ॥ दशनींसहस्त्रकुटकेकरून
॥ भक्षिलींशस्त्रेंदोन्ही ॥ ८५ ॥ मगनंदीक्रोधायमानशरीरीं ॥ त्राणेंझडपेंहाणीतलात्रिपुरारि
॥ नेऊनिटाकिलायोजनेंचारी ॥ नंदिकेश्वरें ॥ ८६ ॥ मगअद्भुतकोपलामहेशु ॥ ह्मणेशक्तिवंत
जाहलारेपशु ॥ मगधरोनियांमहाआवेशु ॥ प्रकाशिलातृतीयनेत्र ॥ ८७ ॥ शिवेंउघडिलातृती
यचक्षु ॥ नंदीसिप्रदीप्तकरीविरूपाक्षु ॥ तेणेंभयेंपळेसहस्राक्षु ॥ देवांसहित ॥ ८८ ॥ परीनंदी
नमानीचअग्निज्वाळा ॥ अस्त्रेंभेदअंगीच्यासेमांचकुळा ॥ मगविचारआठवलाजाश्वनीळा ॥
युद्धयुक्तीचा ॥ ८९ ॥ मगज्ञानेंविचारीविश्वंभर ॥ तंवतोत्रिमूर्त्तित्रिविधाकार ॥ ह्मणेहातंवमाझा
चिअवतार ॥ त्रिनेत्रांश ॥ ९० ॥ मगनंदीह्मणेउमाकांता ॥ तुमचींशस्त्रेंदेईनआतां ॥ तरीशक्ति
स्मरोनियांमागुता ॥ युद्धघ्यावेंआह्मासी ॥ ९१ ॥ ह्मणोनिसुनाभचक्रत्रिशूळ ॥ नंदीनेवमून
दीधलेंतत्काळ ॥ तेव्हांआश्चर्यकरितीसकळ ॥ सुरेंद्रादिक ॥ ९२ ॥ मगनंदीसिवदेउमाकांत
॥ शस्त्रेंदीधलींपूर्णभरित ॥ आतांऐसाकवणलज्जावंत ॥ जोझुंजेलतुजसी ॥ ९३ ॥ शिव
ह्मणेगाबसवेश्वरा ॥ महापुरुषार्थीक्षेत्रचरा ॥ तुझीमहाशक्तीसर्वहीसुरां ॥ अगम्यअनुप
म ॥ ९४ ॥ मगनंदीसवदेशंकर ॥ तुजदीधलाअभयवर ॥ तुझीइच्छातेमागरेनाभीकार ॥
दीधलाम्यांतुज ॥ ९५ ॥ तुझीशक्तिदेखोनपूर्ण ॥ बहुसंतोषलेंमाझेंमन ॥ आतांमीतुजजाहलों
प्रसन्न ॥ येकाळींजाणपां ॥ ९६ ॥ तंवहास्यकरीबसवेश्वर ॥ पाहाहोकेसाकृपणतोसागर ॥ तो
कूपतडागांसिउपकार ॥ केवींपांनकरी ॥ ९७ ॥ शिवामीकेसाजीदुर्बळन्यून ॥ तुजपेंकार्यआहे
जीसंपूर्ण ॥ जेतूंमजव्हावयाप्रसन्न ॥ जाहलासिसमर्थ ॥ ९८ ॥ केसेंतेजमंदजाहलेंदिवाक
रा ॥ त्यासिप्रसन्नहोऊंयेतीलतारा ॥ चिंतामणीसिस्फटिकगारा ॥ कायप्राप्तकरितील ॥ ९९ ॥
शिवाजेंजेंफळकल्पिजेमानसीं ॥ तेंतेंकल्पद्रुमपुरवीसर्वांसी ॥ तोजन्मलामाझियाकुशीं ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अमोघरत्नें॥ १००॥ नवनिधिभांडारजयापासूनी ॥सर्वकालप्रसवेचिंतामणी ॥ तोकौस्तुभमाझेनवस्तु
स्थानीं ॥जन्मलाशिवा ॥ १॥ सर्वपाकपंचामृतेंजयापाशीं ॥ जेतृप्त करूंशकेत्रैलोक्यासी ॥ माझि
यालिंगींकामधेनूसीं ॥जन्मजाहलाशिवा ॥ २ ॥ ऐसेंजेंजेंकल्पिसीअंतःकरणीं ॥ तेंतेंसमर्पी
वयाचेदानी ॥शिवातेजन्मलेमजपासूनी ॥ नवही निधी ॥ ३ ॥ ह्मणोनिचातकनामेंपक्षीश्वर॥
त्याचीवांच्छाकेवींपुरवीजलधर ॥सिद्धसाधकांसि केवींउदार ॥ होईलराजा ॥ ४ ॥ मगबसवेश्व
रवदेशिवासी ॥ त्रैलोक्यदेवातूंकैलासवासी ॥ जोप्रसन्नआह्माह्मावृयासी ॥ करितोसीप्रत्यु
त्तर॥ ५॥ तुमचेंश्रुतअसेसमर्थपण ॥ गृहमंदिरतरीश्मशान॥ मध्येंऐश्वर्यतेंसंपूर्ण ॥ विभूति
भांडार॥ ६॥ तरीतेंहीभीमसारभस्मखरा ॥ तोहीतुजम्यांप्राप्तकेलाशंकरा ॥ मगजटाजूटभस्म-
धरा॥ नामजाहलेंतुजा॥ ७ ॥ तुजजातीकुळनाहींनाम ॥ तुह्मादेशनाहींकैंचेंग्राम ॥ नगसमसि
ठावनाहींतथेंसीम ॥कैंचीअसेल॥ ८ ॥ ऐसातूंसर्वपदार्थेंकृपण ॥ आणिआह्मासिहोतोसिप्र
सन्न॥ सुगंधमृगाचेअतिगुण ॥ केवींप्राप्तसशिया ॥ ९॥ आतांशिवामीप्रसन्नतुह्मासी ॥ मी
प्राप्तकरीनजेंमानसी ॥ तुजऐसेंपात्रधुंडितांआह्मासी ॥ नसाधेत्रिलोकीं ॥ ११० ॥ नानादानींपात्र
मिळेसगुण॥ तरीमोक्षपदासिहोइजेपावन॥ मीधुंडीतहोतोंहेंचिकारण ॥ तुजऐसेंपात्र ॥ ११
॥शिवह्मणेपरियेसीभृंगमुखा ॥ मजनिरवंदिसीआपुलियाबळा ॥ प्रसन्नह्मावयाउतावेळा ॥ जा
हलासीकोटिगुणें ॥ १२॥ मगनंदीह्मणेगाविश्वनाथा ॥ तुह्मीमागावेंतुमचियाआर्ता ॥ तत्का-
ळनेदीतरीमीसर्वथा ॥ त्रिलोकींनिंदक ॥ १३ ॥ मगशंकरह्मणेमहानंदा ॥जरीऐशीअसेतु
झीशब्दमर्यादा ॥तरीसर्वकाळमाझियाविनोदा ॥ होईतूंवहन ॥ १४ ॥ तुझियापृष्ठींमीहोई
नस्वार॥ मगत्रैलोक्याकरीनसंहार ॥ प्रळयींचेतवीनजोअंगार॥ तेतुझीचशक्ती ॥ ११५॥
मगनंदीह्मणेजीपंचानना ॥ मीचिंतितहोतोंजेकल्पना ॥ तेंचिघडलेंजीत्रिलोचना ॥ माझ्यापु-

CC-0: Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पुण्योदयीं ॥ ११६ ॥ मीविचारीतहोतोंशरीरीं ॥ हाचवरमागावयात्रिपुरारी ॥ जिव्हाग्रींवसावीविधिकु
मरी ॥ हाचिवरमागीतलातुह्मी ॥ १७ ॥ क्षणएकपाहिलीतुमचीमनोवृत्ती ॥ मीतुझापशुतूंमाझापती ॥ हें
भविष्यबोलिलेंअसेवेदांती ॥ अनागतभाषा ॥ १८ ॥ तूंमजस्वामीजोडलासिपूर्ण ॥ आजिवरीमी-
होतोंअनाथदीन ॥ आतांतुमचियेशक्तींत्रिभुवन ॥ आकर्षीनसर्वहीं ॥ १९ ॥ मगनंदीप्रवर्तला
स्तवनीं ॥ ह्मणेजयजयाजीपंचानना ॥ मस्तकदेऊनिशिवचरणा ॥ घातलेंसाष्टांग ॥ १२० ॥ मीस
मर्थजीत्रैलोक्यमंडळीं ॥ मजस्वामीजोडलाचंद्रमौळी ॥ मीसर्वकाळअसेनजवळी ॥ हेंमहासुकृ
त ॥ २१ ॥ योगीश्वरांअप्राप्यज्ञानदृष्टीं ॥ जोअसाध्ययज्ञकेलियाकोटी ॥ तेंब्रह्मआरोहणमाझि
येपृष्ठीं ॥ ऐसामीसमर्थ ॥ २२ ॥ विसर्जनझालाक्रूरभाव ॥ अत्यंतप्रगटलासद्भाव ॥ तेथेंबसवेश्व-
रमहादेव ॥ नव्हतीचभिन्न ॥ २३ ॥ मगनंदीसिवदेपंचानन ॥ म्यांसमर्पिलेंतुजपूजाविधान ॥ म-
जआधींतुजस्नपन ॥ त्रैलोक्यामाजी ॥ २४ ॥ आणिनंदीसिवदेत्रिपुरारी ॥ मीतुझेंनामजप
तोंत्रिअक्षरी ॥ तोमंत्रकोणीवाचेंउच्चारी ॥ तोसखामाझा ॥ १२५ ॥ बसवाहेंनामत्रिअक्षरी-
मंत्र ॥ त्रिकाळउच्चारीतोमाझामित्र ॥ मजस्वरूपीतुजनेणेतोशत्रुअपवित्र ॥ युगानुयुगींमा-
झा ॥ २६ ॥ आणिकवदेत्रिनयन ॥ माझेंअत्यंतप्रियकाशीभुवन ॥ तेथेंतुजग्रासकरितोंस्था
न ॥ तेंनिर्वाणपद ॥ २७ ॥ काशीमध्येंजोमुक्तिमंडप ॥ त्यानिर्वाणस्थानीतूंअधिप ॥ आणिकमा
झासंकल्प ॥ तूंवंद्यत्रिलोकीं ॥ २८ ॥ शंकरवदेजीवत्सराजा ॥ माझियारहवरींच्यापूर्णध्वजा ॥
दृष्टीवेगळेंतुजसहजा ॥ नकरींक्षणभरी ॥ २९ ॥ जेकाशीयात्रासर्वकाळकरिती ॥ मुक्तिमंडपीं
बसवेश्वरपूजिती ॥ त्यांचीपुण्यसामग्रीकल्पांतीं ॥ अखुंटकेलीम्यां ॥ १३० ॥ तूंमजअगम्यजी
बसवा ॥ परीगुप्तार्थकरीनतुझीसेवा ॥ तूंवहनहेंढाडकनरमानवां ॥ त्रैलोक्यजंतूंसी ॥ ३१ ॥
आतांगुप्तकेसेंतुमचेंस्मरण ॥ तुवांभक्षिलेंपुण्यतरुखांडववन ॥ तेंतुझेंगोक्षधमौळीभूषण ॥ वंदी

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नविभूतिवेषें ॥ ३२ ॥ मजभूषणप्रियतेविभूती ॥ त्या भस्माचीतुजपासावउत्पत्ती ॥ झालीगानंदिके
श्वरामजप्रती ॥ आसनाअधिकारी ॥ ३३ ॥ येविभूतीचासत्वगुण ॥ विभूतीनेरचिलेंत्रिभुवन ॥ तेंमा
गितलेप्रसंगींनिरूपण ॥ केलेंविभूतिमहात्म्यीं ॥ ३४ ॥ मगनंदीवरआरूढचंद्रमौळी ॥ जैसेकोटि
मार्तंडउदयाचळीं ॥ देवसुमघेऊनिपुष्पांजळी ॥ पूजितीनंदीशिव ॥ ३५ ॥ दिव्यकमळांचीपूर्णवृष्टी ॥
इंद्रेंकेलीनंदीशिवांचेमुगुटीं ॥ मन्मनाभपावलाधूर्जटी ॥ पशुपतिऐसें ॥ ३६ ॥ इंद्रपदीस्थापि-
लासहस्रनयन ॥ आनंदालेंधावलेदेवगण ॥ शंकरासिजोडलेंनंदीवहन ॥ ऐशियापरी ॥ ३७ ॥ ष-
ण्मुखवदत्येगाअगस्ती ॥ ऐशीयानंदीचीमूळउत्पत्ती ॥ सविस्तरनिरूपिलीतुजप्रती ॥ साक्षेपेंक
रूनियां ॥ ३८ ॥ ऐसेंहेंनंदीशिवाचेंआख्यान ॥ जयाघडेश्रवणपठन ॥ तरीतयासिघडेदर्शन ॥ वि
रूपाक्षाचें ॥ ३९ ॥ द्वादशज्योतिर्लिंगांचीघडेयात्रा ॥ त्यासिवंदीजेसृष्टिकरधात्रा ॥ तोसर्वस्थानास
वसेसूर्यपुत्रा ॥ कृतांतासी ॥ १४० ॥ आणिविघ्नाचेंहोयनिर्विघ्न ॥ आपुल्याकांहोयपुत्रसंतान ॥ निर्ध
नांप्राप्तहोयधन ॥ याअध्यायश्रवणें ॥ ४१ ॥ आणिमनकामनापूर्णहोती ॥ चिंतिलेअर्थपावती
॥ अंतींसायुज्यमुक्ती ॥ घडेअध्यायश्रवणें ॥ ४२ ॥ शिवदासगोमाह्मणेश्रोतां ॥ हेंश्रवणकीजेजीआ
त्महिता ॥ जन्मवरीनायकीजेवार्ता ॥ आधिव्यथेची ॥ ४३ ॥ ॥ इतिश्रीस्कंदपुराणेकाशीखं-
डेनंदिकेश्वरमहात्म्यवर्णनंनामषट्षष्टितमोऽध्यायः ॥ ६६ ॥ ॥ श्रीसांबसदाशिवार्पणम
स्तु ॥ ॥ अध्याय ॥ ६६ ॥ ॥ ओव्या ॥ १४३ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri



CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः॥ ॥अगस्तिवदेजीषड्वक्त्रा॥तुह्मांशरणजीअष्टादशनेत्रा॥जैसासृष्टिका
र्यासिआनंदेधात्रा॥तैसातूंमजस्वामी॥१॥स्वामीतुमचियाउपकारा॥उत्तीर्णन्व्हेजीशिवकुम
रा॥स्वामीक्षुधातुराचियासागरा॥क्षीरार्णवातूं॥२॥तूंमजअशक्ताचीकामधेनु॥मजचिंता
तुराचाचिंतामणु॥तूंमाझियाकल्पनेचासंपूर्णू॥कल्पद्रुमहोसी॥३॥माझेंतपसामर्थ्यजी
थोडकें॥तुह्मासिघालीतसेंपृच्छेचेंसांकडें॥आह्मानतुळोंजीतुमच्यापाडें॥परीक्षमाकरीतसां
॥४॥जैसेंमानवींआणिलेंमृगधरासी॥बहुप्रीतिअंतरतुळितांस्पर्धेसी॥तयापाडेंपरीसाम
र्थ्यलोकासी॥कौतुकतयाचें॥५॥तैसामीमर्कटशरीर॥मजतुह्मासिबहुप्रीतिअंतर॥मज
देतांपृच्छेचापरिहार॥हेक्षमातुमची॥६॥भक्तिविणमजहोनांप्रसन्न॥यागाविरहितदेतांअव
दान॥स्वामीपात्राविणसमर्पण॥करितांदानें॥७॥तरीप्रश्नअसेजीस्वामीस्कंदा॥दक्षेंकेलीशं
कराचीनिंदा॥मागुतीपूजिलेंसच्चिदानंदा॥विश्वनाथासी॥८॥दक्षनिरवंदीत्रिनयना॥आ
णिकैसाआलागंगेचियास्नाना॥काशीमध्येंस्थापिलेंपंचानना॥तेंदक्षेश्वरलिंगपैं॥९॥ते
णेंकिमर्थजीशिवनिंदिला॥आणिकिमर्थजीशिववंदिला॥शिवादक्षांकलहोजोडला॥किंनि
मित्तस्वामी॥१०॥तंवस्वामीह्मणेश्रोतोत्तमपात्रा॥मित्रावरुणसुतामहापवित्रा॥श्रवण
कीजेगादक्षचरित्रा॥सांगेनसविस्तर॥११॥विरिंचीदेवाचेसप्तहीकुमर॥तेसप्तऋषीम
हासृष्टिकर॥त्यांमध्येंसमर्थराजेश्वर॥तोदक्षराजा॥१२॥त्यासिब्रह्मयाचेअंगुष्ठींउत्पत्ती
॥विधीनेंनामठेविलेंप्रजापती॥पत्नीमेळविलीनामेंप्रसूती॥स्वयंभुमनूचीकन्या॥१३॥म
गक्षिप्रागंगेचेतिरीं॥बृहस्पतीनामेंपुण्यपुरी॥दक्षकेलातेथींचाअधिकारी॥विधीनेंस्वह
स्तें॥१४॥ऐसातेथेंदक्षराज्यकरिता॥सर्वदेवऋषींचाझालासेदाता॥इच्छादानदेतसेप्र
सूता॥पतिव्रतात्याची॥१५॥ऐसेंक्रमिलेबहुतकाळवरी॥मगदक्षासप्रार्थीतसेसुंदरी॥पुत्रप्रज

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नाहीं आपुल्यामंदिरीं ॥ पुत्रेंविणगृहअशोभ्य ॥ १६ ॥ मगदक्षप्रियेचियामना ॥ कुळगुरूसिझालाआरा
धिना ॥ तवतोदधिचिमहाऋषिहोता ॥ नैमिषारण्यीं ॥ १७ ॥ तोदधिचीआलाबृहस्पतिपुरा ॥ दक्षेंस
न्मानकेलातयामुनिवरा ॥ मृगाजिनीपूजिलेंऋषीश्वरा ॥ महाआदरें ॥ १८ ॥ तवगुरूसमार्थीदक्षराजा ॥
आणिप्रसूतापत्नीसलज्जा ॥ म्हणेजेणेंपाविजेपुत्रप्रजा ॥ तेंभक्तीसांगआह्मां ॥ १९ ॥ प्रजापतीसवदेऋ
षीश्वर ॥ कन्यादानाचीसामग्रीअपार ॥ मगआराधिजेतोवैश्वानर ॥ पुत्रकामनेस्तव ॥ २० ॥ मगदक्षें
यागकेलासंतुष्टी ॥ कन्याजाहल्यासालंकृतासाठी ॥ मगत्याक्षिप्रागंगेचेतटीं ॥ दक्षानेंकेलेंस्वयंवर ॥
२१ ॥ कृतांतआणिगार्हपत्याग्न ॥ नैर्ऋत्यमार्तंडआणिवरुण ॥ चंद्रसमीरआणिपंचानन ॥ हेजामातकेले
२२ ॥ बहुकाळक्रमिल्याउपरी ॥ महापुण्याधिकात्यादक्षकुमरी ॥ ऐसेवरलाधल्यासुंदरी ॥ पूर्वतपसुकृतें
२३ ॥ ऐशात्याकन्याआपुलेमंदिरीं ॥ स्वामीभक्तिणीसुखशेजारी ॥ परीतोदक्षराजाचिंताकरी ॥ कन्यासुख-
दुःखाचिया ॥ २४ ॥ दक्षराजावदेप्रसूतीसी ॥ शुभगुणीजामातजोडलेआह्मासीं ॥ पारनाहींकन्यांचियाभा
ग्यासी ॥ जोडलेइच्छावर ॥ २५ ॥ अवघियाजामातांमाजीक्रूर ॥ महादुष्टबुद्धीतोअमृतकर ॥ तेसाचि
अभिमानीलाधलावर ॥ दाक्षायणीतें ॥ २६ ॥ आपुलेमंदिरींस्वगुणेंवर्तता ॥ संज्ञेसिपीडाकरीतोसांवेना ॥
कन्याप्रसवलोंपरीचिंता ॥ नजायेचिमाझी ॥ २७ ॥ जरीमीदक्षप्राणेंस्वस्थअसेन ॥ तरीत्याकन्येचेंउस
नेंघेईन ॥ यज्ञकाळींत्यांचामानहरीन ॥ देवांमाजीसर्वथा ॥ २८ ॥ मगत्याबृहस्पतिपुरनगरीं ॥ अ
नुपमदक्षराजाचेघरीं ॥ पुत्रेष्टीयागाचीसामग्री ॥ आरंभिलीदक्षानें ॥ २९ ॥ मगत्यानेंमिषारण्या-
माझारी ॥ त्याक्षिप्रागंगेच्यापुण्यतीरीं ॥ यज्ञमंडपबरवियापरी ॥ घातलादक्षानें ॥ ३० ॥ पाचारिले
महाजुनाटऋषी ॥ मूळपाठविलेंइंद्रादिकांसी ॥ गणगंधर्वस्फुरयागासीं ॥ आलेदक्षाचिया ॥ ३१ ॥
अष्टहीजामातआलेदिग्पती ॥ हरिविरिंचिआणिपशुपती ॥ महाअद्भुतसभादाटलीयुक्ती ॥ नृत्यांगनापा
वलिया ॥ ३२ ॥ पूज्यमानबैसलेत्रिपुरारी ॥ सभापतीशोभायमानहरी ॥ विरिंचिजाहलासेआचारी

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दक्षयागीपें ॥ ३३ ॥ मगप्रदीप्तकरूनिहुताशना ॥ महाऋषिप्रवर्त्तलेहवना ॥ अंगिरावसिष्ठहेकर्मत्रे
यविधाना ॥ कथितीहव्यें ॥ ३४ ॥ स्वाहाशब्देंहविती होमीं ॥ ऋषमंडळीज्वालाकोंदल्याव्योमीं ॥ अवदानेंसंक
ल्पितीमंत्रनेमीं ॥ मरीचिभार्गव ॥ ३५ ॥ ऐशीयागाची होतसेविधिपूजा ॥ यागआरंभिलापुत्रकाजा ॥ तं
वयज्ञमंडपींदक्षराजा ॥ आलाहव्यसामग्रीसी ॥ ३६ ॥ अग्निऋषीनें घेतलीयज्ञदीक्षा ॥ दानमंडपींबैसविलें
दक्षा ॥ सभाअवलोकितांविरूपाक्षा ॥ देखिलेंपूज्यस्थानीं ॥ ३७ ॥ सर्वजामातआलेप्रियाघेउनी
॥ दिव्यांबरेंमिरवतीयागस्थानीं ॥ तेथंउमेतनदेखेचिनयनीं ॥ दक्षराजतो ॥ ३८ ॥ ह्मणेसर्वकन्याआ
लियाअध्वरीं ॥ यज्ञमंडपीनदेखेचिगौरी ॥ आपणाचिआलाहात्रिपुरारी ॥ स्त्रियेविणयागासी ॥ ३९ ॥
शिवबैसलापूज्यसिंहासनीं ॥ दक्षाचाप्रदीप्तझालाक्रोधाग्नी ॥ ह्मणेपरिसारेमाझीवेदवाणी ॥ समस्त
देवहो ॥ ४० ॥ गृहींत्यागोनियांस्त्रियासुंदरा ॥ आपणऋभिजेयागस्वयंवरा ॥ स्त्रीविरहितसोभागपुन
रा ॥ नाहींगामंडपीं ॥ ४१ ॥ ज्याज्यापतिव्रताकुलांगना ॥ स्वामिभक्तिणीतारुण्यसगुणा ॥ त्यांसिवं
चूनिकार्यकारणां ॥ ^ क्रमितांअशोभ्य ॥ ४२ ॥ आपणऋमिजेकार्याकारणीं ॥ गृहींएकलीठेवूनि
कामिनी ॥ दासीपुत्रप्रजातरीभुवनीं ॥ स्वस्रूरखेंचिकांनसो ॥ ४३ ॥ तरीहानिपुत्रिकत्रिपुरारी ॥ या
नेंगृहींठेविलीसुंदरी ॥ केसामिरवतोसभेमाझारीं ॥ निर्लज्जशूळिया ॥ ४४ ॥ येरजामात-
माझेपुत्रप्रजांसी ॥ यागकरावयाआलेसहस्त्रियांसी ॥ तेसानदेखांहाश्मशानवासी ॥ दीर्घ
जटियांहा ॥ ४५ ॥ कोठंतेसुंदरीदक्षबाळी ॥ तियेसिकेसानिमिलाशूळी ॥ सर्वदेवांदे
गळाविभाळीं ॥ तृतीयनेत्र ॥ ४६ ॥ गौरीऐशासुंदरीचाकरोनित्याग ॥ अक्षतेविणपाहूंआला
याग ॥ आजियासिनद्यावारेयज्ञभाग ॥ हेचिआज्ञामाझी ॥ ४७ ॥ यासिह्मणतारेशंभु
महेश ॥ याचेंकवणनगरकवणवेष ॥ कवणयाचागुरुउपदे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श॥ कवणअधिकारयासी ॥ ४८ ॥ यासिह्मणतीशिवपंचानन ॥ जातीनाकुळऐसाहाकवण ॥ यासि
राहावयासिएकस्थान ॥ नदेखोंआह्मी ॥ ४९॥ यासिदेवह्मणतीईश्वर ॥ तरीहासंन्यासीनादिगं-
बर॥ ज्ञाताह्मणोतरीशरीरस्मर ॥ असेनायासी ॥ ५० ॥ सुंदरह्मणोतरीपंचवक्र ॥ दशभुजपंचद-
शनेत्र॥ महाप्रळयांतीशत्रुविचित्र ॥ त्रैलोक्याचा ॥ ५१ ॥ क्षत्रियह्मणोंतरीअस्त्रनसेसुष्टी ॥ अश्वना
हींबैसेवृषभानेपाठीं ॥ स्त्रियाप्रहरूनिगिरिकुटीं ॥ रिघतसेवेळोवेळां ॥ ५२ ॥ ब्राह्मणऐसेंह्मणावें
याप्रती ॥ तरीयासिनेणतीवेदश्रुती ॥ पंचाग्निषट्कर्मनीती ॥ अगम्ययासी ॥ ५३ ॥ शूद्रह्मणोंतरी
गृहींनाहींसृष्टी ॥ सर्पाचेंजानवेंसुनीलकंठीं ॥ अर्केरूनिचंदनागुरूचीउटी ॥ लावीतसेभस्मधूळी॥
॥ ५४ ॥ गृहस्थजरीह्मणावापंचाननी ॥ तरीयाचेंराहाणेंश्मशानीं ॥ तेथेंकनकपत्रींपुष्पींसूळ
पाणी ॥ पूर्णअसेहार ॥ ५५ ॥ ब्रह्मचारीह्मणोहाभाललोचनी ॥ तरीगृहींसुंदरीदाक्षायणी ॥ त-
येविरहितमंडपस्थानीं ॥ मिरवतसेपूज्यमान ॥ ५६ ॥ जरीवानप्रस्थह्मणावेंयासी ॥ तरीअन्न-
नाहींभक्षावयासी ॥ त्रैलोक्यस्मरतसेवृथाचियासी ॥ ऐसाहाकवण ॥ ५७ ॥ यासिराहावया
नाहींदेश ॥ कवणमातापिताकवणग्रामींवास ॥ कवणाचाशिष्यकवणवेष ॥ हेंनेणोंआह्मी ॥ ५८
॥ हालाहळभक्षीसुनीलकंठ ॥ धर्मकर्मनेणेआचारभ्रष्ट ॥ नित्यभाळींविभूतीचात्रिपुंड्र ॥ भयंक
रहा ॥ ५९ ॥ शार्दूलचर्मींकरीहाशयन ॥ गजचर्मयासिपरिधान ॥ शंखरुद्राक्षांचेंआभरण ॥
वाहतसेभारहा ॥ ६० ॥ अनेकनामींहाजाश्वनीळ ॥ हाकधींनाहींदेखिलासुशीळ ॥ सर्वपदा
र्थींअमंगळ ॥ कवणेंपाचारिला ॥ ६१ ॥ ऐसाअमंगळक्रोधीथोर ॥ यासिदेवह्मणतीईश्वर ॥ ऋषी
देवद्विजवज्रधर ॥ ह्मणतीहास्वामीआमुचा ॥ ६२ ॥ सर्वांमाजीश्रेष्ठयासिह्मणती ॥ जामातांची
ऐशीचनीती ॥ सासरियाचेंगृहींमिरविती ॥ वाडगीचथोरीव ॥ ६३ ॥ बैसावेंऊर्ध्वमानकरूनी ॥ म
हावरिष्ठउंचसिंहासनीं ॥ पाहेआह्माकडेविकटलोचनीं ॥ दीर्घनिर्लज्जहा ॥ ६४ ॥ तैसाचिनि

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

लेऊनअमृतकर ॥ तोसत्तावीसकुमरींचावर ॥ सन्मनपूजेचाबडिवार ॥ नकरीआह्मासी ॥ ६५ ॥ तेणें
एकवंचिलेंकृत्तिकेसी ॥ आणिप्रीतिकेलीरोहिणीसी ॥ मगम्याशापूनितयासी ॥ कलंकलाविला ॥ ६६
तैसाचिहाशूळियाकरीन ॥ देवांमाजियाचामानहरीन ॥ तरीच्चमीदक्षराजहोईन ॥ पुत्रविरिंचिता
याचा ॥ ६७ ॥ ऐसेंत्यादक्षरायाचेंवचन ॥ ऐकोनिस्तब्धझालेसमस्तगीर्वाण ॥ तंवऋषीश्वरींसा
रिलेंहवन ॥ पूर्णाहुतीनें ॥ ६८ ॥ मगप्रवर्तलेआशीर्वचना ॥ पूर्णकेलीदक्षाचीकामना ॥ मगप्र
वर्तलेदक्षिणादाना ॥ सत्पात्रांसिसन्मानें ॥ सुखीकेलेसर्वदेवऋषी ॥ अलंकारदीधलेजामातां
सी ॥ परीआदरनकरीचशिवासी ॥ हरिलामानतयाचा ॥ ७० ॥ मगदक्षह्मणेसर्वदेवांसी ॥ य
ज्ञभागनद्यावासिवासी ॥ मगतोयाससठीपवतीसी ॥ राहोंनेदीचशापें ॥ ७१ ॥ ऐसाअपमानि
लात्रिनयन ॥ शिवाचेंवर्जिलेंभागदान ॥ परीशिवनकरीचप्रतिवचन ॥ श्वशुरत्वह्मणोनी ॥
॥ ७२ ॥ ऐसाअपमानदेखोनिशंकरा ॥ तंवकोपनसांवरेचिनंदिकेश्वरा ॥ उठावलास्वामीचे
कैवारा ॥ अतुर्बळीतो ॥ ७३ ॥ ह्मणेदक्षागर्विष्ठाथोरा ॥ विनाशकाळआलारेअविचारा ॥ शि
वाचा भागनदेतांअध्वरा ॥ जयकेंचायेईलपें ॥ ७४ ॥ ऐसायामहीमंडळींकवण ॥ जोशंकरा
चाभागकरीलजीर्ण ॥ वमूनिकाढीनतेंअवदान ॥ प्रमथापासोनी ॥ ७५ ॥ शिवाविरहितजेयज्ञ
सिद्धी ॥ तेकैंशीभासहोईलसिद्धी ॥ सुखासाठींघेतलीव्याधी ॥ गर्विष्ठाप्रजापती ॥ ७६ ॥ तुवां
निंदिलाविश्वंभर ॥ तुजकांनाहींशरीरस्मर ॥ शिवेंविणजोस्थापीलअध्वर ॥ तोनिष्फळजा
णावा ॥ ७७ ॥ शार्दूलाचेंभक्ष्यभोजन ॥ तेंजंबुकासिकेवींहोयजीर्ण ॥ जैसावस्त्रींबांधोनिहु
ताशन ॥ यत्नकरूंपाहासी ॥ ७८ ॥ अरेजेंभागदानशंकराचें ॥ तेंहालाहलसिंधुमथनींचें ॥
एकशंकराविरहीतत्याचें ॥ नकरवेप्राशन ॥ ७९ ॥ अमृतास्तवमथिलेंसिंधुजळ ॥ अमृत
तेंचिजाहलेंहालाहल ॥ तेथेंसंहारिलेंदैत्यकुळ ॥ अमृतभागास्तव ॥ ८० ॥ तैसातुह्मीराखिला

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

शिवाचाभाग॥ आतांकवणकरीलरेयाग ॥ भलतापुढेंपडेलजौप्रसंग॥मगतेसादेखों ॥८१॥
परीशिवाचाभागतोअतिक्रूर॥येणेंदक्षातुझेंजाईलरेंशिर॥पूर्णाहुतीकरूनिअध्वर॥सुखि
याकरूंआह्मी ॥८२॥कवणयागकरीलपृथ्वीवरी॥ऐसाकवणशंकराचावैरी॥रुद्राचाभा
गदेईलतरी॥सुखेंविकानकरी ॥८३॥तुवांनिंदिलात्रैलोक्यस्वामी॥दक्षातुझेंशिरपडेलरेंहो
मीं॥सहस्रवरुषेंहोशीलभूमी॥प्रेतरूपतूं ॥८४॥ऐसाअनुवादलानंदिकेश्वर॥तंवक्रोधाच
ढलातपेश्वर॥जोदक्षाचाप्रतिबंधुवर॥भृगुनामें ॥८५॥भृगुह्मणेनंदीतृणचरा॥कैचीशाप
देशीदक्षेश्वरा॥तुह्मासिअल्पकरीनवसुंधरा॥पळतांमजभेणें॥८६॥यापिसाडियाचीऐशीच-
जाती॥गृहस्थातेंदेखोंनशकती॥केसायागवर्जिलारेक्षितीं॥ऐसेकवणतुह्मी॥८७॥क्रोधेंअ
धररगडोनियांदांतीं॥तेणेंओष्ठरोमाग्रपिळोनिहस्तीं॥मगबोलताजाहलानंदीप्रती॥शापदान
तें॥८८॥दक्षाऐसाशापिलामहादानी॥तूंहीपृष्ठींभारवाहशीमेदिनी॥तृणभक्षीमागुतांवमू
नी॥पशुवतूं॥८९॥ऐसात्याभृगूचेशापशब्दीं॥अतिक्रोधायमानजाहलानंदी॥तंवउठावलेगणशै
लादी॥आणिभृंगीरिटी॥९०॥तंवशैलादिह्मणेरेभृगुवा॥तुह्मीगृहस्थकेसेआलेतदेवा॥कृपण
पिसाठह्मणतांमहादेवा॥दंतअधरछेदीन॥९१॥तुझेंअरुपनामभृगु॥तरीओष्ठमार्गेंकरीनभं
गु॥तृप्तकरीनमहायागु॥दक्षरुधिरेंकरूनी॥९२॥तोंपूर्णाहुतीजाहलाअध्वर॥मगबोलिलेस
र्वेसुर॥होतीलदोनसहस्रकुमर॥दक्षराजासीपैं॥९३॥यापुत्राचेंजेंसुखकारण॥तेंदक्षातूंन
ल्हसीगापावन॥तरीदोनसहस्रपुत्ररत्न॥दक्षातुजअसमास॥९४॥नाहींसंतोषविलेंवृषभध्वजा
॥यज्ञभागरक्षिलासहज॥तरीदक्षापुत्रसुखतुज॥असामजाणा॥९५॥कन्याहोतीगातु
झ्याघरीं॥परीपुत्रनदेखसीमंदिरीं॥मगमौनेंचउठिलेत्रिपुरारी॥जाहलेनंदीआरूढ॥
॥९६॥शिवगणेंसित्रिपुरहंतु॥निघताजाहलाउमाकांतु॥विसर्जनजाहलीअकस्मातु॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कान्दं समास सकळदेवांची ॥ ९७ ॥ ऐसें तयें जाहलें जीं शापदान ॥ परी दधिचिऋषि मंत्रप्रवीण ॥ तेणें सिद्धि
॥४॥ नेलें यज्ञकारण ॥ बहुतां स्थळीं ॥ ९८ ॥ तेणें संपूर्ण केला जी अध्वर ॥ दक्षासि जाहले दोन सहस्त्र
कुमर ॥ ते दधिचिऋषीनें मंत्राकार ॥ मंत्रपिंड ते ॥ ९९ ॥ दक्षाघरीं झाली वाद्यध्वनी ॥ थोर उत्सा
ह जाहला अंतःकरणीं ॥ दोन सहस्त्र पुत्र देखोनी ॥ आनंदला दक्ष ॥ १०० ॥ तंव त्या बृहस्पति
पुरपट्टणीं ॥ दक्षभेटीस आले नारदमुनी ॥ तो दक्षें पुजिला सन्मानोनी ॥ बंधुवर्गपणें ॥ १ ॥ पु
त्र आणिले नारदापासी ॥ दक्ष आनंदला निर्भर मानसीं ॥ मग प्रतिवचन नारदासी ॥ वदता जा
हला ॥ २ ॥ दक्ष ह्मणे तूं ब्रह्मचारी पुरुष ॥ पुत्रासि दीजे मंत्रउपदेश ॥ जेणें प्राप्त होय आयास ॥ रा
ज्याधिकाराचा ॥ ३ ॥ मग नारद मंत्र सांगे त्यांसी ॥ एकचि उपदेश समस्तांसी ॥ मंत्रविधि सांगोनि
वेगेंसी ॥ क्रमिलें नारदें ॥ ४ ॥ मग ते क्षिप्रागंगेचिया तीरा ॥ दक्षपुत्र गेले मंत्रोच्चारा ॥ अनुष्ठान
साधितां एकसरां ॥ जाहले ते संसार चलित ॥ ५ ॥ मग त्यांहीं सेविलें ब्रह्मारण्य ॥ गृहीं यावयाचें
नाहीं ज्ञान ॥ ते सर्वही झाले चित्तीं निरंजन ॥ गेले गिरिकूटीं ॥ ६ ॥ गृहस्थाश्रमाची जे पद्धती ॥ ते
दक्षपुत्रीं नागीकारिली ॥ समस्तही योगपंथें गेले ती ॥ नारदउपदेशें ॥ ७ ॥ तेणें दक्ष दुःखित जा
हला मनीं ॥ ह्मणे शापिलें शिवाच्या गणीं ॥ जे पुत्र अप्राप्त होती भवनीं ॥ दक्षराजाच्या ॥ ८ ॥
पश्चात् हें झालें नारदाचें कारण ॥ ते शापशब्द न करी भंजन ॥ वृथा चि पराभविलें यज्ञ ॥ पुत्रेंवीण ते
॥ ९ ॥ आतां पुत्रें विरहित शरीर ॥ सर्वही जीवित असार ॥ राज्यलक्ष्मी दान गृहमंदिर ॥ वृथा
चि हें सर्वही ॥ ११० ॥ तरी तो पुत्रविरहित कैसा नर ॥ जैसा कृष्णपक्षींचा शीतकर ॥ अमावास्या
दिनींचा अंकुर ॥ असे चि ना कोठें ॥ ११ ॥ तैसा माझा जाहला संसार निष्फळ ॥ समस्त पुत्रीं
सेविलें कुळाचळ ॥ राज्याधिकारी क्षितिमंडळ ॥ रक्षिता नाहीं च ॥ १२ ॥ ऐसें शतएकसंवत्स ॥४॥
र ॥ तंव आला नारद मुनीश्वर ॥ मग त्यासि वदला शापउत्तर ॥ प्रजापती तो ॥ ११३ ॥ ह्मणे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

गानारदमुनिबंधु ॥ बरवाउपदेशिलाज्ञानबोधु ॥ सर्वांहिकेलेमंत्रसाधु ॥ कपटियामुनीं ॥ १४ ॥ आ
तांघेइजेमाझेंशापदान ॥ जैसेंपुत्रांसिउपदेशिलेंज्ञान ॥ तैसेंतूंहीकरशीभ्रमण ॥ त्रैलोक्यमंडळीं ॥
॥ ११५ ॥ तंवनारदह्मणेगाप्रजापती ॥ आतांएकस्मरतेंमाझेचित्तीं ॥ तुझियासंसाराचीव्हावयाशां
ती ॥ तोकाळआतांजवळीअसे ॥ १६ ॥ तरीमाझेंघेईशापदान ॥ तूंजन्मार्शांहोऊनिपाषाण ॥
जडलदांटेलरेसंपूर्ण ॥ शिवनिंदकातूं ॥ १७ ॥ मगनारदेंक्रमिलेंतेथूनी ॥ दक्षचिंतातुरजाहा-
लामनीं ॥ ह्मणेमजऐसामहादानी ॥ अल्पयात्रिलोकीं ॥ १८ ॥ अध्वरयशींसहस्रऋषीश्व
र ॥ सर्वदेवगणगंधर्वसुर ॥ मीजेव्हांआरंभितोंअध्वर ॥ तेव्हांतृप्तसमस्त ॥ १९ ॥ जेथेंपा
चारितोंयाशूळियासी ॥ तेव्हांत्यायज्ञींहोतसेविवशी ॥ अवघेमिळतातिभक्षावयासी ॥
क्षीरसर्पिमृगमांस ॥ १२० ॥ अवदानाचाकरितीक्षया ॥ आह्मासिनदेतीपुत्रार्थजया ॥ पाहोनि
यज्ञकार्याच्यासमया ॥ धांवतातिअक्षतेविण ॥ २१ ॥ माझेयागींभक्षावयाअवदान ॥ शिवतो
येतसेभूतेंघेऊन ॥ आपणराहतसेकपटधरून ॥ पंचमुखीजटिल ॥ २२ ॥ आपणहोतसे
पंचमुखी ॥ सांगातेंआणितोनशासारिखीं ॥ कंठींबांधोनियांसहस्रमुखी ॥ सर्पतोहीपा-
हेपां ॥ २३ ॥ ऐसादक्षराजाचिंतातुरझाला ॥ नारदशापदेऊनिगेला ॥ मगप्रजापतिविचारितांझाला
॥ कांहींएककेपें ॥ २४ ॥ ऐसेसहस्रएकसंवत्सर ॥ दक्षजाहलाहोताचिंतातुर ॥ मगकरितांजाहला-
विचार ॥ कांहींएकयागाचा ॥ १२५ ॥ तेणेपुनरपियोजिलाअध्वरु ॥ पाचारिलादधीचीपूर्णगु-
रु ॥ नानासुगंधींपूजिलाऋषीश्वरु ॥ प्रजापतीनें ॥ २६ ॥ दक्षराजाह्मणेजीकृपानिधी ॥ द-
धीचिस्वामियासयज्ञसिद्धी ॥ ऐसाआरंभिजेयागविधी ॥ अक्षयगती ॥ २७ ॥ तंवदधिचिह्म-
णेदक्षराजा ॥ आणिकयागकरीबरवियावोजा ॥ जेप्राप्ततुह्मासिपुत्रप्रजा ॥ ऐसाविधिकी-
जे ॥ २८ ॥ आपणाकायशींपुत्रकामना ॥ वहिलेंकरूंमागुतीहवना ॥ द्रव्यसमर्पूनिहुताश-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ना॥ होईलसिद्धी ॥ १२९ ॥ मगदक्षबोलिलातयेवेळीं ॥ अवघेपाचारूंयज्ञकाळीं ॥ परीनबोलाविजेहाशूळी ॥पिसाटासी ॥ ३० ॥ ऋषिह्मणेतथास्तुबरवें ॥जेसेंप्रियतुह्मासितेसेंआरंभावें॥पुनरपियागमांडिलास्वभावें ॥ पुत्रकामनेस्तव ॥ ३१ ॥ अक्षतापाठविल्यासर्वांसी ॥सुरनरपन्नगइंद्रादिकांसी ॥ यक्षराक्षसगणगंधर्वांसी ॥ पाठविलेंमूळ ॥ ३२ ॥ बरवीकेलीयागआहुती ॥ यज्ञमंडपयातलेबहुयुक्ती ॥ शतयोजनेंरुंदलीक्षिती ॥त्यानेमिषारण्यीं ॥ ३३ ॥ आणिलेमहासमिधांचेभार ॥पाचारिलेयज्ञसिद्धऋषीश्वर॥ विरिंचिनाथादिदेवआणिसृष्टिकर॥ आलेदक्षयागासी ॥ ३४ ॥ सर्वहीपाचारवेमहायज्ञीं ॥ एकनबोलवावापंचाननी ॥ समस्तकन्येमध्येंदाक्षायणी ॥मृतवतझालीआह्मातें ॥ ३५ ॥ दक्षेंपाचारिलेआपुलेबंधू॥ वेगेंआलेमहायज्ञसाधू ॥ पितापाचारिलाविधू ॥सत्यलोकाधिपती ॥ ३६ ॥ विरिंचिह्मणेदक्षदूतासी ॥ आह्मीसर्वयावेंकैसेंयागासी ॥ शिवनाहींतेथेंमहाविवसी ॥उद्धवेलसत्य॥ ३७ ॥ जेथेंशिवासिनाहीं भागदान॥ तेंनिष्फळगायज्ञकरण॥ रुद्राविरहितभागकोण ॥ मर्षालतेथें ॥ ३८ ॥ मूळपाठविलेंक्षीरसागरा॥ शेषशयनाशार्ङ्गधरा॥ वेगेंयावेंजीबृहस्पतिपुरा ॥दक्षयागासी ॥ ३९ ॥ दक्षदूतांसिह्मणेशार्ङ्गधर॥ वृथाचिकांआरंभिलाअध्वर ॥ जेथेंनाहींउमाशंकर॥ निष्फळतोयाग ॥ १४० ॥ ऐसेंजेविरिंचेंवांविरहित॥ दक्षेंपाचारिलेजेसमस्त ॥ अगस्तीसवृंदेशिवसुत॥ षडाननतो ॥ ४१ ॥ ऐसादक्षेंआरंभिलायज्ञ ॥ शंकरासधरिलाअभिमान॥ तेंसिद्धीकैसेंपावेअवदान॥ दक्षराजाचें ॥ ४२ ॥ जेथेंनाहींब्रह्माहरिहर॥ येरजामातआलेबंधुसत्वर॥ तेकवणकवणसविस्तर॥ निरूपूंश्रोतयांसी ॥ ४३ ॥ श्रोतींएकाग्रकरावेंमन॥ शिवकथेसिअर्पिजेश्रवण॥ तरीमहादोषांसिहोयदहन॥ ह्मणेशिवदासगोसावी॥ ४४ ॥ ॥ इतिश्रीस्कंदपुराणेकाशीखंडेदक्षचरित्रवर्णनंनामसप्तषष्टितमोऽध्यायः॥ ६७ ॥ ॥ श्रीसांबसदाशिवार्पणमस्तु ॥ ॥ अध्याय ॥ ६७ ॥ ॥ ओव्या ॥ १४४ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

का०खं० श्रीगणेशायनमः ॥ ॥ अगस्तीसवदेशिवकुमर ॥ ह्मणेपरियेसीदक्षाचाअध्वर ॥ श्रवणपठनें अ०
॥१॥ होतसेसंहार ॥ मनोमळाचा ॥१॥ राजामहादानीप्रजापती ॥ यागींपाचारिलेत्रैलोक्यभूपती ॥ ॥६८॥
स्वामीसह्मणेमुनिअगस्ती ॥ तेंपरियेसीआतां ॥२॥ प्रथमपाचारिलेदधीचिऋषी ॥ एकांतींआले
चकेलातयासी ॥ दक्षराजाह्मणेगामहाऋषी ॥ परिसावचनमाझें ॥३॥ सर्वदेवअत्यंतप्रीतीं ॥ पाचा
रीनइंद्रादिकभूपती ॥ परीतोमाझ्यायज्ञीं पशुपती ॥ आणिनाचमीसर्वथा ॥४॥ दधीचिह्मणेगाब्र
ह्मसुता ॥ जेंअत्यंतप्रियतुमच्याचित्ता ॥ तेंचिआरंभूंपरीविलंबआतां ॥ नकीजेयागासी ॥५॥ स
हस्रवर्षेपर्यंतगीर्वाण ॥ त्यांसिअप्राप्तजाहलेंभागदान ॥ त्यांचातपतरणीउदयजोयज्ञ ॥ तुझि
यागृहीं ॥६॥ हर्षेनिर्भरदक्षप्रजापती ॥ पाचारिलेदेवदिग्पती ॥ मगतेबृहस्पतिपुराप्रती ॥
आलेकवणकेसे ॥७॥ तेहतीसकोटिदेवपरिवार ॥ सत्यवतीसुंदरीजयवंतकुमर ॥ कश्यप
अदितींचासुतवज्रधर ॥ आलागजवहनें ॥८॥ तीनकोटिसैन्येंसीमेषवाहन ॥ ज्वलिनी
दहनीप्रियेसिहुताशन ॥ तोशुचिस्मितावैश्वानरांचानंदन ॥ आलागार्हपती ॥९॥ चतुर्दश
कोटिसैन्य ॥ धर्मराजमहिषवाहन ॥ तोसंज्ञामार्तंडांचानंदन ॥ यमआलाअसे ॥१०॥ चार-
कोटिसैन्यअतिक्रूर ॥ सूकरवाहनविषिणीसुंदर ॥ तोशिवगौरींचावरदकुमर ॥ निर्ऋतीआला ॥११॥
अष्टकोटिजयाचेंपरिवारसैन्य ॥ पावनीप्रियासहितशशकवाहन ॥ तोकश्यपादितींचानंदन ॥ मारु
तआला ॥१२॥ साठकोटिजयाचापरिवार ॥ वाहनपालाणिलाजीमगर ॥ जलसेनाप्रियेसिकर्दम
कुमर ॥ वरुणआला ॥१३॥ अत्रिऋषीचाजोवीर्यांकुर ॥ रोहिणीकृत्तिकेंचाप्रियवर ॥ तोमृगवाह
नअमृतकर ॥ आलासहप्रियांसी ॥१४॥ ऐसेदिग्पतीमहाद्भुत ॥ आलेदक्षाचेजामात ॥ परीना
हीं आलातोकांत ॥ दाक्षायणीचा ॥१५॥ त्रयोदशपतिव्रताजयासी ॥ तोकश्यपआलासक ॥१॥
ळस्त्रियांसी ॥ दक्षराजाचेबंधुप्रियांसी ॥ आलेकेसे ॥१६॥ श्रेष्ठबंधुआलामरीचिज्ञाता ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥ ६४ ॥ हे वाराणसीचे ब्राह्मण महाद्वेषी ॥ क्रूरदृष्टीं पाहाती आपणासी ॥ जैसा मूषक सापडे बि-
रवारासी ॥ तो प्राणें स्वस्थ कैंचा ॥ ६५ ॥ आतां विचारावें येरवादें स्थान ॥ जेथें आपणासि द्रव्य हें होय जी
र्ण ॥ येऱ्हवीं या काशीचे ब्राह्मण ॥ दुष्टग्रह जैसे ॥ ६६ ॥ तरी कांते विलंब न करीं आतां ॥ सूर्योदय न क
री आपणांसि जातां ॥ पुत्रकलत्रेंसि निघता ॥ जाहला तो ब्राह्मण ॥ ६७ ॥ तेणें द्रव्याचे चार विभा
ग केले ॥ सून पुत्रां पाशीं दोन दीधले ॥ आपण दोन अंगीकारिले ॥ स्त्रीपुरुषीं ॥ ६८ ॥ निशीक्रमो
नि तृतीय प्रहरीं ॥ तो ब्राह्मण अव्हेरी काशीपुरी ॥ कीं त्यासि विमुख जाहला त्रिपुरारी ॥ अप्राप्त के
ली काशी ॥ ६९ ॥ कीं भोजनीं वाढाकि जे हरळ ॥ कीं वस्त्रासि लांछित जेसा मळ ॥ तो काशी बाहेर
काढिला विटाळ ॥ शिवाचिये दूतीं ॥ ७० ॥ कीं चंदनाचिया वृक्षीं ॥ केवीं तो कुठार वायसपक्षी ॥
दिव्य रत्नमण्याचा सुलक्षी ॥ केवीं तो लोहतंतु ॥ ७१ ॥ तैसा तो अंत्यजज्ञातीचा प्रतिग्रही ॥ काशी
बाहेर घातला महाद्रोही ॥ पुत्रकलत्रेंसीं सर्वही ॥ निघाला दक्षिणमार्गें ॥ ७२ ॥ खांद्यांवरी वाहो
नि द्रव्यभार ॥ अरण्य दुर्घट लागलें थोर ॥ तंव तेथें अकस्मात तस्कर ॥ उठावले तयावरी ॥ ७३ ॥
ब्राह्मण धरिला त्या निशाचरीं ॥ चौघें नेलीं त्या गिरीकंदरीं ॥ सर्वही द्रव्य हरिलें चोरीं ॥ चौघां केला
घात शस्त्रें ॥ ७४ ॥ ह्मणोनि अंत्यजजातीचें जें दान ॥ जो अंगीकारील भला ब्राह्मण ॥ तयासि यावें
दीं पुराणीं पतन ॥ बोलिलें आहे ॥ ७५ ॥ पुढें कैसें वर्तलें आतां ॥ एकाग्र परिसा जी श्रोता ॥ दुष्ट दाना
चा प्रतिग्रह घेतां ॥ मृत्यु जाहला चौघांतें ॥ ७६ ॥ द्रव्यास्तव जाहले प्राणघात ॥ तंव तेथें आले य
मदूत ॥ त्यांणीं कृतांतासि जाणविली मात ॥ ह्मणती परिसा स्वामिया ॥ ७७ ॥ अंत्यजजातीचा

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दानप्रतिग्रह ॥ केलाषट्कर्मिकेंसंग्रह ॥ काशीमाजीअसोनितो देह ॥ भ्रष्टविलातेणें ॥ ७८ ॥ कृतांत
ह्मणेगाकिंकरा परियेसी ॥ क्षणमात्रनलागताआणावादोषी ॥ दोषदंड करूनिगुणेंसी ॥ पूजनआ
ह्मा ॥ ७९ ॥ तंवयमगणधाविन्नलेवेगें ॥ लिंगशरीरेंबांधिलींचतुर्वर्गें ॥ आणिलींयमपुरींचियामार्गीं ॥
कृतांताजवळी ॥ ८० ॥ भद्रासनींबैसलाधर्मराज ॥ जोचतुर्दशकोटिसैन्यध्वज ॥ तोसर्वज्ञमार्तंडा-
चाआत्मज ॥ पाचारीचित्रगुप्ता ॥ ८१ ॥ मगतेचतुर्विधरवाणीचेलेखक ॥ शब्दाधारआणिपुण्यश्लो-
क ॥ त्यांहींनमस्कारिलासभानायक ॥ धर्मराजतो ॥ ८२ ॥ मगतोधर्मपुसेचित्रगुप्तासी ॥ ह्मणती
आणातेकवणकेसे दोषी ॥ यमगणींउभेकेलेसभेसीं ॥ त्यांचौघांजणांपें ॥ ८३ ॥ तंवचित्रगुप्त
ह्मणेकृतांता ॥ हाब्राह्मणआणियाचीकांता ॥ पुत्रआणिसुनयाच्यासांगता ॥ बांधलासंसर्गें ॥
येणेंअंगीकारिलेंअधर्मान्नदान ॥ हापुण्यशीळपरीहें चिलांछन ॥ जेपंचकोशीमुक्तिस्थान ॥ ते-
थींचानिवासीहा ॥ ८५ ॥ तेथेंभवानीशिवभुक्तिमुक्तिदाता ॥ तींयानेंअव्हेरिलींनस्मरतां ॥ नेथें
जोसहे आपुलियामता ॥ तोघालिनाबाहेरी ॥ ८६ ॥ यानेंवेदमुरव्यांचाअव्हेरकेला ॥ आणिचि-
त्तसरितेसिप्रवाहला ॥ मगकल्पनेच्याडोहींबुडाला ॥ पडिलादोषभोंवरीं ॥ ८७ ॥ ह्मणोनिअप्र
सन्नझालीवाराणसी ॥ आतांएकचिजन्मदीजेयासी ॥ हेकुक्कुटहोतीलकीकटदेशीं ॥ चौघेहीजण
॥ ८८ ॥ मगतेकीकटदेशींक्रौंचनगरीं ॥ कुक्कुटजन्मींघातलेचारी ॥ स्वामीह्मणेगाहेकथापु-
ढारी ॥ वर्तलीएकअगस्ती ॥ ८९ ॥ ऐसेतेकुक्कुटजन्मींवर्ततां ॥ त्याक्रौंचनामनगरींअसतां ॥
तंवपूर्वपंथींतेकापडीजातां ॥ देखिलेतिहीं ॥ ९० ॥ महापुण्यशीळदेखिलेकापडी दृष्टीं ॥ त्या-
चियासंगतीलागलींकुक्कुटीं ॥ अगस्तिह्मणेस्वामीक्षितीतटीं ॥ महाआश्चर्यवर्तलें ॥ ९१ ॥ जे-
थेंकापडियांहोयविश्रांती ॥ तींतेस्थळींकुक्कुटेंबैसती ॥ कापडीतयांभक्षावयाघालिती ॥ किं-
चितधान्य ॥ ९२ ॥ ऐसेतेकापडीआलेवाराणसी ॥ त्यांहींप्रयत्नेंआणिलेंकुक्कुटांसी ॥ मुक्तिमं

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

का॰खं डपीं आणोनि त्यांसी ॥ सोडिलें कापडीयानें ॥ ९३ ॥ मग तेथें पूज्यपूजन ॥ शिवशास्त्रें होती श्रवण ॥ अ॰
॥ ४ ॥ क्षुधेसि भक्ष्य अन्नजीवन ॥ देवपूजेचें त्यांसी ॥ विश्वनाथाचे सन्मुख ॥ कुक्कुट बैसती एकमुख ॥ ऐ- ॥ ७६
सें एक संवत्सर विशेष ॥ क्रमिलें त्याहीं ॥ ९५ ॥ शिवशास्त्रें श्रवण झालीं ह्मणोन ॥ नित्य शिवाचें द-
ष्टीं आसन ॥ ह्मणोनि शिव त्यांसि झाला प्रसन्न ॥ पूर्वार्जितास्तव ॥ ९६ ॥ तंव अकस्मात कैलासिच्या
वाटा ॥ विमानें उतरलीं क्षितितटा ॥ दीर्घध्वनीं वाजती दिव्य घंटा ॥ त्या मुक्तिमंडपीं ॥ ९७ ॥ वाद्य-
ध्वनींचा होतसे घोका ॥ गायनें नृत्यें करिती नायिका ॥ हेमदंड गोंदडीचं पिका ॥ महासुंदरी ॥ ९८ ॥
ऐशीं उतरलीं भूमंडळीं ॥ शिवालयीं मुक्तिमंडपीं आलीं ॥ गणांसि आज्ञा करी चंद्रमौळी ॥ कर्पूरगौर तो ॥
॥ ९९ ॥ मग काय केलें तेथें शिवगणीं ॥ कुक्कुट चारी घातले विमानीं ॥ मग तीं नेलीं कैलासभुवनीं ॥ निमि
षमात्रें ॥ १०० ॥ जैसा मुक्तमण्यांचा वरुणालय ॥ कीं शिवपूजा अधिक करी जय ॥ तैसा वेदशास्त्रांचा
महालय ॥ मुक्तिमंडप तो ॥ १ ॥ त्याचेनि अधिकारें कैलासीं ॥ मुक्तिप्राप्त होय कुक्कुटांसी ॥ तें चि शु
गनाम होईल मंडपासी ॥ कुक्कुटमंडप ऐसें ॥ २ ॥ मग त्या मंडपासि वर झाला ॥ तो मज अकथ्य व
र्णवयाला ॥ आतां अगस्ति प्रश्न करिता झाला ॥ तो परिसा श्रोते हो ॥ ३ ॥ अगस्ति प्रार्थी स्वामीसी ॥
ते कुक्कुटकां आले वाराणसी ॥ तेणें चि वेषें आह्मांसि काशी ॥ का प्राप्त नव्हे ॥ ४ ॥ तंव स्वामी ह्मणे
गा महाऋषी ॥ पूर्वीं ते होते काशीवासी ॥ ह्मणोनि अन्यत्रस्थळीं शिव त्यांसी ॥ राहों नेदी सर्वथा ॥
॥ १०५ ॥ पूर्वीं जयांस वास जाहला काशीपुरीं ॥ दिन एक संवत्सर तरी ॥ त्यासि जन्मांतरीं त्रिपुरारी ॥
राहों नेदी अन्यत्रस्थळीं ॥ ६ ॥ काशी करूनि वसे आपुले देशीं ॥ द्वय जन्म मृत्यु होय स्वदेशीं ॥ त-
री तृतीय जन्मीं वाराणसी ॥ प्राप्त करील शिव ॥ ७ ॥ तिसरे जन्मीं होय काशीनिवासी ॥ मग मृत्यु अं-
तीं मुक्ति तयासी ॥ परी काशीयात्रेचें सामर्थ्य विलयासी ॥ न जाय कल्पांतीं ॥ ८ ॥ शिवाची आज्ञा- ॥ ४ ॥
होती कुक्कुटांसी ॥ ह्मणोनि तीं आलीं अविमुक्तीसीं ॥ शिवआज्ञेविण प्राप्त नव्हे काशी ॥ ब्रह्मादि

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

द्रपुरुषोत्तमा ॥ १०९ ॥ स्वामी ह्मणेगाऋषिसागरारी ॥ हे कथाभविष्यपुराणांतरीं ॥ शिववाक्यप्रवर्त्तलें
पुढारीं ॥ तेंदृश्यहोईलतुज ॥ ११० ॥ तंवअगस्तिवदेजीशिवसुता ॥ तुह्मीकथामार्गकेलामुक्ता ॥ तरी
प्रश्नितांशंकानबाधीआतां ॥ झालोंअसेंधीटमी ॥ ११ ॥ काशीमध्येंपंचगंगासंगम ॥ उत्तरमान
सींअसेउत्तम ॥ बिंदुमाधवपुरुषोत्तम ॥ जाह्लातेथें ॥ १२ ॥ प्रथमतेकीरणासूर्यकुमरी ॥ धूतपा
पानामेंतेदुसरी ॥ गंगायमुनापांचवीनेसुंदरी ॥ सरस्वतीजे ॥ १३ ॥ धूतपापानामजियेचें ॥ का
शीच्याठायींदीर्घसामर्थ्यतियेचें ॥ तरीमजनिरूपामूळयाचें ॥ आदिअंतजें ॥ १४ ॥ स्वामी ह्मणे
गाअगस्तिमुनी ॥ तेपरिसाधूतपापाकाशीस्थानीं ॥ तियेचेंमूळतुझ्याश्रवणीं ॥ करूंनिरूपण ॥
॥ ११५ ॥ सुशीळनामेंहोताऋषीश्वर ॥ भृगुवंशीचामहातपश्वर ॥ आनंदवनाच्याठायींनित्याचा
र ॥ वर्ततहोता ॥ १६ ॥ अप्सरालोकींहूनिदेवांगना ॥ आलियाविश्वनाथाचियादर्शना ॥ त्यांहींदे-
खिलेंत्याब्राह्मणा ॥ सुशीळासिपैं ॥ १७ ॥ देवांगनेंमध्येंमहालावण्यपुर्ण ॥ उर्वशीदेखिलीत्या
ऋषीन ॥ विध्वंसिलेंत्याचेंअनुष्ठान ॥ सौंदर्यानेंतिचिया ॥ १८ ॥ वीर्यद्रवलातोमुनिवर ॥ तपें
तापलाअतिक्रूर ॥ मगतोउर्वशीसऋषीश्वर ॥ करीप्रत्युत्तरतेसमयीं ॥ १९ ॥ ह्मणेसुंदरलावण्य
तुझें ॥ तेणेंतपविनाशिलेंमाझें ॥ पडलेंतुझियामोहनाचेंवोझें ॥ वेचलीतपसामग्री ॥ १२० ॥
आतांमाझेंवीर्यहें भूमंडळीं ॥ येथें पडूंनयेक्षितितळीं ॥ हेंतुवांअंगीकारावेंतत्काळीं ॥ नाहीं
तरीपावसीखेद ॥ २१ ॥ तंवभयभीतझालीउर्वसी ॥ ह्मणेहामजशापदेईलऋषी ॥ हानाशकरी-
लामाझियालावण्यासी ॥ मगहोईलसंकट ॥ २२ ॥ मगअंगीकारकेलात्यावीर्याचा ॥ तिणेंगर्भ
धरिलात्याऋषीचा ॥ नवमासपर्यंतशुभवाचा ॥ राहिलीत्याऋषीपासीं ॥ २३ ॥ येरीदेवांगनां
नींगंगास्नानें ॥ सारिलेंशिवाचेंपूजनें ॥ मगक्रमितीजाह्लीं विमानें ॥ अप्सरालोकासी ॥ २४ ॥
मगतेमहालावण्यउर्वसी ॥ प्रसूतजाह्लीनववेमासीं ॥ तंवकन्यारत्नझालेंतियेसी ॥ आनंदलाऋ

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

षीश्वर ॥ १२५ ॥ तें ऋषिवीर्याची कन्यासुंदरा ॥ उर्वशी समर्पी त्या मुनिवरा ॥ मगते क्रमिती झा
ली अप्सरा ॥ आपुल्या स्थाना ॥ २६ ॥ मग त्या कन्येचें पालन ॥ सप्त वर्षे केलें त्या ऋषीन ॥ कन्येसि केलें
नामधारण ॥ धूतपापा ऐसें ॥ २७ ॥ मग ती कन्या जाहली उपवर ॥ मग तिजला म्हणे करी ऋषीश्वर ॥
ह्मणे तुझें करूं स्वयंवर ॥ तरी सांग मनोभाव तुझा ॥ २८ ॥ मग वदती झाली धूतपापा ॥ ह्मणे परि
येसी गा पितया महातपा ॥ मी कल्पीतसें जया साक्षेपा ॥ तें श्रुत करूं तुज ॥ २९ ॥ चहूं खाणींचे जे
जीवजंत ॥ त्यांसि तरी उत्पत्ती प्रळय होत ॥ त्यांहून श्रेष्ठ असेल अमृत ॥ या त्रैलोक्यमंडळीं ॥
॥ १३० ॥ या सकळ जीवांसि सत्ता जयाची ॥ निमित्तें जाण नसे सर्व जंतूंची ॥ पित्या मी कांता हो
ईन त्याची ॥ हा संकल्प माझा असे ॥ ३१ ॥ तरी ऐसा जो समर्थ कोणी ॥ विचारूनि पाहें त्रिभुव-
नीं ॥ ऐसा चि वर सुलक्षणी ॥ वरिजे मज ॥ ३२ ॥ तंव कन्येसि बोलला सुशीळ मुनी ॥ बरवा सादे
पइच्छिला मनीं ॥ ह्मणे तरी पूर्ण धर्मगुणी ॥ यमरावती ॥ ३३ ॥ तरी कन्ये त्रिलोकींचे जे जंत ॥ न-
र मानवादि देव समस्त ॥ त्यां सकळां दंडांकित ॥ यमरावतीपें ॥ ३४ ॥ यास्तव कीजे तपसाधना ॥
भक्तीं संतोष विजे पंचानना ॥ तेणें पाविजे त्या सूर्यनंदना ॥ धर्मराजासी ॥ १३५ ॥ मग कन्या पि
तृआज्ञा वंदूनी ॥ तपसाधना बैसली अनुष्ठानीं ॥ तिणें आराधिला शूळपाणी ॥ शतसंवत्सर ॥ ३६ ॥
तंव शिवाज्ञा झाली ब्रह्मयासी ॥ विधि आला ऋषिकन्येपासीं ॥ ह्मणे इच्छावर दीधला तुजसी ॥
शिवाज्ञेनें तपस्विनी ॥ ३७ ॥ ऐसा वर देऊनि गेला ब्रह्मा ॥ मग ते कल्पिती झाली धर्मा ॥ तंव हेमा
त सुचली आगमा ॥ नारदमुनींसी ॥ ३८ ॥ तो यमपुरा झाला निघता ॥ वृत्तांत जाणविला कृतां
ता ॥ ह्मणे जे सुशीळ ऋषीची दुहिता ॥ तपीं बैसली धर्मा तुजलागीं ॥ ३९ ॥ शतवरुषें साधि
लें अनुष्ठान ॥ नित्य हृदयीं तुमचें चिंतवन ॥ तयासि ब्रह्मा जाहला से प्रसन्न ॥ आज्ञा शिवा ॥५॥
चीपें ॥ १४० ॥ तिणें मागीतला इच्छावर ॥ मग तथास्तु ह्मणे सृष्टिकर ॥ ह्मणे धर्मा ऐसा दीध-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

लावर ॥ ऋषिकन्येसीपैं ॥ ४१ ॥ नारदेंजाणविलीऐशीमात ॥ तंवधर्मझालाकामेंदुश्चित्त ॥ वेळोवेळां
प्रश्नकरीब्रह्मसुताप्रत ॥ ऋषिकन्येचापैं ॥ ४२ ॥ धर्मह्मणेनारदमुनी ॥ अतिसुंदरसगुणतेकामिनी
॥ बैसलीमाझासंकल्पधरोनी ॥ तेकैशीअसेल ॥ ४३ ॥ ऐसेंधर्मरायाचेंवचन ॥ अतिउत्कंठितझा
लेंमन ॥ कैसेतयेचेंरूपगुण ॥ तेंसांगतसेनारद ॥ ४४ ॥ त्रैलोक्यलावण्यतेंउर्वशीचें ॥ वीर्यतेंसुशी
ळऋषीचें ॥ यादोहींच्यासंभोगींशरीरतियेचें ॥ निपजलेंधर्मा ॥ १४५ ॥ तोदिव्यकन्यासुकुमारस-
गुण ॥ तपेंझालीअसेअतिसंकीर्ण ॥ आतांजाईमनोरथकरीपूर्ण ॥ तयाकामिनीचा ॥ ४६ ॥ ऐसें
अनुवादलाब्रह्मकुमर ॥ तंवयमजाहलासेकामातुर ॥ सर्वराज्याचाकरूनिअव्हेर ॥ आलाआनंदवना
॥ ४७ ॥ जेथेंअनुष्ठानींअसेऋषिआत्मजा ॥ तेथेंकामातुरआलाधर्मराजा ॥ सुंदरीदेखिलीदिव्यते
जा ॥ तेमहासत्वाधिकारी ॥ ४८ ॥ मगधर्मतियेसीबोलेवचन ॥ ह्मणेतुझेंतपझालेंसंपूर्ण ॥ आ
ह्मासिसांगीतलेंविरिंचिन ॥ जेतूंमाझीकांता ॥ ४९ ॥ तंवतेवरदेखोनिसुंदरी ॥ लज्जावंतठा
केपाठिमोरी ॥ मगधर्मासिप्रत्युत्तरकरी ॥ ऋषिकन्यातें ॥ १५० ॥ ह्मणेतयास्तुआलासिवर ॥
तरीगुंफेसिअसेमाझापितर ॥ तेथेंजाऊनिकीजेविचार ॥ स्वयंवराचापैं ॥ ५१ ॥ येरूह्मणेगुंफेसि
कायकाज ॥ जेसमदृष्टीजाहलीतुजमज ॥ तेचिसुमुहूर्तसिद्धीसहज ॥ साध्यजाहली ॥ ५२ ॥
जेथेंदंपतींचीप्रीतिउभयतां ॥ तेथेंकायसीपितृआज्ञेचीयोग्यता ॥ प्रियापुरुषांचीएकांतजा
णवार्ता ॥ वृथाचिकाय ॥ ५३ ॥ तंववदलीतेऋषिकुमरी ॥ हेंबोलणेंअयुक्तपुराणांतरीं ॥ जे
वेदाज्ञेनेंवर्ततीपूर्वापरीं ॥ तोचिस्वधर्म ॥ ५४ ॥ हेंचितुमचेंनामजेधर्म ॥ आणितुह्मीकेवीं
योजितांअधर्म ॥ हें मनमर्कटयासिपूर्वागम ॥ नसुचेसर्वथा ॥ ५५ ॥ तुह्मीबोलताजीकामा
तुर ॥ परीहेंमहिमतानव्हेजीसार ॥ तरीपितृकरीजेव्हांस्वयंवर ॥ तेणेंशुद्धऐहिकपरत्री ॥
॥ ५६ ॥ पित्यासिघडेकन्यादानाचाअधिकार ॥ सर्वगोत्रजांसिआनंदथोर ॥ पूर्वजांसिहो

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

यप्रतिमादर ॥ अत्यंतस्वर्गीं ॥ ५७ ॥ अहोशिवेंनिरूपिलेंगौरी ॥ त्रयआनंददुर्लभसंसारीं ॥ त
रीतेवेदाज्ञात्रिलोकामाझारीं ॥ कवणकवण ॥ ५८ ॥ अहोजेंहोतसेआपुलेंस्वयंवर ॥ तेंपंचवि
नमह्याआनंदथार ॥ ऐसेंत्रैलोक्यसमग्र ॥ नभासेकांहीं ॥ ५९ ॥ आणिकसत्पुत्रहोयसंसारीं ॥
तोएकआनंदत्रैलोक्यभरीं ॥ आणिकपुत्रासिपुत्रहोयतरी ॥ विशेषचतुर्गुण ॥ १६० ॥ तरीप्रहरोनिऐसा
आनंदजय ॥ सर्वथानकीजेमहत्त्वाचाक्षय ॥ पितृआज्ञाघेऊनियांहासमय ॥ लग्नसुमुहूर्तान्वा ॥
॥ ६१ ॥ येन्हवींस्वयंवराविणभोगविलास ॥ येणेंउभयकुळींलांछनविशेष ॥ शरीरस्वस्थअसतां
पतनप्रयास ॥ कवणेंभोगावे ॥ ६२ ॥ तुह्मावांचूनमजआणिकनाहींवर ॥ तरीधर्मासिकांकी
जेअव्हेर ॥ स्वधर्मसांडीतोदोषियानर ॥ भोगीरौरव ॥ ६३ ॥ यानंतरबोलेयमराव ॥ ह्मणेहाभार्ये
नकरीसंदेह ॥ रौरवभोगवितामीचभाव ॥ नधरीमानसीं ॥ ६४ ॥ मीचमहादोषांचादंडकर्ता ॥
मीचपुण्यफळासिभोगविता ॥ मजवांचूनित्रैलोक्यजंतां ॥ नाहींउत्पत्तिप्रळय ॥ ६५ ॥ मगऋषि
कन्यावदेधर्मासी ॥ जरीत्रैलोक्यभविष्यभासेतुह्मासी ॥ तरीहेविश्वंभराचीकाशी ॥ अगम्यतुह्मा ॥
॥ ६६ ॥ काशीमध्येंघडेदोषलाछन ॥ अथवापुण्यसुकृतदान ॥ तेंशिवाचिजाणेपरीकवणाआ
धीन ॥ नाहींहेंकाशी ॥ ६७ ॥ काशीमध्येंअसावेंपुण्यस्वार्थी ॥ जरीकल्पिजेअनृतवृत्तिस्वम-
तां ॥ तरीप्राप्तहोयमहाव्यथा ॥ शिवगणांचियाहस्तें ॥ ६८ ॥ ऐसीधर्माप्रतिबोधीतेसुंदरा ॥
परीसुद्धिनसेत्याकामातुरा ॥ निर्भर्त्सनाकरीतिचियाप्रत्युत्तरा ॥ कामार्थीतो ॥ ६९ ॥ बलात्का
रेंह्मणेस्पर्शकरीन ॥ येरीह्मणेनव्हेवेदाज्ञेविण ॥ तंवतोबोलिलाशापदान ॥ ऋषिकन्येप्रती ॥
॥ १७० ॥ स्वामिआज्ञामानितीज्यास्त्रियासमर्थ ॥ स्वामीचेपूर्णकरितीमनोरथ ॥ त्यांशुभांगवां
सिवंदितीप्रमथ ॥ अमरादिकजे ॥ ७१ ॥ तुवांतपसाधिलेंसंपूर्ण ॥ तुजदेवजाहलेतिप्रसन्न ॥ तूं ॥६॥
नव्हेसिजरीस्वामिशब्दाधीन ॥ तरीघेतूंशापमाझा ॥ ७२ ॥ ह्मणेतूंहोशीलयाकर्मेंशिळा ॥ तं-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वबोलतीजाह्लीऋषीचीबाळा ॥ ह्मणेरेकामातुराअमंगळा ॥ शापघेईतूंमाझा ॥ ७३ ॥ दो
घेंविणशापिलेंमजसी ॥ तरीतूंहीयेस्थानींनिंद्यहोसी ॥ मगतोधर्मशावग्रस्तपुरीसी ॥ कूर्मिता
जाह्ला ॥ ७४ ॥ तंवअनुष्ठानेंसारूनिऋषी ॥ तोसुशीळमुनिआलागुंफेसी ॥ तंवतेणें क-
न्यादेखिली बीभत्सी ॥ उद्वेगवृत्तीं ॥ ७५ ॥ पित्यानेंप्रश्निलीतांचिदुहिता ॥ निरूपितीजाह्ली
धर्माचीवार्ता ॥ ह्मणेयेणेंजाह्लेंकृता ॥ आपुलियेगुंफेसी ॥ ७६ ॥ मीराहिलेंवेदाझेआधी
न ॥ तो ह्मणेकायसेंमुहूर्तलग्न ॥ पितयानेंवदलाशापदान ॥ जेतूंशिळाहोसी ॥ ७७ ॥
हें परिसोनिकन्येचेंउत्तर ॥ खेदपावलाऋषीश्वर ॥ ह्मणेकांपांनकरीचस्वयंवर ॥ सत्ता
थीं धर्मराजा ॥ ७८ ॥ जरीतयासिकल्पिजेअनर्थ ॥ तरीविधिआज्ञेचाअसेपुरुषार्थ ॥ आ-
णिकन्येचाहिहोतोमनोरथ ॥ जेकृतांतस्वामी ॥ ७९ ॥ ह्मणोनिकन्येतेंहीधर्मसगुण ॥
परीतुवांदीधलेंशापदान ॥ आतांअनर्थतोनिष्कारण ॥ नकीजेसर्वथा ॥ १८० ॥ आतांभंज
तुझियाशापासी ॥ वेंचीनजे तपसामग्रीसरसी ॥ तूंशिळाहोशीअहर्निशीं ॥ सोमकांतजे ॥
॥ ८१ ॥ मगत्याऋषीनेंतेबाळा ॥ ठेविलीमंगळागौरीजवळा ॥ तेवनींहोऊनिठेलीशिळा ॥
सोमकांतजे ॥ ८२ ॥ त्यामंगळागौरीच्यासख्यासाजणी ॥ अष्टमातृकाअसतीअष्टजणी
॥ त्यामध्येंतेधूतपापानंदिनी ॥ मेळविलीऋषीनें ॥ ८३ ॥ केलीस्थावरजंगमदोनीरूपें ॥ सोम
कांतसरितास्वरूपें ॥ ऐशीत्याधर्माचियाशापें ॥ ग्रामझालीकाशी ॥ ८४ ॥ ऐशीतेशिळाहोऊ
निअसतां ॥ व्योमींचंद्रभासलासंपूर्णता ॥ तेंरूपदेखोनिपूर्णमन्मथा ॥ स्त्रवलीजीवना ॥
॥ ८५ ॥ जेधर्मराजस्वामीव्हावया ॥ ऐशीकल्पितहोतीकुमारिया ॥ यास्तवचंद्रदर्शनेंवी-
र्या ॥ स्त्रवतीझालीजीवन ॥ ८६ ॥ स्वामीह्मणेगाऋषितपबळा ॥ ऐशीतेजाह्लीसोमकांत
शिळा ॥ मगतेचंद्रदर्शनेंअबळा ॥ जळस्त्रवली ॥ ८७ ॥ तेंजळप्रवाह्लेंक्षितीसी ॥ मगतेधू

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तपापानामेंझालीऐशी ॥ बिंदुमाधवासमीपजनउद्धरावयासी ॥ आलीतेगंगा ॥ ८८ ॥ जेथेंअ
सेपंचगंगासंगम ॥ तेथेंनदीतीर्थझालातोधर्म ॥ तेथीलस्नानइच्छितोपुरुषोत्तम ॥ ब्रह्मादिकेंसी
॥ ८९ ॥ मगतेथेंजींजींतीर्थेंअसती ॥ तींतींमुक्तिदायकमीसांगोकिती ॥ तेथिंचियास्नानदानेंउद्ध
रती ॥ सप्तगोत्रपूर्वज ॥ १९० ॥ तुवांप्रश्निलेंगार्ग्यऋषिमहातपा ॥ जेंशापदग्धझालीधूतपापा ॥
मीतोषलोंरेतुझियासाक्षेपा ॥ महाप्रश्निका ॥ ९१ ॥ शिवदासगोमाह्मणेश्रोतां ॥ मजनभासेस्वकृ-
त्याचीयोग्यता ॥ अगस्तिप्रश्नीलजेंआतां ॥ तेंक्षमावंतांपरिसावें ॥ ९२ ॥ ॥ इतिश्रीस्कंदपु
राणेकाशीखंडेमुक्तमंडपधूतपापामाहात्म्यवर्णननामषट्सप्ततितमोऽध्यायः ॥ ७६ ॥ ॥
॥ श्रीसांबसदाशिवार्पणमस्तु ॥ ॥ अध्याय ॥ ७६ ॥ ॥ ओव्या ॥ १९२ ॥ ॥ छ ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri



CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

काखं श्रीगणेशायनमः ॥ ॥अगस्तिवदेजीषडानना ॥तूंशिवकथानिधानाचियाअंजना ॥कींद्वादशभु अ०
॥१॥ जाअष्टादशलोचना ॥ तूंचिहोशीस्वामी ॥१॥ नानापुराणेंपृथ्वीमंडळीं ॥विस्तारिलींतूंजीवनत्यांचे ॥७७॥
मूळीं ॥जनोपकाराफळलींअवकाळीं ॥शिवनामामृतें ॥२॥जीमजतुमचादीर्घउपकारु॥शांत
करितांमाझावियोगअंगारु॥संसारसागरींबुडतांतारु॥प्राप्तकेलेंतुह्मी ॥३॥ ऐसातूंशिवभ-
वानीचानंदनु॥ तूंचतुर्वाचावेदांचामूळदानु॥मजप्राप्तकेलापूर्णप्रसादभानु॥ तुझियेइच्छें
तुवां॥ ४॥मीएकअनाथजीकृपानिधी॥ मजक्षमाकीजेमंदबुद्धी ॥काशीखंडनिरूपिलेंहे
सिद्धी॥साध्यजाहलीमज॥५॥ आतांप्रश्नअसेजीसर्वोत्तमा ॥मीप्रश्नितांभयभीततुह्मा॥
जरीमजप्राप्तअसेलतुमचीक्षमा॥मनोभावें ॥६॥समर्थाचेभाग्यअपारिक॥त्याचीविवंच
नाकेवींकरीरंक ॥जरीतोसंतोषोनितुळीमस्तक॥तरीभक्तिघडे ॥७॥जरीमाझाभावअसेलतैसा
॥जन्मांतरींपूजिलेंअसेलविश्वेशा ॥तरीतूंसर्वथादेवाधीशा॥क्षमाकरीमज॥८॥तरीकाशीम
ध्येंलिंगईश्वरु॥जोत्रैलोक्याचेंमूळबीजतरु॥तेंभवानीप्रतिकर्पूरगौरु ॥ कैसाअनुवादला
होता॥९॥ आतांसावधानश्रोतोत्तमा ॥ अनुपमईश्वराचामाहिमा ॥ श्रवणपठनेंतत्काळदोष-
तमा ॥वेगळेंहोइजे ॥१०॥स्वामीह्मणेगाकुंभोद्भवा ॥कवणप्रमाणकरीत्यामहादेवा॥हें
त्रिप्रश्नीनहोतीअयोनिसंभवा ॥कर्पूरगौरासी ॥११॥ तेंचिकथाजेपूर्वापारी ॥उमेसिअनुवा
दलेहोतेत्रिपुरारी॥ मीतेंनिरूपितोंगातपेश्वरी ॥महाऋषीअगस्ती ॥१२॥ ईश्वराचेपश्चि
मभागींजेंस्वरूप॥ असेमोक्षलक्ष्मीविलासमंडप ॥त्यामंडपींठाकलागणाधिप ॥महादेव
॥१३॥शिवेंपाचारिलेदेवऋषी ॥यक्षराक्षससहपरिवारेंसी॥ शेषनागनरमानवांसी॥प-
रीवारिलेंशिवें ॥१४॥ वैकुंठवासीसिंधुनंदिनी ॥तेहरिरूपींकैशीशोभलीकामिनी॥कींतें ॥१॥
जैसीमिरवेजंबुनंदिनी ॥कोमळांगी॥१५॥ऐशीतेकमळजानारायण ॥हृदयींविश्वंभरानें

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

स्मरण ॥ ऐसा तो हरिसेवा सावधान ॥ शिवाच्या भक्तिसि उमा असे ॥ १६ ॥ आणिक सावित्री विधी
ची शक्ती ॥ ते लोहितवर्ण दिसे दीसी ॥ जैशी वसिष्ठाजवळी अरुंधती ॥ मिरवतसे गुणतत्वें ॥
॥ १७ ॥ ऐसा तो सावित्रीसहित विधी ॥ सृष्टिकर्म कल्पितसे आदी ॥ शिवगायत्री जपे पाणिबद्धीं
॥ उमा शिव दक्षिणांगीं ॥ १८ ॥ आणिक त्रयशक्ति हुताशन ॥ तो गार्हपत्य शिवाचा भाललोचन ॥
तो शिवाची भक्ति साधून ॥ उमा अग्निदिशीं ॥ १९ ॥ आणिक दशप्रियांसी धर्मराज ॥ भक्तीं तोष
विला वृषभध्वजा ॥ तो सर्वज्ञ सवितात्मज ॥ उमा दक्षिण्य भागीं ॥ २० ॥ जो पूर्वजन्मींचा पिंगाक्षराजा
॥ त्यासि दोन सुंदरी दक्षात्मजा ॥ सवें यक्षराक्षसांचिया फौजा ॥ निर्ऋतिदिशीं ॥ २१ ॥ त्रयसुंद
रींसी कर्दमसुत ॥ तो वरुण नामा महा शिवभक्त ॥ शिवाचे पश्चिमदिशीं महाद्भुत ॥ उमा शि
वसेवेसी ॥ २२ ॥ त्रयसुंदरींचा प्रतिमावर ॥ जो कश्यपदितीचा कुमर ॥ जो दशायुध भक्तीसि
समीर ॥ उमा वायव्य भागीं ॥ २३ ॥ सत्ताविसा सुंदरींचा अधिपती ॥ तो अत्रिसुत पद्मिनीचा
पती ॥ शीतकर नामें दिव्यदीसी ॥ उमा उत्तरभागीं ॥ २४ ॥ वामांगीं प्रिया असे दाक्षायणी ॥ तो
एकादशरुद्र उमे ईशानीं ॥ संतुष्ट करावया शूळपाणी ॥ तेही भक्त्यर्थ पें ॥ २५ ॥ शिवाचे सर्वग
णा असती साउमे ॥ त्यामध्यें श्रेष्ठ जो पराक्रमें ॥ तो शिखिऋषीचा बाळ उत्तमें ॥ नरकेश्वर नामा
॥ २६ ॥ ऐसे आपुल्या प्रियांसमवेंसी ॥ प्रमथ उमे शंकरापासी ॥ मग शिव ह्मणे सर्व देवांसी ॥
परिसा जी उत्तर माझें ॥ २७ ॥ माझिया पादुका सप्तपाताळीं ॥ तेथें मी ध्यानस्थ होतों कोणे काळीं
॥ मग म्या लिंगस्थापिलें त्या विपुळस्थळीं ॥ त्या नाम हाटकेश्वर ॥ २८ ॥ त्या लिंगापासाव अंकु
र ॥ उद्भवला महा साक्षात्कार ॥ तो सप्तपाताळांचा छिद्रकर ॥ भेदिता जाहला ॥ २९ ॥ तें लिं
ग पृथ्वीचें मूळ जीवन ॥ आपण स्थिरस्थावर जाहला पंचानन ॥ त्याचे कंठीं असे शेषभूषण ॥ ते
णें धरिली पृथ्वी ॥ ३० ॥ तें चि लिंग उद्भवलें स्वयंभ ॥ कीं तें मस्तकीं धरावया नभ ॥ एकवीसस्व-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

र्गींचापूर्णस्तंभ ॥ विश्वनाथहा ॥ ३१ ॥ शिवह्मणेगाहरिविरिंची ॥ हीकाशीरचिलीम्यांनेणोंकेंचीं ॥ भगया
विश्वनाथलिंगाची ॥ कवणजाणेहेंवस्तुस्थिती ॥ ३२ ॥ तेंलिंगम्याहोतेंपूजिलें ॥ आपुल्यास्वहस्तेंचिस्था
पिलें ॥ माझियेइच्छेंस्तवप्रगटलें ॥ मृत्युमंडपीं ॥ ३३ ॥ तरीयालिंगाचापूर्णमहिमा ॥ मजहीअगम्य
रेपुरुषोत्तमा ॥ हेंपंचक्रोशीमाझीनिजधामा ॥ तुझीजन्मभूमीहरी ॥ ३४ ॥ अन्हेरिनाआपुलेंगृहभुव
न ॥ मनींकल्पिजेकाशीभुवन ॥ तरीसत्यचिघडेकपिलादान ॥ सत्तात्रींहृयदशक ॥ ३५ ॥ काशी
गमनकल्पोनिनिचितीं ॥ सप्तपदेंक्रमीजोवसुमती ॥ तरीशतएकजन्मांचींदहती ॥ महाकिल्बिषें
॥ ३६ ॥ जयासिघडेकाशीचेंदर्शन ॥ आणिस्वर्गसरितेचेंआचमन ॥ त्यासिघडलेंअमृतपान ॥ शि
वसमेकेलासीं ॥ ३७ ॥ जयासिघडेकाशीचापूर्णवास ॥ तोसाक्षातगाउमामहेश ॥ वैकुंठवासीजो
हृषीकेश ॥ नमस्कारकरीतया ॥ ३८ ॥ वाराणसीमध्येंपंचत्वघडे ॥ तेंआमुचेंब्रह्मद्वारउघडे ॥ तेणें
यमपंथींघातलेगडे ॥ मातृपितृद्वयपक्षीं ॥ ३९ ॥ शंकरवदेसर्वब्रह्मीं ॥ तुह्मीसंशयोअव्हेरास
र्वहीं ॥ अनुचितजरीमानालकांहीं ॥ तरीघडेलमहादोष ॥ ४० ॥ अखंडबिल्वपत्रींविश्वनाथ ॥ पूजी
रंकअथवासमर्थ ॥ त्यासिनिर्वाणपदाचापंथ ॥ तत्काळमुक्त ॥ ४१ ॥ हिरण्यपुष्पेंशुद्धकमळें ॥ विश्व
नाथींसमर्पितांगंगाजळें ॥ तत्काळप्राप्तहोतीलफळें ॥ जीमनेच्छा ॥ ४२ ॥ शिवह्मणेब्रह्मयापुरुषोत्त
मा ॥ तरीयालिंगाचाजोपूर्णमहिमा ॥ तोपृथक्पृथक्मेघश्यामा ॥ नसांगवेमज ॥ ४३ ॥ हेंलिंगदु
र्लभगीर्वाणा ॥ हेंलिंगदुस्तरतारणत्रिभुवना ॥ दुर्लभयक्षराक्षसगंधर्वगणां ॥ महाशास्त्रहें ॥ ४४ ॥
जयांनेवेद्याचींसितेविभागें ॥ तितुकींचिहोतीकल्पयुगें ॥ केलासीहींशिवलिंगें ॥ पूजिलींतेणें
पैं ॥ ४५ ॥ यालिंगाचासर्वशास्त्राधिकारु ॥ हेंलिंगभुक्तिमुक्तीचापूर्णगुरु ॥ याचियानामेंमहा-
दोषांकुरु ॥ पराभवतीपैं ॥ ४६ ॥ न्याथिकद्रव्याचींमहामिष्टान्नें ॥ विश्वनाथींसमर्पीजोशुद्ध-
मनें ॥ महाविष्णूसिनिवेदिलेंपंचाननें ॥ परियेसीतेंसामर्थ्य ॥ ४७ ॥ यालिंगाजवळकरीमहारु

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

द्र ॥ त्याचियासामर्थ्यानतुळेसमुद्र ॥ शतपद्मेअनुष्ठानेंकेलींतोचंद्र ॥ न्यूनदिसेशतगुणें ॥ ४८ ॥ यालिं
गाजवळीकरीजोअश्वमेध ॥ दिव्यांबरींवेष्टीशिवप्रासाद ॥ तरीत्यासमर्थाचागर्भभेद ॥ परिसासर्वही
॥ ४९ ॥ मगकल्पितसेमहाचोज ॥ यापंचक्रोशीचेंभूमीरज ॥ तितुकींयुगेंकैलासीपूर्वज ॥ भोगितीसु
ख ॥ ५० ॥ याविश्वंभराचाप्रासादमौळी ॥ दिव्यांबरेंझाडिजेरजधुळी ॥ तोछत्रपतीमहीमंडळीं ॥
त्रिजन्मपर्यंतपैं ॥ ५१ ॥ तींशिवाचींकळसाग्रेंमनोहर ॥ रजप्रक्षाळिजेगंगानीर ॥ गोदंडअथवामौ-
ळिभार ॥ स्पर्शोनये ॥ ५२ ॥ तरीत्यासमर्थाचीनीती ॥ पुण्यलक्षितांहरिविधिचळती ॥ जरील
क्षवेतोपशुपती ॥ तरीचगम्यतयासी ॥ ५३ ॥ येऱ्हवींमहाकल्पाचेसंख्यापर्यंत ॥ तेंसामर्थ्यनेणे
लक्ष्मीकांत ॥ जोविश्वनाथविश्वभरित ॥ तोचिजाणेपैं ॥ ५४ ॥ नानारंगमेळवूनिबहुयुक्तीं ॥
पौळींप्रासादींजोचित्रितोभिंती ॥ तोशतयुगेंवज्रहस्ती ॥ होयसुरनगरींचा ॥ ५५ ॥ पुनरपिमायु
ताकाशीनिवासी ॥ त्यासिप्राप्तहोयवाराणसी ॥ मृत्युअंतींकैलासनिवासी ॥ मुक्तिउत्पत्तीविर
हित ॥ ५६ ॥ मृगांकमौळीवदेगाविधिहरी ॥ हींपंचभूतेंउत्पत्तिकरी ॥ तींवर्ततअसतीब्रह्मांडभ-
रीं ॥ तीयालिंगाचेशक्तीं ॥ ५७ ॥ लिंगेंअसतींत्रैलोक्यभरी ॥ स्वर्गमृत्युपाताळविवरीं ॥ परी
जेंसामर्थ्यविश्वेश्वरीं ॥ तेंनाहींकवण्याहीलिंगा ॥ ५८ ॥ आणिकवदताहेत्रिपुरारी ॥ हेंत्रैलो
क्यलिंगाआधारीं ॥ हेंलिंगभरलेंत्रैलोक्यभरी ॥ तेंसांगोंतुज ॥ ५९ ॥ ब्रह्मांडनमायेत्रैलोक्या
सी ॥ येथेंईश्वरपंचमहाभूतेंसी ॥ तोस्वहस्तेंकरीपंचक्रोशी ॥ मूळजीवनतयाचें ॥ ६० ॥ तरी
हींपंचहीदृश्यसगुणें ॥ एकएकाहूनिहोतीविस्तीर्णें ॥ पृथ्वीभूतनव्याशींकोटियोजनें ॥ नि
र्मिलीअसे ॥ ६१ ॥ पंचअर्बुदसाठकोटिजाणा ॥ इतुकेंनिर्मिलेंअसेजीवना ॥ ज्यावरीपृथ्वी
तारूंसगुणा ॥ तेंपृथ्वीरहित ॥ ६२ ॥ परिघकरावयाक्षितिमंडळ ॥ वरुणवृष्टिकरीतेजाळ ॥
मगप्रवाहतीसकळ ॥ तेणेंभरिलेंसमुद्रा ॥ ६३ ॥ अद्भुतवरुणाचीबळशक्ती ॥ केवींपांसस

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सागरतुळती ॥ परिघकरावया अवघी क्षिती ॥ अल्पजळसमुद्राचें ॥ ६४॥ छपन्नअर्बुदसंख्यासह-
ज॥ हें भूतनिर्मिलें असे तेज ॥ हें भक्षितसे प्रळयींचे अंबुसहज ॥ मगसमुद्र तो किती ॥ ६५॥ साठअ
र्बुदेंनिर्बुदें पंचें ॥ इतुकें प्रमाणअसे वायूचें ॥ हा महातेज भक्षी प्रळयींचें ॥ महद्भूतपवन ॥ ६६ ॥
त्रेपन्ननिर्बुदें संख्या आकाशाची ॥ ऐशी दीर्घस्थूळें पंचभूतांची ॥ शिवब्रह्मणेगाहरिविरिंची ॥ ऐसें हें
ब्रह्मांड॥ ६७ ॥ व्योमगर्भी एकवीसस्वर्गमंडळें ॥ पृथ्वीगर्भी सप्तपाताळें ॥ तरी हे स्वहस्तें महाशक्ति-
बळें ॥ तयाविश्वरूपाचिया पैं ॥ ६८ ॥ ऐसाहा ब्रह्मांडद्रुमसमूळ ॥ पंचकोशी तयावृक्षाचें फळ ॥
त्यामध्यें पूर्णबीज तें केवळ ॥ विश्वेश्वर बोलिजे ॥ ६९ ॥ त्याबीजामध्यें पूर्णांकुर ॥ तोचि क्षर अक्षर
विश्वंभर॥ अरे हें ब्रह्मांड तोचि शंकर ॥ परिसे विधिहरी ॥ ७० ॥ याविश्वेश्वराचें जें स्थूळ ॥ तें हें ब्र-
ह्मांड बोलिजे सकळ ॥ सोमसूर्यताराग्रहमंडळ ॥ कंठीं असे तयाचे ॥ ७१ ॥ कटिसूत्रापासाव स-
प्तपाताळें ॥ तींयालिंगाचीं बोलिजे पादतळें ॥ मुगुट एकवीसस्वर्गमंडळें ॥ सप्तसमुद्र कुक्षी
॥ ७२॥ पाणीपादादिक जे अष्टनळ ॥ तेचि अष्टकुलाचळ ॥ त्यांसि नाडी वेष्टिलिया सकळ॥ त्या
गंगादिसरिता ॥ ७३॥ सोमाग्र अठराभारवनस्पती ॥ क्षितिगर्भी कूर्म त्याचिया अस्थी॥ ब्रह्मा-
विष्णुरुद्र त्रिमूर्ती ॥ यालिंगाचे चक्षू ॥ ७४ ॥ दक्षिणचक्षु तो चतुरानन ॥ हरि बोलिजे वामलो
चन ॥ मग तृतीयनेत्र तो तमोगुण ॥ रुद्र बोलिजे ॥ ७५ ॥ आणि चतुर्दिशा चार कान ॥ तेयालिं
गाचे जाणा वेश्रवण॥ पश्चिमपृष्ठीं वर्तले वदन ॥ यालिंगाचें पैं ॥ ७६॥ तरी एवढें स्थूळगा पुरु
षोत्तमा ॥ आतां हें लिंग शिवाचा आत्मा ॥ हें मी पूजित होतों याचा महिमा॥ अगम्य मज ॥ ७७॥ या
लिंगाचें घडे पूजन ॥ तरी सर्वही लिंगें पूजिलीं तेण ॥ पूर्वजांस घडे अमृतपान ॥ शिवसभे सेकेला
सीं ॥ ७८ ॥ जया जन्मांत तरी घडे वाराणसी ॥ तरी सर्वही तीर्थें जाहलीं तयासी ॥ जेणें नमस्कारिलें
विश्वनाथासी ॥ तेणें वंदिलीं सर्वही लिंगें॥ ७९ ॥ पाताळपुढींचीं लिंगें तीर्थें ॥ जीं साक्षाधिकें मह

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

समर्थें ॥ त्यांचीं कोटि दर्शनें व्यर्थें ॥ विश्वनाथ एका दर्शनें ॥ ८० ॥ जीं जीं तीर्थें लिंगें मृत्युमंडळीं ॥ महासाक्षात्का
रयाभूतळीं ॥ सूर्ययाग कीजे त्याजवळी ॥ शतसहस्र पृथक् ॥ ८१ ॥ तरी कुळित्थधान्याचा नैवेद्य ॥ तो शिवा
सि अर्पिजे सप्रेमानंद ॥ मुखीं उच्चारी जो शिव शिव शब्द ॥ त्रयवेळा पैं ॥ ८२ ॥ हें सामर्थ्य अधिक लक्षगु
णें ॥ यासि न तुळती पृथ्वीदानें ॥ आकाशपर्यंत वेदि हिरण्यें ॥ तीं न्यूनचि बोलिजे ॥ ८३ ॥ जो विश्वनाथा
चा नित्य उपासनी ॥ त्यासि नमस्कार करितो वज्रपाणी ॥ दिग्पति आणि ब्रह्मा चक्रपाणी ॥ तो ही आदि
करोनी ॥ ८४ ॥ शंकर वदे विधि हरींसी ॥ मी सहसा न सें कैलासीं ॥ परी प्रगट वाराणसी ॥ सर्वकाळ अ
सें ॥ ८५ ॥ अनंतरूपें माझीं अन्यत्रस्थळीं ॥ मी भरलों असें ब्रह्मांडमंडळीं ॥ परी मी अदृश्य काशी
स्थळीं ॥ सर्वथा नसें पैं ॥ ८६ ॥ जैसें पृथ्वीवेगळें बीज असतां ॥ आणि अंबु मार्जा मिश्रित न होतां ॥
तों वरी अंकुर वृद्धीची वार्ता ॥ न देखिजे चक्षीं ॥ ८७ ॥ कीं जैसें आत्म्याविण अचेतन प्रेत ॥ कीं महा
दानें पात्राविरहित ॥ तैसा अन्यत्रस्थळीं मी किंचित ॥ असें नसें ॥ ८८ ॥ तरी हें माझें आनंदवन ॥
त्रैलोक्यप्रसिद्ध काशीभुवन ॥ हें मूळप्रळयीं अविनाश ह्मणोन ॥ प्रगट असें तेथें मी ॥ ८९ ॥ ऐसें हें
लिंगमहत्वाचें ॥ मज स्मरण नाहीं पूजितो कैंचें ॥ ऐशीं सहस्र वरुषें या लिंगाचें ॥ जाहलें नाहीं दर्शी
न ॥ ९० ॥ म्यां ध्यान केलें अपार युगें वरी ॥ तें पुण्यफळ आलें पूर्वापारीं ॥ तरीच हें गा लिंग विधिहरी
॥ देखिलें आह्मी ॥ ९१ ॥ हें लिंग चतुर्वेदांचा मूळकंद ॥ अठ्यायशीं सहस्र मुनींचा आनंद ॥ सनकादि
कांचा ब्रह्मकंद ॥ हा आनंद विश्वाचा ॥ ९२ ॥ आणिक वदता हे विश्वनाथ ॥ ह्मणे हरी हें लिंग अति
समर्थ ॥ याजवळी दिग्पती भक्त्यर्थ ॥ त्रिकाळ असती ॥ ९३ ॥ कश्यपसुत जो सहस्रनयन ॥ अ
मरावतीचा अधीश शचीरमण ॥ तो भक्त्यर्थ जवळी भृत्यपण ॥ जाणवीत ॥ ९४ ॥ कल्पवृक्षाचीं क
मळें सुंदर ॥ सुगंध सुवर्ण अंबुज अष्टाकार ॥ त्या गर्भी उद्भवलें दिव्यांबर ॥ सोमसूर्य दीप्ति जैशी ॥ ९५
ऐसीं जीं दिव्यांबरें शुद्ध ॥ कल्पवृक्ष चि उद्भवले अगाध ॥ तें अमूल्य चर्चित सुगंध ॥ घेतलें सहस्रपा

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

णी ॥ ९६॥ आणिकविश्वेश्वराचींजींआभरणें ॥कोटिसूर्यांचियातेजेंपूर्ण ॥तींशक्रेंजवळीघेऊन॥उ-
भालिंगाजवळी ॥ ९७॥ सुगंधद्रव्येंशुद्धअवदानादिकें ॥सहस्रज्योतीयागादिकें ॥ऐसेंतेजादिकेंपा
वकें ॥नित्यअर्चिजेयालिंगीं ॥९८॥ सूर्याचाकुमरजोयम॥ तोयालिंगींउनित्यउभाधर्म ॥सर्वहीशिवा
ज्ञेवर्तेनेम ॥सत्यार्थशब्दें ॥ ९९॥ भस्मधारीआयनेसुंदरें ॥गजचर्मदिव्यव्याघ्रांबरें ॥तींघेऊनिजवळ
असतींनिशाचरें ॥ यालिंगाजवळीनैर्ऋतपैं ॥ १०० ॥दिव्यगोदंडाचेराजमान॥ जैसेंदिव्यद्रुमलता
प्रमाण ॥तेयालिंगासिवारीतवरुण ॥पृष्ठीसिउभा ॥ १०१॥ भेरीमृदंगाचेअपार॥ शंखतूर्यदिव्य-
नादस्वर॥ तेयालिंगाजाणवीतसमीर॥ अतिअमान्यपैं ॥२॥ आणिकसहस्रयोजनेंविस्तीर्ण ॥ दिव्यछ
त्रपताकाशुभ्रवर्ण ॥दिव्यमणीजडिलेसंपूर्ण ॥नक्षत्रादिकें ॥ ३॥ ऐसेंजेंछत्रअभ्रशशी ॥उंचएकताळभि
रवेआकाशीं ॥वर्तुळाकारतयासी ॥सोमसूर्यमंडळें ॥ ४॥ षोडशादिकजेपूजायुक्ती ॥सिद्धिसाधनेंनव
विधाभक्ती ॥तेयालिंगापैंजाणवितातिनीतीं ॥ईशानरुद्रजे ॥ ५॥ ऐसेदिग्पतितेथेंभृत्यपणें॥या-
लिंगाजवळीसेवासाधारणे ॥कुबेरनवनिधिपूर्णपणें ॥रक्षितभांडार ॥ ६॥ छप्पन्नविनायकतेथें-
त्रिकाळीं॥नृत्यकरितीयालिंगाजवळी ॥नंदीभृंगीचंद्रसूर्यबद्धांजळी ॥उभेअसतीसन्मुख॥७॥
अठ्यायशींसहस्रमहामुनी॥ तेप्रवर्तलेअसतीहवनीं ॥पृथ्वीपरिघव्हावीह्मणोनी ॥पुण्यवृद्धीकरो-
नी॥ ८ ॥यालिंगाच्यादक्षिणभागींविरिंचिउत्तम॥ स्मरतसेसृष्टिकार्याचाआगम॥ यालिंगाच्यावाम
भागींपुरुषोत्तम ॥ भक्तार्थउभा॥९ ॥यालिंगाचेंचतुर्वेदसगुणें ॥ कथितातिशास्त्रेंपुराणें ॥नीतिमा
र्गव्हावयाकारणें ॥ त्रैलोक्यवृद्धी ॥ ११० ॥जोयालिंगाचावाचाउद्धार॥ तोचतुर्वेदांचाबीजांकुर
॥हेंनिर्बीजउत्तमओंकार॥जेंमूळवेदाचें ॥११॥ ज्याचतुर्दशविद्यासालंकृती ॥पुढेंवोळंगेतेस-
रस्वती॥ आणिकपरिसेगालक्ष्मीपती॥ प्रत्युत्तरमाझें ॥१२ ॥नमस्कारकरावयाविश्वेश्वर॥पंचश ॥४॥
तआलेमत्स्यावतार॥ अष्टोत्तरशतेंअसतांनिर्धार॥ कूर्मरूपेंतुझींहरी॥१३॥ आणिकपरियें

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सांगासाक्षेपें ॥ त्रिशतेंअसतीवराहरूपें ॥ आणिकउग्रनरसिंहप्रतापें ॥ सप्तशतेंआले ॥ १४ ॥ तेथेंपं
चशतआलेवामन ॥ यालिंगासिकरावयाअभिवंदन ॥ परशुरामषट्शतेंपूर्ण ॥ सप्तशतेंराम ॥ १५
॥ तितुकेचिकृष्णाजन्मले ॥ एकवीसशतेंबौद्धजाहले ॥ विश्वनाथेंहरिविरिंचीसबोले ॥ तेमज
नमस्कारिती ॥ ११६ ॥ आणिकलंकीअवतारश्रीपती ॥ तेहिआलेअपरमिती ॥ विश्वनाथवदेहरि
विरिंचीप्रती ॥ ह्मणेमजनसांगवे ॥ १७ ॥ तितुकेहीआलेकाशीमार्गे ॥ त्यांहींआपुलालींस्था
पिलींलिंगें ॥ यक्षराक्षसनरमानवनागें ॥ स्थापिलींसर्वत्रीं ॥ १८ ॥ सप्तपाताळपुटींचेफणी-
वर ॥ मृत्युमंडळींचेमानवीमहेंद्र ॥ स्वर्गींचेदेवगणसुरेंद्र ॥ तितुकेआलेयाकाशीस्थळीं ॥
॥ १९ ॥ जितुकेआलेवाराणसी ॥ अद्यापिअसतीगाहृषीकेशी ॥ आतांमीअसेनत्यालिंगापा
सीं ॥ असंख्यप्रकर्षीं ॥ १२० ॥ महागंगात्रिभुवनींचिया ॥ नर्मदाकावेरीकालिंदिया ॥
भोगावतीमंदाकिनिया ॥ भागिरथीपुण्यजीवन ॥ २१ ॥ कीरणाधूतपापासुभद्रिका ॥ सरस्व
तीवरुणासुचक्षुका ॥ नलिनीपावनीयात्रैलोक्या ॥ महाउद्धारणापें ॥ २२ ॥ ऐशागंगात्रै
लोक्यउद्धरणी ॥ समस्तवसतीकाशीभुवनीं ॥ सप्तसमुद्रआनंदकाननीं ॥ अद्यापिवसतीहो
॥ २३ ॥ ऐशींसर्वहीलिंगेंसर्वहीतीर्थें ॥ जींत्रिलोकींमहासमर्थे ॥ तितुकींहीसेवासाधनार्थे ॥
विश्वनाथलिंगाचिया ॥ २४ ॥ मगसर्वदेवदिग्पती ॥ यक्षराक्षससुरपती ॥ ब्रह्माविष्णुसर्वही
देवती ॥ विश्वनाथलिंग ॥ १२५ ॥ मगशिवह्मणेगालक्ष्मीपती ॥ आतांयाअध्यायाचीसां
गोंफळश्रुती ॥ स्वामीह्मणेगाऋषिअगस्ती ॥ परियेसीआतां ॥ २६ ॥ हाअध्यायजयाश्रव
णपठन ॥ तयाविश्वनाथींजाहलेंदर्शन ॥ पूर्वजासजाहलेंअमृतपान ॥ शिवसभेसिकेला-
सीं ॥ २७ ॥ तेणेंदाधलेसहस्रतुरंग ॥ शतएककेलेसोमयाग ॥ तेणेंस्थापिलेंजीमहालिंग
॥ काशीमध्येंप्रसिद्ध ॥ २८ ॥ शतएकद्विजव्रतबंधनें ॥ सहस्रएकदीधलींगोदानें ॥ भार-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

एकवेंविलींसुवर्णे ॥कुरुक्षेत्रींरविग्रहणीं ॥२९॥ गोदेच्यामूळींत्र्यंबकेश्वरीं ॥तेथींच्याप्रदक्षिणा
अष्टोत्तरी ॥तेणेंकेल्यानिर्धारीं ॥यथाविधिजाणपां ॥१३०॥सेतुबंधरामेश्वरसिंधुतीरीं ॥तोपुजि-
लाभागीरथीनीरीं ॥दर्शनमल्लिकार्जुनशिखरीं ॥जाहलेंशतवेळा ॥ ३१॥ पृथ्वीप्रदक्षिणेचेंसामर्थ्य
॥तेणेंगृहींचपूजिलाविश्वनाथ ॥तेणेंश्रवणकेलेंसर्वग्रंथ ॥ अष्टादशपुराणें ॥ ३२ ॥गोदातीरींस
हस्रब्राह्मणभोजनें ॥यागींहविलींमुक्तेंकींसुवर्णे ॥ अथवाअष्टादशपुराणें ॥परिशिलींतेणें ॥३३
॥स्वामीह्मणेगाऋषिअगस्ती ॥ अपारयाग्रंथाचीफळश्रुती ॥नानायोनिमार्गनिवारती ॥ श्रवणप-
ठनें ॥३४॥ याअध्यायाचेंसामर्थ्यअपार ॥तुळितांथोडेंसप्तहीसिंधूनीर ॥राज्यद्वारआणियमद्वा
र॥ भयापासूनमुक्तकरी ॥१३५॥याअध्यायाचें एवढेंमहिमानें ॥ अल्पवृष्टिकरीवरुण ॥
अमोघजीयाशास्त्राचेंश्रवण ॥कल्पांतींहीनसरे ॥३६॥ब्रह्महत्येचींमहालांछनें ॥गोत्रवध
गोहननें ॥इत्यादिमहापातकलांछनें ॥पराभवतीतत्काळ ॥३७॥स्वामीह्मणेआतांपरियेसी
एक ॥जेकायिकवाचिकमानसिक॥जेदोषअसतीघडलेसांसर्गिक ॥तेनिमिषमात्रेंदूरहोती
॥ ३८ ॥सर्वशास्त्रपुराणांचाअर्थांश ॥आणिभुक्तिमुक्तींचाप्रकाश ॥हाअध्यायश्रवणपठनेंप्र
हेश॥जवळीउभाअसे ॥ ३९॥ हाअध्यायकरितांश्रवणपठन॥ तत्काळविनाशेमहाविघ्न॥पदो
पदींघडेगंगास्नान ॥एवढेंसामर्थ्यपैं ॥१४०॥ वेदांशास्त्रींनाहींज्यांसिप्रायश्चित्त ॥यात्राती
र्थस्नानेंनव्हेतिनिष्कृत ॥हाअध्यायश्रवणघडल्याएकचित्त ॥ तेभंजतीसर्वदोष॥ ४१ ॥
अरेहेंसर्वशास्त्रमहादुर्लभ ॥हेंइच्छितसेविधिपद्मनाभ ॥हेंशास्त्रअनादिसिद्धस्वयंभ ॥
शिवनिर्मितअसे ॥ ४२॥ अरेहासंसारसमुद्रघोरु ॥नरमानवनशकतीउत्तरु ॥ह्मणोनिहें-
शर्वशास्त्रतारू ॥निर्मिलेंशिवें ॥४३ ॥विश्वनाथनामउच्चारितां ॥ महादोषपराभवतीनकरि ॥५॥
तांचिंता ॥वाराणसीगमनउच्चारितां ॥तत्काळमोक्षद ॥१४४ ॥तरीयाअध्यायाचेंश्रवण॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

यादोषवृक्षासिवेधेचंदन॥ कींकर्मधातूचापरिसेसुवर्ण ॥ होऊनिठाके ॥ १४५॥ जैशी
निशीविध्वंसीरविकरीं ॥ कींवज्रघातेंचूर्णहोतीगिरी ॥ तैसाकर्ममातंगासिकेसरी ॥ हाअध्या
यश्रवणमात्रें ॥ ४६॥ स्वामीह्मणेऋषिअगस्ती ॥ मजनसांगवेयाअध्यायाचीफळश्रुती॥
मगत्याविश्वनाथींपशुपती ॥ लयपावलेशिव ॥ ४७॥ हेकथाशिवासिप्रश्नीभवानी ॥ तेंचि
स्वामीसप्रश्नीअगस्तिमुनी ॥ हेकथाभववार्णवतारिणी ॥ व्यासकथीशिष्यांसी ॥ ४८॥ आ
तांस्वामीसप्रश्नीलअगस्ती ॥ हेकथाकेशीहृदधराचित्तीं ॥ शिवदासगोमाप्रार्थीश्रोतयां
प्रती ॥ तेसंकलितपरिसाआतां ॥ १४९॥ ॥ इतिश्रीस्कंदपुराणेकाशीखंडेविश्वेश्व
रलिंगमाहात्म्यवर्णनंनामसप्तसप्ततितमोऽध्यायः ॥ ७७॥ ॥ श्रीकाशीविश्वेश्वरार्पणम
स्तु ॥ ॥ ओव्या ॥ १४९॥ ॥ अध्याय ॥ ७७॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri



CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः॥ ॥स्वामिह्मणेगाअगस्तिश्रोता॥तुजकाशीखंडनिरूपणकरितां॥तेंआदिअं
तअवसानआतां॥सांगोंपूर्वापार॥१॥जेजेकथानिरूपिलीसविस्तर॥तेतेंतूंमजसंकलितसांगेंप्रस्तु
त्तर॥मगतोमहामुनीश्वर॥वदताजाहलास्वामीसी॥२॥अगस्तिह्मणेस्वामीनाथा॥मजसविस्तर
नयेपुण्यकथा॥स्वर्गसरितेचेंस्नानस्वार्था॥पशुकेवींजाणेल॥३॥कल्पद्रुममहिमता॥केवींफळ
तीगापांगारवृक्षलता॥स्फटिकआणिमुक्तेपाहतां॥बहुप्रतिअंतर॥४॥शार्दूलाचियाशक्तिप्रमाणें॥
पक्षपसरूंकपोताकेवींजाणे॥महाकेसरीचीपूर्णमानें॥जंबुककेवींजाणेल॥५॥कमळतंतीबंध
नमातंगा॥कींजेशीउगमींसामावेगंगा॥कींसूर्यअस्ताहोयपूर्वभागा॥पश्चिमेहूनी॥६॥कींत्याराहू-
सिबाधीशीतकर॥कींतृणेंलयविजेवैश्वार॥वृष्टिकरितांकर्दमकुमर॥नेणवेवरुण॥७॥तेंतुझेंगुण
गौरवअपार॥मजकथिलेंनजायसविस्तर॥चातकनप्राशीपृथ्वीनीर॥तेंऐसेंघडे॥८॥नेणोंनि
स्वामीतुझासाक्षेप॥जैसेंउजळेकोटिब्रह्मदीप॥मगतेंपूजितांशिवस्वरूप॥कांपांलक्षवेना॥९॥
मजतपकरितांकाशीस्थानीं॥विघ्नकेलेंसुरेंद्रगीर्वाणीं॥मजअप्राप्तजाहलीधामिनी॥शिवाचीका
शी॥१०॥तंवशुकादिप्रश्नितीसत्यवतीसुता॥वेदव्यासवदेपुराणकर्ता॥अगस्तिसस्वामीप्रश्नितां
॥निरूपिलीकथा॥११॥तपकरितांअगस्तिऋषी॥त्यासिअप्राप्तजाहलीकांकाशी॥व्यासतोनिं-
दादोषेंमहादोषी॥घातलाकाशीबाहेर॥१२॥ऐसेंशुकवैशंपायनांचेंबोलणें॥गुरूसिप्रश्निलेंप्रे
मेंपूर्णें॥मगतोवदलकृष्णद्वैपायनमनें॥परियेसीशुकमुर्ती॥१३॥आधींचआनंदवनकाशी
॥तेथेंतपकरितोअगस्तिऋषी॥महाऋषीमध्येंह्मणिजेत्यासी॥तपेंअग्रगण्य॥१४॥अगस्ती
चेतपाच्याराशी॥स्वर्गींआश्चर्यवर्तलेंदेवांसी॥मगतेसकळदेवेंसी॥गेलेसत्यलोका॥१५॥मगब्र-
ह्यासिवदेवज्रपाणी॥तपकरितसेअगस्तिमुनी॥जाहलेछत्तीससहस्रतरणी॥याअगस्तीदेख ॥१॥
तां॥१६॥मगतयाचियातपाचीगणिता॥कवणसंख्याकरीलजीविधाता॥तोकवणाचेंपदघे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ईलआतां ॥ दीर्घभांडवलीह्मपें ॥ १७ ॥ अपारतयाची पुण्यसामग्री ॥ तपस्थान तरी काशीनगरी ॥ वि-
शेषेंशिवनामउच्चारी ॥ तेथेंकायन्यूनपदार्थ ॥ १८ ॥ इनकेंसहस्राक्षानें बोलणें ॥ भावें परिशिलेंचतु-
राननें ॥ मगदेवेंद्रासिप्रतिवचनें ॥ वदताजाह्लाब्रह्मा ॥ १९ ॥ अगस्तिचीतपसामग्रीअपार ॥ आणि
तपस्थळतें काशीपुर ॥ समक्षाधरितांजाह्लासृष्टिकर ॥ अगस्तिचेनपाची ॥ २० ॥ मगब्रह्माह्मणे
सहस्रनयना ॥ तोमाझेंचपदघेईलजाणा ॥ मीमीतअसें तपस्वीब्राह्मणा ॥ आणियपशिवपूजकां
॥ २१ ॥ मजनाहींत्यांचाविश्वास ॥ ह्मामाझियापदाचाकरीलनाश ॥ तरीसहस्राक्षापरियेसीआया-
स ॥ याशिवभक्तीचा ॥ २२ ॥ पूर्वीउद्भवलाहोतात्रिपुरासुर ॥ त्यानेंलिंगस्थापिलेंत्रिपुरेश्वर ॥ म-
गप्रसन्नजाह्लाविश्वेश्वर ॥ त्यात्रिपुरासिपैं ॥ २३ ॥ मारुतीउस्थापिलेंशिवासी ॥ क्षयकेलामा-
झियासृष्टीसी ॥ मगप्रयासजाह्लामहादेवासी ॥ सृष्टीरक्षितां ॥ २४ ॥ तेणेंकुरुक्षेत्रींयागमांडि-
ला ॥ यागींअगस्तिऋषिआचार्यकेला ॥ तेंसूर्यपूर्णाहुती घातला ॥ याअगस्तीनें ॥ २५ ॥ मग
यागांतूनकाढिलारहंवर ॥ तेंअगस्तीचें तपसार ॥ मगशिवें कापिलातोत्रिपुर ॥ अगस्तीच्यातपब-
ळें ॥ २६ ॥ अदितिकश्यपांचेजेकुमर ॥ हिरण्यकशिपुहिरण्याक्षअसुर ॥ त्यांहींतपकेलेंदुर्धर
॥ वाराणसीमध्यें ॥ २७ ॥ मगतेअसुरमहाद्भुत ॥ त्यांहींपृथ्वीसकेलाकल्पांत ॥ सृष्टीसिसंहा-
रूनिकश्यपसुत ॥ पराभविलेंदेवांसी ॥ २८ ॥ मनींधाकघेऊनिमुरारी ॥ दैत्यांचीस्पर्धाकरू-
निशरीरीं ॥ वैकुंठसांडूनिक्षीरसागरीं ॥ केलेंशयन ॥ २९ ॥ अष्टाविंशतियुगें शार्ङ्गधर ॥ गु-
प्तराहिलाहोतामौनाचारें ॥ मगघेऊनिनारसिंहअवतार ॥ वधिलेतया ॥ ३० ॥ आणिभस्मासु-
रेंशंकरपूजिला ॥ तोभस्मासुरासिप्रसन्नजाह्लला ॥ मगकुबुद्धिसंगेउत्थापिला ॥ शंकरतेणें
॥ ३१ ॥ धरिलाशिवभक्तीचाअभिलाष ॥ शंकराचाकरूंह्मणेनाश ॥ दोनसहस्रवर्षेंमहेश ॥ पळ-
तहोतापैं ॥ ३२ ॥ मगश्रीहरिहोऊनिमोहिनीरूप ॥ तेणेंदैत्यमारिलाकरोनिसाक्षेप ॥ ननतोशि-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

स्वंभरविश्वरूप ॥ तेथेंचिहोता ॥ ३३ ॥ तेणेंचर्क्षांदेखिलीतीमोहिनी ॥ भगतोवीर्यद्रवलाशूळपाणी
॥ तेथेंप्रगटलातोवृषभवहनी ॥ एकादशावारुद्र ॥ ३४ ॥ आणिकजोभृगूचाकुमर ॥ तपेंअग्रज
च्यवनऋषीश्वर ॥ त्यासिप्रसन्नजाहलाशंकर ॥ शंकाबाधेदेवां ॥ ३५ ॥ आणितोमृत्युलोकींकुश
नाभराजा ॥ तेणेंप्रसन्नकेलेंवृषभध्वजा ॥ मागितल्याएकसहस्रआत्मजा ॥ कन्यारूपतणें ॥ ३६ ॥ तोकरू
पाहेशतसहस्रयज्ञ ॥ घेतावैकुंठकींमाझेंभुवन ॥ मगम्यानारदमुनीकारण ॥ पाठविलेंतेथें ॥ ३७ ॥ म
गत्याकुशनाभानियाकन्या ॥ शिवदत्तस्वरूपलावण्या ॥ त्यानारदेंदीधल्यामहामान्या ॥ च्यवनऋषी
श्वरा ॥ ३८ ॥ त्यानंतरेंआलाअगस्तिऋषी ॥ कुशनाभराजकन्यामागावयासी ॥ तेणेंपुत्रिदीधला
तयासी ॥ तेजाहलीलोपामुद्रा ॥ ३९ ॥ ह्मणोनिअगस्तीचीतपशक्ती ॥ कवणलक्षींगासुरपती ॥ तो
माझेंपदघेईलअगस्ती ॥ हेंसत्यजाणा ॥ ४० ॥ ऐसेंचिगाधिसुतेंतपसाधिलें ॥ त्याविश्वामित्रेंआह्मा
सिवैरकेलें ॥ शिवाचीभक्तीकरूनिसिद्धीनेलें ॥ अनुष्ठानतणें ॥ ४१ ॥ त्यासिप्रसन्नजाहलाधूर्जटी ॥
त्याणेंदुसरीआरंभिलीसृष्टी ॥ तैसाचह्माअगस्तिकपर्दी ॥ करीलतिसरीसृष्टी ॥ ४२ ॥ ब्रह्माह्मणे
त्यासहस्रनयना ॥ विघ्नहकीजेत्याचेअनुष्ठाना ॥ आतांकाशीअप्राप्तकीजेत्याब्राह्मणा ॥ एकुणतिस
द्वापरें ॥ ४३ ॥ मगत्यासिव्यासाचेंपददेऊन ॥ कथीलअष्टादशपुराण ॥ मगवाराणसीसिहोईल-
पावन ॥ महाऋषीतो ॥ ४४ ॥ आणिकातीर्थाचीतपसाधना ॥ काशीअधिककल्पगुणा ॥ ह्मणोनिका
शीस्थानींत्याब्राह्मणा ॥ राहोंनदीजे ॥ ४५ ॥ मृत्युलोकींजोतपकरी ॥ तोसुरेंद्राचापूर्णवैरी ॥ पैजा
उढावतीस्वर्गावरी ॥ महातपोबळें ॥ ४६ ॥ ह्मणोनिपरिसारेदेवहो ॥ त्यासिआधींचकराविघ्नहो ॥
पूर्णहोईलतपसंग्रहो ॥ मगनावरतीदेवां ॥ ४७ ॥ विचारणादेखोनिवेदांतीं ॥ उपायेंउढवावातो-
अगस्ती ॥ बलात्कारेंतरीतयावरीशक्ती ॥ नचलेदेवांची ॥ ४८ ॥ भक्तिभावेंप्रसन्नहोतसेदेव ॥ तेथें ॥२॥
बळशक्तीकिमर्थसंदेह ॥ विरोधेंहोतसेपराभव ॥ शरीरप्राणांसी ॥ ४९ ॥ समर्थगोविजेभाकदाना ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तपस्वियांच्याघेईजेशब्दगुणा ॥ राजाप्रार्थिजेसमयपाहोनिजाणा ॥ वरुणवृष्टीजैसा ॥ ५० ॥ मी
पाठवितोंनारदमुनी ॥ एखादाउपायदेखोंमेदिनीं ॥ मगतोविधिआज्ञेंब्रह्मज्ञानी ॥ नारदआलापैं
॥ ५१ ॥ तेणेंरववळलाविंध्याद्री ॥ तोसुवर्णाचलासिस्पर्द्धाकरी ॥ पाहोनिगुणेंविरोधअंगीकारी ॥ तितु-
काहीहोय ॥ ५२ ॥ व्यासह्मणेशुकवैशंपायना ॥ रावणेंनिरोधिलेंत्यांगीर्वाणां ॥ सुरेंद्रदेवघातलेअं
गणा ॥ बहुकाळवरीपैं ॥ ५३ ॥ कृतत्रेताद्वापारकलिजाणा ॥ हींचतुर्दशवेळआलींपूर्णा ॥ तंववरीदे
वहोतेबंदीखाना ॥ त्यालंकादुर्गीपैं ॥ ५४ ॥ ह्मणोनिरंकासिनकीजेबळ ॥ अशक्तांचापाठिराखा
जाश्वनीळ ॥ समयपाहोनिकाळवेळ ॥ तोघातचिंतीतसे ॥ ५५ ॥ ह्मणोनिआचारस्थापिजेशा-
स्त्रनीतीं ॥ वेव्हारकल्पिजेराज्यस्थिती ॥ शांतीक्षमानम्रभावभक्ती ॥ सर्वत्रींकल्पिजे ॥ ५६ ॥
आचारस्थापिजेपाहोनिशास्त्रीं ॥ तोआचारफळेइहपरत्रीं ॥ प्रपंचकरूंतोव्यर्थजगत्रीं ॥ सर्वा
परीनिष्फळ ॥ ५७ ॥ शुद्धविचारतोसत्संग ॥ आपबुद्धितोचिअमार्ग ॥ हाचुकविजेअधःपा
तप्रसंग ॥ श्रीमंतादिकीं ॥ ५८ ॥ राजनीतीपाहोनिकीजेवेव्हार ॥ गुरुमुखेंविणनकीजेनि-
र्धार ॥ कार्यकीजेनह्मणिजेउंचथोर ॥ पाहोनिसमय ॥ ५९ ॥ युद्धकीजेपरदळपाहूनिभूमी ॥
पुरुषार्थदाखविजेस्वामी ॥ मगझुंजिजेसंग्रामीं ॥ तेंमहासार्थक ॥ ६० ॥ आतांअसोहावेव्हारु ॥
स्वामीसप्रार्थीमुनीश्वरु ॥ विंध्याद्रीनेंन्यूनकेलामेरु ॥ हरिलामानदेवांमध्यें ॥ ६१ ॥ तरीप्रथमनिरू
पिलीतेकथा ॥ जेणेंनिरोधिलेंपश्चिमपंथा ॥ सोमसूर्यताराग्रहांसिव्यथा ॥ केलीविंध्याद्रीनें ॥ ६२
॥ मगदेवगलेब्रह्म्यापासी ॥ वृत्तांतजाणविलाविधीसी ॥ तेणेंसबुद्धिउपदेशिलेंदेवांसी ॥ निघ
तेझालेतेथून ॥ ६३ ॥ मगतोकाशीमार्गधरोनिचित्तीं ॥ प्रवेशतेजाहलेअविमुक्तीं ॥ विघ्नकराव-
याआह्माप्रती ॥ आलेप्रतापें ॥ ६४ ॥ मगन्यूनदेखिलेंगिरिसिजाणा ॥ विशेषस्वर्गसरितेचेंस्ना
न ॥ मगविश्वेश्वराचेंपूजन ॥ तेंकल्पफळींअधिक ॥ ६५ ॥ मगनानादानेंकरूनित्यांहीं ॥ सत्पा

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कान्खं० त्रैवृतकेलीसर्वही ॥ जीसर्वदानेंबोलिलीपाहीं ॥ वेदपारायणीं ॥ ६६ ॥ मगआलेंआमुच्चेगुंफाद्वा अ०
॥३॥ रीं ॥ तेथेंसाष्टांगघातलेंक्षितीवरी ॥ मगविज्ञापनाप्रत्युत्तरीं ॥ करितेजाह्ले ॥ ६७ ॥ जेविंध्या ॥७८॥
द्रीनेंकेलीविपत्ती ॥ तेसांगीतलीआह्माप्रती ॥ मगवाखाणिलीआमुचीस्तुती ॥ महातपश्वीज ॥
॥ ६८ ॥ तरीतेपुरुषार्थीदिग्पाळ ॥ पाहतांन्यूनत्यांचेंबळ ॥ जेंविंध्याद्रीचेंदुःखसकळ ॥ सांगो
आलेआह्मापुढें ॥ ६९ ॥ तरीआमुचीतपसामग्रीहोती ॥ मगनाभीकारदीधलातयांप्रती ॥ सा
मग्रीअसोनिपरोपकारवंचिती ॥ तेमहाद्रोहीपैं ॥ ७० ॥ त्यांचेंकार्यकरूह्मणीतलें ॥ मगदे
वींस्वर्गासिगमनकेलें ॥ परीआह्मासिअप्राप्तजाह्लें ॥ आनंदवनतेंकाशी ॥ ७१ ॥ मगकांतेसहि
तझडकरी ॥ आह्मीनिघालोंगुंफेबाहेरी ॥ मगमीविचारिलेंतेअवसरीं ॥ सर्वदेवस्मरण ॥ ७२ ॥
मगआह्मीआलोंविंध्याद्रीजवळा ॥ तंवसानरूपदेखिलेंत्याशैला ॥ जेणेंस्पर्धाकेलीमेरुमंडळा
॥ वरुतांचारकोटी ॥ ७३ ॥ तेथेंतपसामग्रीचावेंचकेला ॥ विंध्याद्रिभूमिगर्भीसामाविला ॥ मगआ
ह्मीदक्षमार्गक्रमिला ॥ तुमचेंअर्धदेसीपैं ॥ ७४ ॥ गोदेचेंकरूनियास्नान ॥ तेणेंशांतकेलामाझा
वियोगाग्न ॥ मगभवानीचेंघेतलेंदर्शन ॥ त्याकोल्हापुरीं ॥ ७५ ॥ मगतियेसिकेलानमस्कार ॥
प्रसन्नमाताबोलिलीवर ॥ ऐसामजदीधलानाभीकार ॥ काशीप्राप्तव्हावया ॥ ७६ ॥ एकुणतिसा
द्वापाराउपरी ॥ तुजप्राप्तहोईलकाशीपुरी ॥ ऐशीवदलीतेभवानीसुंदरी ॥ तोमाझापुण्योद
य ॥ ७७ ॥ मगतेथूनिनिघालोंवेगेंसी ॥ आलोंश्रीशैलपर्वतासी ॥ केलेंस्नानपाताळगंगेसी ॥ तें
महापुण्यतीर्थ ॥ ७८ ॥ देखिलेंमल्लिकार्जुनाचेंशिखर ॥ तेणेंस्वार्थजाह्लाथोर ॥ मजप्राप्तहोई
लकाशीपुर ॥ हेंशिखरदेखिलिया ॥ ७९ ॥ मल्लिकार्जुनजोपंचानन ॥ तोपूजिलाहेंमवनीरम
ण ॥ मगम्यास्तविलात्रिनयन ॥ तंवझालीप्रसादवाणी ॥ ८० ॥ प्रसादवाचासांगेमजप्रती ॥ ॥३॥
तुझीमजपूर्णपावलीभक्ती ॥ तुजप्राप्तहोईलअविमुक्ती ॥ हेंसत्यजाणपां ॥ ८१ ॥ तेथेंमजप्र

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रकेलाकांतेन ।। यामल्लिकार्जुनीराहूआपण ॥ मुक्तीस्तवकल्पिजे काशीभुवन ॥ तेंमुक्तिहेंशि
रवरदेखतां ॥ ८२ ॥ तरीतेह्मणेयेथेंचिराहूंनिश्चित ॥ काशीचेकायसेप्रयास ॥ ह्यालिंगपूर्वती
चामहेश ॥ पूजूंमल्लिकार्जुन ॥ ८३ ॥ मगतुह्मीपूर्वापारींजेंनिरूपिलें ॥ तेंआह्मासिश्रवणाहोतें
केलें ॥ तेंचिलोपामुद्रेसिनिरूपिलें ॥ पूर्वार्धजेका ॥ ८४ ॥ शिवशर्माब्राह्मणमथुरानिवासी ॥ तो-
होतासर्वविद्याअभ्यासी ॥ नानादानेंघडलींत्यासी ॥ परीतोनिंदी आपणातें ॥ ८५ ॥ मगजेमंदा-
किनीमूळमायापुरी ॥ तेथेंतीर्थीशिवशर्मास्नानकरी ॥ मगअकस्मातव्यापलाज्वरीं ॥ जाहलेंदेहद
हन ॥ ८६ ॥ त्यापुण्याचेनिसामर्थ्यपूर्ण ॥ त्यासिवैकुंठाहूनिआलेंविमान ॥ सवेंश्रीनारायणाचे
गण ॥ सुशीळपुण्यशीळजे ॥ ८७ ॥ तैंनिमालातोशिवशर्मा ॥ लिंगशरीरीं घातलात्याचाजीवात्मा
॥ मगतोभेटावयापुरुषोत्तमा ॥ नेतेझालेगणोत्तम ॥ ८८ ॥ विमानीं घातलेंशिवशर्म्यासी ॥ पुष्प
कचालिलेआकाशीं ॥ मार्गीलोकदेखताझालातयांसी ॥ तोप्रश्नीविष्णुगणां ॥ ८९ ॥ प्रथमदे
खिलास्थूळलोक ॥ मगप्रश्निताझालातोद्विजनायक ॥ विष्णुगणासांगतीकौतुक ॥ सुशीळपु
ण्यशीळते ॥ ९० ॥ शिवशर्म्यासिसांगतीगण ॥ यामृत्युलोकींचेमहाकृपण ॥ आपपरवंचितीं
द्रव्यअसून ॥ त्यांसियेथेंवास ॥ ९१ ॥ यापुढेंपिशाचलोकदेखिले ॥ तेव्हांशिवशर्म्यानेंगणां
सिप्रश्निलें ॥ मगत्यागणवीरींत्यासिनिरूपिलें ॥ सविस्तरकेसेंतें ॥ ९२ ॥ हेमृत्युलोकींचेमहा
पापराशी ॥ शिवेंदंडिलेयालोकासी ॥ नेघातलेमहाआदकेसी ॥ ब्रह्मार्णवींपैं ॥ ९३ ॥ त्यापुढें
लोकदेखिलाअप्सरा ॥ त्यासुरांगनाअतिसुंदरा ॥ त्यानिघालियामथितांसागरा ॥ गर्भीहूनिपैं
॥ ९४ ॥ त्याचेंआदिअवसानप्रश्निलें ॥ तेंहरिगणीं शिवशर्म्यासिकथिलें ॥ विमानपुढेंजवक्र
मिलें ॥ तंवदेखिलायमलोक ॥ ९५ ॥ तोसूर्यसंज्ञेचाआत्मज ॥ लवणासुराचाअरिमहिषध्वज
॥ तोशिवशर्म्यासिगरुडध्वज ॥ दूतनिरूपितेझाले ॥ ९६ ॥ सांगीतलेंयमपुरीचेंगुणवर्णन ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दूरें दुर्गउंचीतालविस्तीर्ण ॥ यमपुरीचे मार्गीयातनादारुण ॥ निरूपिलीगणीं ॥ ९७ ॥ ऐशीयम
पुरीचीदिव्यरचना ॥ तेसविस्तरकथिलीब्राह्मणा ॥ जेजेकथासांगीतलीविष्णुगण ॥ तेतेदु
र्लभत्रिभुवनीं ॥ ९८ ॥ पुढतीविमानचालेजंवगगनीं ॥ सूर्यलोकदेखिलानयनीं ॥ तेंशिवशर्म्या
सिविष्णुगणीं ॥ कथिलेंकेसें ॥ ९९ ॥ कथिलागभस्तीचामहिमापूर्ण ॥ जोसृष्टिकार्यासकरीभ्र
मण ॥ कथिलाउदयअस्तअर्घ्यदान ॥ त्रिकाळाचेंपैं ॥ १०० ॥ पुढेंविमानचालेशीघ्रगतीं ॥ तं-
वदेखिलीअमरावती ॥ तेथींचातोस्वामीसुरपती ॥ सहस्राक्षलो ॥ १ ॥ तोआदितिकश्यपाचा
कुमर ॥ चौदामन्वंतरेंआयुष्यीसुरवर ॥ चतुर्दशरत्नेंघरींपरिवार ॥ तेहेतीसकोटिदेवपैं ॥
॥ २ ॥ जेंअमरावतीचेंगुणवर्णन ॥ हेममंदिरेंद्वादशलक्षप्रमाण ॥ सुरपतीचेंऐश्वर्यसंपूर्ण
॥ सांगीतलेंगणीं ॥ ३ ॥ ऐशीसमूळनिरूपिलीकथा ॥ जेपराभवीकिल्बिषव्यथा ॥ तेगणींकथि
लीद्विजनाथा ॥ शिवशर्मियासी ॥ ४ ॥ मगविमानजातांगगनोदरीं ॥ तंवपुढेंदेखिलीअग्निपुरी
॥ तेजन्मभूमीआवधारी ॥ गार्हपत्याची ॥ ५ ॥ तेथेंवैश्वानरब्राह्मणाचाकुमर ॥ जन्मलागार्हप
त्यअंगार ॥ विष्णुगणींसांगीतलासविस्तर ॥ शिवशर्म्यासिपैं ॥ ६ ॥ तेणेंशिवाचीभक्तिकेलीपू
र्ण ॥ मगहेंपदपावलाहुताशन ॥ यागविधिकरावयाकारण ॥ महिमंडळींपैं ॥ ७ ॥ स्वामी
ह्मणेगाअगस्तिमुनी ॥ तुजऐसाश्रोतानाहींत्रिभुवनीं ॥ जेकाशीखंडकथाअंतःकरणीं ॥ ध-
रिलीमहाह्रद ॥ ८ ॥ तरीपुढेंकथाकेशीधरिलीमानसीं ॥ तेआह्मांश्रवणकरीगाअगस्तिऋषी
॥ तेणेंश्रवणेंअहर्निशीं ॥ पराभवतीदोष ॥ ९ ॥ याअध्यायाचीसांगोंफळश्रुती ॥ पूर्वजंकेला
सींअमृतपानकरिती ॥ इच्छाभोजनेंकेलीतृप्ती ॥ सहस्रएकसत्पात्रांची ॥ ११० ॥ भाद्रपद
वद्यअमावास्येसी ॥ रविग्रहणहोतांकुरुक्षेत्रासी ॥ स्यातीर्थीजायजोपुत्रपौत्रेंसी ॥ सुव-
र्णतुळादानदीजे ॥ ११ ॥ ऐसेंजेंघडेअपारपुण्य ॥ करितांअध्यायश्रवणपठन ॥ वाराणसीअ

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

विमुक्तिसंपूर्ण ॥ घडेजीसत्य ॥ ११२ ॥ हाअध्यायश्रवणपठनजयासी ॥ सहस्रगोदानेंतुळतीस्य
र्धेसीं ॥ चतुर्वेदश्रवणत्यासी ॥ जाहलेंसत्य ॥ १३ ॥ हाअध्यायजयाहोयश्रवणपठन ॥ तेणेंसेतु
बंधींकेलेंधारास्नपन ॥ समर्पिलेंभागीरथीचेंजीवन ॥ सहस्रकुंभ ॥ १४ ॥ सहस्रअनुष्ठानओं
कारेश्वरीं ॥ जेथेंसंगमनर्मदाकावेरी ॥ तेथिंचीस्नानेंलक्षवरी ॥ हाअध्यायश्रवणपठनें ॥ ११५ ॥
आणिकसहस्रब्रह्महत्यानासती ॥ गोहत्याहीसहस्रकानहोती ॥ गोत्रहत्याहीपंचशती ॥
होइनातकां ॥ १६ ॥ इत्यादिपापेंजयासी ॥ घडलींअसतीजरीदेहासी ॥ आणिकहीपंचमहा
दोषी ॥ सर्वभस्महोतीश्रवणपठनें ॥ १७ ॥ नासतीसहस्रजन्मींचेदोष ॥ नासतीकन्याविक्र
यदोष ॥ मातागमनइत्यादिदोष ॥ नासतीश्रवणमात्रें ॥ १८ ॥ परीएकाग्रकरोनिमन ॥ तैसें
चिआचरावेंजाण ॥ कुवासनासांडूनिपूर्ण ॥ सत्संगींरमिजे ॥ १९ ॥ सत्पात्रींदीजेद्रव्यदान
॥ तैसेंचिअन्नवस्त्रदान ॥ समदृष्टीपाहावेजीजन ॥ तरीफळश्रुतिसत्यची ॥ १२० ॥ ऐकि
ल्यासारिखेंवर्तणें ॥ सर्वांभूतींभक्तिभावधरणें ॥ सर्वांघटींसमपाहणें ॥ देवअहर्निशीं ॥ २१
॥ हेंकाशीखंडभावेंकरीश्रवण ॥ त्याचीमनकामनाहोयपूर्ण ॥ अपुत्राहोईलपुत्रसंतान ॥
निर्धनाधनप्राप्ती ॥ २२ ॥ ज्याज्याभावेंकरीश्रवणा ॥ तेंतेंपूर्णहोईलमनकामना ॥ इच्छिलें
फळप्राप्तजाणा ॥ देईलकाशीराज ॥ २३ ॥ हेंअनृतनाहींनाहीं ॥ व्यासवाणीसत्यपाही ॥
अंतींकैलासपदपाही ॥ देतसेशिवस्वामी ॥ २४ ॥ आतांतोमहाऋषिअगस्ती ॥ श्रवणकथा
निरूपीलस्वामीप्रती ॥ तेंएकाग्रपरिसावेंमती ॥ ह्मणेशिवदाससगोमा ॥ १२५ ॥ ॥ इतिश्री
स्कंदपुराणेकाशीखंडेग्रंथमाहात्म्यवर्णनंनाम अष्टसप्ततितमोऽध्यायः ॥ ७८ ॥ ॥ श्रीसांब
सदाशिवार्पणमस्तु ॥ ॥ अध्याय ॥ ७८ ॥ ॥ ओव्या ॥ १२५ ॥ ॥ ॥ ॥ ॥१॥
॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri



CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

काखं ॥१॥

श्रीगणेशायनमः ॥ ॥ मगविमानक्रमितांगगनोदरीं ॥ नैर्ऋतलोक देखिला पुढारी ॥ तंवतो शिवशर्माप्रश्नकरी ॥ विष्णुगणांसी ॥ १ ॥ तंवगणसांगतीशुभवाचा ॥ हानैर्ऋत अधिपतिराक्षसां चा ॥ हापूर्वजन्मीं पालीनगरींचा ॥ होताराज्यधर ॥ २ ॥ विंध्याद्रीचे पाठारीं जाण ॥ तेणें काशी करकार्जी वेंचिलाप्राण ॥ तें पिंगाक्षऐसें होतें नामधारण ॥ जातीचाकोळीपें ॥ ३ ॥ मगप्रसन्न झालाशंकर ॥ केला नैर्ऋतिदिशेचाराज्यधर ॥ अक्षयगतिदीधलानाभीकार ॥ दिग्पतीमध्यें ॥ ४ ॥ तरीयाचें आदिअवसान ॥ तुजसमूळ केलें निरूपण ॥ तंवपुढें क्रमिताविमान ॥ देखिला वरुणलोक ॥ ५ ॥ तोचतुर्दशकोटिसैन्येंसी ॥ परीघकरीतसे पृथ्वीसी ॥ विरिंचिनाथाचिया सृष्टीसी ॥ होतसे वृष्टी ॥ ६ ॥ तोकर्दमऋषीचाकुमर ॥ त्यासिप्रसन्नझालाकाशीश्वर ॥ मग तोकेलाराज्यधर ॥ सर्वजळचरांचा ॥ ७ ॥ त्यावरुणाची कथासविस्तर ॥ तुजनिरूपिली पूर्वापार ॥ त्यासिप्राप्त केलागिरिवर ॥ गंधाद्रि पश्चिमेचा ॥ ८ ॥ ऐसातो कर्दमाचाकुमर ॥ शिवें स्थापिलातोभक्तवर ॥ पृथ्वीजनासिदीर्घउपकार ॥ करितसे महादीर्घवृष्टी ॥ ९ ॥ विमान चालेजंवगगनोदरीं ॥ तंवपुढें देखिली रुद्रपुरी ॥ मगशिवशर्माप्रश्नकरी ॥ विष्णुगणांप्र ती ॥ १० ॥ गणह्मणतीगाद्विजमूर्ती ॥ येथें एकादशरुद्र असती ॥ यांसिप्रसन्नझालापशुपती ॥ दीधलीहेरुद्रपुरी ॥ ११ ॥ याहींतपकाशीमध्यें साधिलें ॥ पशुपतीचियाप्रसादबळें ॥ सर्व सिद्धींचेंसाधनकेलें ॥ जोगणाधिपतिभक्तवत्सल ॥ १२ ॥ तरीयाचें आदिअवसानमूळ ॥ तुजनिरूपिलें सकळ ॥ यासिराज्यप्राप्तझालें अढळ ॥ ईशानीदिशेचें पें ॥ १३ ॥ निरूपि लाअलकापुरींचाकुबेर ॥ तोपूर्वजन्मीचाजुगारीतस्कर ॥ काशीस्थळीं प्रसन्नकेलाकाशीश्वर ॥ पावलाहेंपद ॥ १४ ॥ ऐसातोकुबेरशिवव्रती ॥ तोअलकापुरीचाअधिपती ॥ अष्टहीसिद्धि नवनिधिवाळंगती ॥ तोभांडारीशिवाचा ॥ १५ ॥ तोपुर्वजन्मीं अग्निदत्ताचाकुमरु ॥ शिवालं-

अ० ॥१॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

यींप्रवर्तलानेवेद्यचोरू ॥ त्यासप्रसन्नझालात्रिशूळधरू ॥ दीधलेअमितवरां ॥ १६ ॥ मग
तोविश्रवाब्राह्मण ॥ तोपुलस्त्याचानंदन ॥ महातपस्वीतपेंसंपूर्ण ॥ महाऋषींमध्यें ॥ १७ ॥
त्यापासूनिजन्मलाकुबेर ॥ केलाकलिंगदेशींचाराज्यधर ॥ पुनरपिप्रसन्नझालाशंकर ॥ मग-
केलाभांडारी ॥ १८ ॥ गणह्मणतीशिवशर्म्यासी ॥ ऐसाहाकुबेरअलकानिवासी ॥ याचेंआदि-
अवसानतें तुजसी ॥ निरूपिलेंसविस्तर ॥ १९ ॥ मगविमानजातसेगगनोदरीं ॥ तंवचंद्रलोक
देखिलापुढारी ॥ शिवशर्मागणांसिप्रश्नकरी ॥ मगसांगतीगण ॥ २० ॥ यालोकींचाअधिप
तिशीतकर ॥ तेणेंकाशीस्थानींपूजिलाहर ॥ शतपद्में अनुष्ठानअध्वर ॥ केलात्यामृगांकें ॥
॥ २१ ॥ तोअत्रिऋषीचाकुमर ॥ यागीं तृप्तकेलादेववर ॥ मगप्रसन्नझालाजीशंकर ॥ ध
रिलामस्तकीं ॥ २२ ॥ त्याचीआदिअवसानमूळकथा ॥ तुजकथिलीगाद्विजनाथा ॥ जेणेंपरा
भवेमहातापव्यथा ॥ श्रोतयांची ॥ २३ ॥ मगपुढेंक्रमितांविमान ॥ तंवबुधलोकदेखिलाजाण ॥
शिवशर्म्यासिसांगतीगण ॥ बुधाचीकथा ॥ २४ ॥ अरेतोअत्रिसुतशीतकर ॥ तेणेंगुरुकांतेसि
केलाव्यभिचार ॥ तोहाजन्मलाक्षेत्रींकुमर ॥ चंद्रगुरुकांतेचा ॥ २५ ॥ याणेंतपकेलेंकाशी
स्थळीं ॥ मगप्रसन्नजाहलाचंद्रमौळी ॥ तोहास्थापिलायालोकमंडळीं ॥ महादेवेंपैं ॥ २६ ॥
तोंविमानापुढेंजातांशिवशर्मा ॥ तोप्रश्नकरीगणोत्तमा ॥ ह्मणेकराकृपानिधीक्षमा ॥ पुढेंहा
कवणलोक ॥ २७ ॥ गणह्मणतीगाद्विजाअवधारीं ॥ दक्षराजाचियासाठकुमरी ॥ त्यांहींत
पसाधिलेंकाशीपुरीं ॥ स्थापिलींमहालिंगें ॥ २८ ॥ त्यांहींआराधिलाशशिमौळी ॥ शिवप्रसं
न्नजाहलातयांअबळां ॥ मगव्योमींस्थापिल्यानक्षत्रमाळा ॥ तोहानक्षत्रलोक ॥ २९ ॥ महा
उग्रत्यांचीतपसाधना ॥ मगपुरुषांऐशीकेलीनामधारणा ॥ त्यांणींसंतुष्टकरोनिपंचानना ॥
पावल्याहालोक ॥ ३० ॥ मगविमानचालेशीघ्रगतीं ॥ तंवशुक्रलोकदेखिलापुढती ॥ शि

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वशर्मा पुसे गणांप्रती ॥ सांगा जी हा कोण लोक ॥ ३१ ॥ गण सांगती शुद्ध ब्राह्मणा ॥ या लोकीं शुक्र
अधिपति जाणा ॥ यांची मूळ कथा महा सुजाणा ॥ परियेसीं गा द्विजा ॥ ३२ ॥ तो शुक्र भृगूचा नंदन
॥ तेणें प्रसन्न केला पंचानन ॥ त्यासि वर दीधला परिपूर्ण ॥ केला दैत्यगुरु हा ॥ ३३ ॥ पुढें विमा
न जंव वेगें सिद्ध चाले ॥ तंव तेणें मंगळ लोका तें देखिलें ॥ तें शिवशर्म्यासि कथिलें ॥ सविस्तर कैसें
॥ ३४ ॥ हा महादेवाचा वीर्य गोळ ॥ पृथ्वीगर्भीं जन्मला मंगळ ॥ काशीमध्यें तप करोनि जाश्वनीळ ॥ प्र-
सन्न केला ॥ ३५ ॥ विमान चालें जंव पुढती ॥ तंव लोक देखिला दिव्य दीप्ती ॥ मग ते विष्णुगण निरूपि
ती ॥ शिवशर्म्यासि पैं ॥ ३६ ॥ हा अंगिराचा सुत देवगुरु ॥ यायें प्रसन्न केला विश्वेश्वर ॥ त्यासि दीध
ला पूर्ण वरु ॥ देवगुरु मग केला ॥ ३७ ॥ यासि नाम ठेविलें बृहस्पती ॥ केला या लोकींचा अधिपती ॥
तो समूळ वृत्तांत तुजप्रती ॥ निवेदिला शिवशर्म्या ॥ ३८ ॥ मग विमान क्रमितां व्योमपुटीं ॥ तंव श-
निलोक देखिला दृष्टीं ॥ यासि प्रसन्न जाहला धूर्जटी ॥ परियेसीं द्विजोत्तमा ॥ ३९ ॥ हा शनि सूर्य
संज्ञेचा सुत ॥ येणें आराधिला उमाकांत ॥ मग या लोकींचा अधिपति निवांत ॥ केला शंकरें ॥ ४० ॥
येणें तप केलें काशीपुरीसी ॥ भावें पूजिला काशीनिवासी ॥ मग शंकरें ग्रहांमध्यें यासी ॥ दीधली श्रे
ष्ठता ॥ ४१ ॥ मग विमान जातां त्वरेंसीं ॥ तंव देखिलें सप्तऋषी ॥ शिवशर्मा पुसे त्या गणांसी ॥ सां
गा हा कवण लोक ॥ ४२ ॥ तंव बोलती सुशीळ पुण्यशीळ ॥ हें तंव बोलिजे सप्तऋषींचें मंडळ ॥ या-
चें आदि अवसान जें मूळ ॥ तें सांगों तुजप्रती ॥ ४३ ॥ मरीचि वसिष्ठ दक्षराजा ॥ अत्रि भृगु पुलस्त्य
गा द्विजा ॥ सातवा अंगिरा वृषभध्वजा ॥ पूजिलें त्यांहीं ॥ ४४ ॥ तव साधिलें अविमुक्तीसी ॥ मग
शिव प्रसन्न जाहला त्यांसी ॥ ते या लोकीं केले निवासी ॥ महादेवें पैं ॥ ४५ ॥ ऐसें हें सप्तऋषी
चें मंडळ ॥ तुज निरूपिलें गा समूळ ॥ हे विरिंचिदेवाचे सकळ ॥ मानस पुत्र बोलिजे ॥ ४६ ॥ मग
विमान व्योमीं उमपलें ॥ तंव पुढें ध्रुवलोका तें देखिलें ॥ मग शिवशर्म्यानें प्रश्निलें ॥ विष्णुगणां

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सियें ॥ ४७ ॥ गण ह्मणती गा द्विजोत्तमा ॥ परियेसीं या ध्रुवलोकाचा महिमा ॥ येणें आराधिलें पुरुषोत्तमा ॥ हरिहरांसि पैं ॥ ४८ ॥ ह्मा सूर्यवंशीं महा नृपती ॥ पिता उत्तानपाद माता सुनीती ॥ यासि प्रसन्न जाहला कमळापती ॥ समर्पिलें हें पद ॥ ४९ ॥ यासि प्रसन्न जाहला मुरारी ॥ मग येऊनि निजला काशीपुरीं ॥ तेथें लिंग स्थापिलें बरव्यापरी ॥ त्या नाम ध्रुवेश्वर ॥ ५० ॥ ऐसा ध्रुवलोकींचा अधीश ॥ तुज निरूपिला गा सायास ॥ या पदीं कल्पवरी वास ॥ स्थापिला शिवें ॥ ५१ ॥ मग विमान जातां गगनोदरीं ॥ जनलोक देखिला पुढारी ॥ तो शिवशर्मीया सविस्तरीं ॥ कथिला गणोत्तमीं ॥ ५२ ॥ मग जनलोका पुढें विमानीं ॥ महर्लोक सांगीतला गणीं ॥ जेजे पृथ्वीचा धर्मी धुम्रपानी ॥ अष्टांग योग अभ्यासिती ॥ ५३ ॥ ते वसती हे महर्लोकीं ॥ तपसाधनार्थी अनेकी ॥ ते शिवशर्मीया समहा कौतुकीं ॥ कथिले गणोत्तमीं ॥ ५४ ॥ मग त्या महर्लोका पुढारी ॥ विमान जातां गगनोदरीं ॥ तपोलोक देखिला व्योमकोठारीं ॥ शिवशर्म्यानें ॥ ५५ ॥ मग त्याची जे सम्यक कथा ॥ विष्णुगणीं सांगीतली द्विजनाथा ॥ जेणें पराभवे दुरितव्यथा ॥ श्रवणपठनें पैं ॥ ५६ ॥ मग त्या पुढें जातां विमान ॥ देखिलें विधीचें ब्रह्मभुवन ॥ तें सत्यलोक कथिती प्रमाण ॥ सप्तलक्षपैं ॥ ५७ ॥ तेथें चतुराननाचा वास ॥ तो चतुर्विधखाणि सृष्टीचा अधीश ॥ त्याणें प्रसन्न केला महेश ॥ आनंदवनीं ॥ ५८ ॥ केली ब्रह्मेश्वर नामें लिंगस्थापना ॥ पूर्ण आराधिलें पंचानना ॥ मग आधीश केला त्या ब्रह्मभुवना ॥ सत्यलोकीं ब्रह्मा पैं ॥ ५९ ॥ तेथें विमान करूनियां स्थिर ॥ मग वंदिला तो सृष्टिकर ॥ तो सर्व देव दिक्पतींचा पितर ॥ सत्यलोकवासी ॥ ६० ॥ मग जो प्रयागीं त्रिवेणीचा महिमा ॥ त्यासि कथिता जाहला तो ब्रह्मा ॥ जेणें महादोष महाकर्मा ॥ वेगळें होइजे ॥ ६१ ॥ मग ऊर्ध्व क्रमितां तें विमान पुष्पक ॥ पुढें देखिला कवण लोक ॥ गण कथिते जाहले कौतुक ॥ शिवशर्म्यासी ॥ ६२ ॥ ह्मणती गा द्विजा मथुरानिवासी ॥ पार नाहीं तुझ्या भाग्यासी ॥ जे तुज मृत्यु जाहला मायापु

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

 रीसी ॥ भागीरथीमूर्धीं ॥ ६३ ॥ ह्मणोनि विमान जाहलें प्राप्त ॥ स्वर्गमंडळ तुज केलें मुक्त ॥ आतां भे
 टेल तो लक्ष्मीकांत ॥ वैकुंठभुवनीं ॥ ६४ ॥ इतुकें सांगती ते विष्णुगण ॥ तंव देखिलें वैकुंठभुवन ॥ म-
गप्रश्नि ता जाहला तो ब्राह्मण ॥ विष्णुगणांसी ॥ ६५ ॥ गण ह्मणती गा मथुरानिवासी ॥ सालोकीं
लक्ष्मीपति परियेसी ॥ राहि वास करितों तुजसी ॥ दृश्य करूं आतां ॥ ६६ ॥ इतुकें अनुवादले ते ग
ण ॥ तंव तो लक्ष्मीसहित नारायण ॥ शिवशर्म्यासि दीधलें आलिंगन ॥ नेला वैकुंठामध्यें ॥ ६७ ॥
हरीनें शिवशर्मा देखिला येतां ॥ मग उतरला सिंहासनारवालता ॥ बद्धपाणी वंदिला उभयतां ॥
श्रीनारायण ॥ ६८ ॥ मग दाहा सहस्त्र संवत्सर ॥ वैकुंठीं होता तो द्विजवर ॥ भोगीतसे विपुळ शृं
गार ॥ दिव्यांगनांस्या ॥ ६९ ॥ मग वैकुंठभोग सरला ॥ शिवशर्मा जन्मासि घातला ॥ तो वृद्ध का-
ळ राजा जन्मला ॥ नंदिवर्धनदेशीं ॥ ७० ॥ तो नंदिवर्धनीचा राज्यधर ॥ त्रिशत प्रसवला कन्या
कुमर ॥ राज्य केलें लक्ष संवत्सर ॥ स्त्रिया दश सहस्त्र ॥ ७१ ॥ तेणें लक्ष वरुषें राज्य केलें ॥ काशी
कीजे ऐसें मनीं उद्भवलें ॥ मग राज्य पुत्रासि समर्पिलें ॥ जो समस्तांसि श्रेष्ठ पै ॥ ७२ ॥ त्यासि पूर्वज
न्मीं धडली काशी ॥ ह्मणोनि गेला वाराणसी ॥ मग काशीपुरीं आला सहस्त्रियेसी ॥ घेऊनि भांडार ॥
॥ ७३ ॥ मग प्रासाद निर्मिला थोर ॥ लिंग स्थापिलें वृद्धकाळेश्वर ॥ त्यासि प्रसन्न जाहला उमास
हित हर ॥ लय जाहला त्याच लिंगीं ॥ ७४ ॥ अगस्ति ह्मणे जी स्वामिनाथा ॥ हे लोपामुद्रेस निवे
दिली कथा ॥ यानंतरें भेटला सिसमर्था ॥ मज अनाथासी ॥ ७५ ॥ मग कारीखंड निरूपिलें तु-
ह्मीं ॥ ते वाराणसी तुमची जन्मभूमी ॥ हें महाशास्त्र षण्मुख स्वामी ॥ व्यक्त केलें तुह्मीं मज ॥
॥ ७६ ॥ मग शैलशिखरीं केलें दर्शन ॥ मल्लिकार्जुन पूजिला गंगाजीवन ॥ तेथें साधूनियां पूजन ॥
मग आलों भेटी तुमचिया ॥ ७७ ॥ अगस्ति ह्मणे गा ब्रह्मचारी ॥ जी तूं अत्यंत प्रिया शिवगौरी ॥
यानंतरें देखिलासि गिरीवरी ॥ षडाननस्वामी ॥ ७८ ॥ मग काशीवियोगाचा दीर्घ तम ॥ तो

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कअनुक्र- तिकूर॥ तेणेंप्राणांतकेलासृष्टिकर॥ यास्तवकोपपावेचिशूळधर ॥ घातलीब्रह्महत्या ॥९४॥ अ-
॥४॥ तोनिघालाकरशूळयावेगेंनिष्कली ।तीर्थकरणेंसोडिलेंचिनी ॥जोंत्रिभुवनींचींअगाधअस ॥९९
ती ॥शिवनिर्मितजीं कां ॥९५॥ त्रिभुवनींचींतीर्थेंकरूनी ॥काळभैरवेंआलाआनंदवनीं॥
तेथेंदेखोनिस्वर्गतरंगिणी ॥विनाशिलीब्रह्महत्या ॥९६॥ मगतोवेडनिकाशीपुरीं॥अ-
द्यापिराहिलाउग्रशरीरी॥ तरीतेनमहारिजेसुरीं ॥शिवधामिनी ॥९७॥यानंतरेंजोगंधर्वाचा
सुत॥हरिकेशनामेंशिवभक्त॥त्यासिप्रसन्नजाहलाउमाकांत ॥तोजाहलादंडपाणी ॥
॥९८॥तोशिवाचादंडधारीजाहला ॥ आपणाजवळीशिवेंठेविला ॥त्याचामूळविचारनिरू-
पिला ॥षण्मुखस्वामी ॥९९॥मगजेप्रसिद्धज्ञानवापी॥ कलावतीउद्धरलीयाकूपीं ॥ तेक-
थानिरूपिलीसाक्षेपीं ॥षडाननातुह्मी ॥१००॥यानंतरेंकथानिरूपिली॥सदाचारषट्क
र्मेंनिवेदिलीं॥जीभवानीनेंशिवासिप्रश्निलीं ।चतुर्वर्णादिकें ॥१॥मगनिरूपिलागृहस्था
श्रम ॥जोश्रीमंतादिकांचाआचारनेम॥ जोपूराभवीसर्वहीश्रम ॥श्रोतियांजनांचा ॥२॥ म-
गनिरूपिलेंब्रह्मचर्य ।।जेंषडंगतपसाधनाधैर्य ॥ तेंयोगियांचेंपरमगांभीर्य ॥निरूपिलेंस्वा
मी ॥ ३॥मगषट्कर्माचाजोन्यास॥ तोभजनिरूपिलासंन्यास ॥जोभवानीप्रतिआदिमहे
श ॥ अनुवादलाहोता ॥४ ॥यानंतरेंनिरूपिलावानप्रस्थ ॥जेअरण्यवासीपूजिजेअतीत
ऐसेस्वामीतुह्मीकृपावंत॥निरूपिलेआश्रमचारी ॥ १०५॥यानंतरेंस्त्रियांचियाजाती॥ज्याश्रे
ष्ठावर्णावर्णअसती ॥ तरीत्यादाक्षायणीसपशुपती ॥सांगतहोता ॥६॥ प्रथमनिरूपिलेंप-
द्मिनीगुणा॥जेअमरलोकींचीदिव्यांगना ॥तेस्वर्गलोकींहूनमृत्युभुवना ॥येतसेसंनयोगी॥
॥७॥यानंतरेंनिरूपिलीमृगिणी॥जेमृगाक्षीबोलिजेहंसगामिनी ॥ तेमृत्युमंडळींशुभगुणी ॥४॥
॥बोलिजेसामुद्रिकीं ॥८॥यानंतरेंहस्तिनीसांगीतली ॥ जेपुत्रप्रजासौभाग्येंमिरवली॥तरी

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

शरीरासिकरिनसेहोम ॥ शांतजाहलानुजदेखोनियांप्रथम॥ सर्वहिगेलामाझा ॥ ७९ ॥ ऐसातूं मजअनाथानियानाथा ॥ स्वामीभेटलासिगासमर्था ॥ तुवांपराभविलीवियोगव्यथा ॥ शिवें नामामृतें ॥ ८० ॥ मगम्यांपृच्छाआरंभिलीतुह्मा ॥ कैशीउत्पत्तिजाहलीपुरुषोत्तमा ॥ मगतेस विस्तरआह्मा ॥ निरूपिलीस्वामी ॥ ८१ ॥ शिवइच्छेपासूनिजन्मलाचक्रपाणी ॥ तेणेंतपसा धिलेंआनंदवनीं ॥ तीर्थस्थापिलेंचक्रपुष्करिणी ॥ महाकूपतो ॥ ८२ ॥ ऐसेंतपकरितांवैकुंठना यका ॥ हरिजवळीयेणेंजाहलेंत्र्यंबका ॥ यानंतरेंजाहलीमणिकर्णिका ॥ शिवभूषणीतें ॥ ८३ ॥ मगप्रसन्नजाहलागरुडध्वजा ॥ शिवसहवर्तमानदक्षात्मजा ॥ समर्पिलीविष्णूसिकमळ जा ॥ केलात्रैलोक्याधिपती ॥ ८४ ॥ यानंतरेंकथानिरूपिली ॥ जेकन्याहेमाद्रीचीमेनका प्रसवली ॥ तेसीताभागीरथीनामपावली ॥ सगरोद्धारिणीते ॥ ८५ ॥ तेप्रवाहलीहिमाद्री पासून ॥ चित्तींधरोनिदिग्दक्षिण ॥ प्रयागासिआलीजेथेंचतुरानन ॥ होताअनुष्ठानी ॥ ८६ ॥ तेथेंकालिंदीब्रह्मनंदिनी ॥ तेथेंसरस्वतीजाहलीविधीच्याआचमनीं ॥ ऐशीप्रयागींजाहलीत्रि वेणी ॥ भागीरथीते ॥ ८७ ॥ मगपूर्वपंथेंचालिली ॥ शिवाचीपंचकोशीपावली ॥ मणिकर्णि केसिमीनली ॥ जाहलीउत्तरवाहिनी ॥ ८८ ॥ मगकथिलेंतेंगंगामहात्म्य ॥ तेकथानाशीम हाकर्म ॥ जैशींअवदानेंभक्षितांहोम ॥ तैशीदोषवारीते ॥ ८९ ॥ यानंतरेंनिरूपिलीशिव- धामिनी ॥ जेशिवाचीकाशीआनंदवनीं ॥ तेथिचेंरहस्यमाझेंश्रवणीं ॥ श्रुतकेलेंस्वामिया ॥ ९० ॥ ऐसाअविमुक्तीचावास ॥ आणिकैसातेथीचाप्रकाश ॥ तोमजसमूळवाग्विलास ॥ निरूपि लास्वामी ॥ ९१ ॥ यानंतरेंनिरूपिलीकथा ॥ जेशास्त्रार्थज्ञानपरमार्था ॥ तेणेंपराभवेदुरित व्यथा ॥ दोषतापत्रयश्रोतयांचें ॥ ९२ ॥ शिवाचियाक्रोधापासावजाण ॥ तोउग्रमूर्तिजाह लासेउत्पन्न ॥ जैंविवादलेविरिंचिनारायण ॥ परस्परेंपैं ॥ ९३ ॥ तैंकाळभैरवजन्मला अ-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तेशुभगुणीवाखाणिली ॥सामुद्रिकींपैं ॥ ९ ॥मगवाखाणिलीतीचित्रिण ॥जियेसिप्रियश्रृंगारसुवर्ण
भूषण ॥सुरतींप्रियाएकांतकरण ॥सांकडेंवदनतियेचें ॥ ११० ॥मगसांगीतलीतीवडवासमर्थ॥
तियेसिप्रियकुढिशसुरत ॥ तेलंबोदरीउल्लुधीपंथ ॥ चंचळमनतें ॥ ११ ॥ यानंतरेंनिरूपिलीतें
दुर्दशा ॥जेशंखिनीनाममहाराक्षसा ॥ तेप्रहरिजेमहाकर्कशा ॥ त्यागिजेथींमंतादिकीं ॥१२
॥ऐशींस्त्रियांचींलक्षणेंनिरूपिलीं ॥ अगस्तिह्मणेजीपरीयेसीबोली ॥ याअध्यायाचीजेफळ
श्रुतिसांगीतली ॥तेअनुपमकीं ॥ १३॥ तरींहेचिफळश्रुतिपावन ॥हाअध्यायजयाहोयश्रवण
पठन॥ त्यासिमुक्तहोयजीवबंधन ॥त्रैलोक्यमंडळीं ॥१४॥ अवंतिकापुरीद्वारावती ॥मथुरामा
याआणिकांती॥ अयोध्यापुरींपूजिलारघुपती ॥ आणित्रिवेणीस्नान ॥ १५॥ श्रीशैलशिख
रींजाहलेंदर्शन॥ सेतुबंधपूजिलाभागीरथीजळेंकरून ॥ कुरुक्षेत्रींकेलेंहिरण्यदान ॥रविग्रह
णीं॥ १६॥ शतएकदानेंकाशीमध्यें ॥ ईश्वरपूजिलाकमळेंशुद्धें ॥ द्वादशज्योतिर्लिंगेंकपिलादु
ग्धें ॥ पूजिलींतेणेंजाणा ॥१७॥ अगस्तिवदेजीशिवसुता ॥ याअध्यायाचीफळश्रुतिपाहतां॥
तेमजतुह्मीसांगीतलीआतां ॥ तेसांगोंतुह्माप्रती ॥१८॥महाराष्ट्रकींजेअष्टादशपुराणें ॥तेंसा
मर्थ्यसांगोंकितीगुणें॥ येपृथ्वीसिजितुकींगंगासंगमींजीवनें ॥ तितुकींस्नानेंजाहलीं ॥ १९॥
हाअध्यायश्रवणपठनें ॥ षट्शास्त्रेंचतुर्वेदपुराणें ॥सप्तसागरगंगाजीवनें ॥ तेथेंदानेंकेलींसत्पा
त्रीं ॥१२०॥हाअध्यायश्रवणपठनजयाप्रती ॥ तेणेंगंगासंगमींसत्पात्रींकेलीतृप्ती ॥पंचसह-
स्त्रगोदानेंदीधलींगणती ॥रविग्रहणीब्राह्मणांसी ॥ २१॥ आणिकपरिसाफळश्रुती ॥एकल
क्षदीधलेभद्रजाती ॥ तुरंगमदीधलेशुभ्रकांती ॥ पांचलक्ष ॥ २२॥ याअध्यायाचींजितुकींअ
क्षरेंजाणा ॥तितुकियाब्रह्मगिरीच्याप्रदक्षिणा ॥ अष्टोत्तरशतस्वयंवरेंकेलींजाणा ॥ब्राह्मणां
चींपैं ॥ २३॥ सहस्त्रप्रदक्षिणामहाब्रह्मगिरीसी ॥ तेथेंसमाराधनाकेलीकोटिब्राह्मणांसी॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नेंपुण्यघडेहाअध्यायजयासी ॥ श्रवणघडेभावार्थें ॥ २४ ॥ कींसिंहस्थीं द्वादशगंगाप्रदक्षिणा ॥
कींसहस्त्रवरुषें काशीवासजाणा ॥ कींग्रहणकाळींशतभरीसुवर्णा ॥ दीधलेंब्राह्मणासी ॥ २५
॥ कींलक्षएकमुंजीबंधनें ॥ कींसहस्त्रएकगोदानें ॥ कींसहस्त्रवरुषेंपंचाग्निसाधनें ॥ केलेंपंच-
क्रोशासी ॥ २६ ॥ कींपृथ्वीप्रदक्षिणेंचें पुण्य ॥ कींसहस्त्रवेळांरामेश्वरदर्शन ॥ कींशतजन्म
काशीवासजाण ॥ घडेतयासी ॥ २७ ॥ कींलक्षकेलींइच्छाभोजनें ॥ कींसहस्त्रजन्मींवस्त्र-
दानें ॥ कींलक्षकेलींविप्रलग्नें ॥ कन्यागर्तीपैं ॥ २८ ॥ वेदांफळश्रुतिसांगीतलीअपार ॥ ति तु
कींसांगतांहोईलपसर ॥ जेथेंसाक्षात्तवक्ताईश्वर ॥ श्रोतीनरीभवानी ॥ २९ ॥ हेंअनूतनव्हेजी
श्रोतेजन ॥ स्वमुखेंबोलिलाव्यासनारायण ॥ तेंचिम्यांमहाराष्ट्रकरून ॥ सांगीतलेंश्रोतयांप्रती ॥
॥ १३० ॥ इतुकेंगृहींचहोइजेप्राप्त ॥ हाअध्यायघडेंजयापठनश्रुत ॥ शिवदासगोमाह्मणेंययो
क्त ॥ कथापरिसापुढें ॥ १३१ ॥ ॥ इतिश्रीस्कंदपुराणेकाशीखंडेग्रंथमाहात्म्यनिरूप-
णेगतकथासंक्षेपवर्णनंनामएकोनाशीतितमोऽध्यायः ॥ ७९ ॥ ॥ श्रीसांबसदाशिवार्पण
मस्तु ॥ ॥ ओव्या ॥ १३१ ॥ ॥ अध्याय ॥ ७९ ॥ ॥ ॥ ॥ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri



CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः ॥ ॥ऐशींनिरूपिलींस्त्रियांचींलक्षणें ॥मगनिरूपिलींशुद्धाचरणें ॥जेनवभ्र
कारेंघेईजेगुणें ॥वंचिजेअशुभा ॥१॥ यानंतरेंनिरूपिलायोगाभ्यास ॥ज्यानपसाधनादीर्घप्र
यास ॥त्याहूनिशुभसहस्त्रगुणेंकाशीवास ॥निरूपिलादीर्घत्वें ॥२॥ मगसांगीतलीकाळवं
चना ॥जेणेंवंचिजेत्यांयमगणा ॥मगस्वामीनेंनिरूपिल्यारवुणा ॥नक्षत्रकाळाचिया ॥३॥यां
नंतरेंकथारिपुंजयराजा ॥ब्रह्म्यानेंस्थापिलाआपुलेपैजा ॥दिवोदासनामठेवूनिवोजा ॥वाराण
सीमध्यें ॥४॥तोसूर्यवंशीमनूचाकुमर॥ केलाकाशीपुरीचाराज्यधर ॥जैंनिर्जळझालाज
ळधर ॥साठवरुषें ॥५॥ तैंमंदराचलींकमिलेंशिवें ॥इंद्रादिकहरिविरिंचिदेवें ॥मंदराचलासि
वरपूर्णभावें ॥दीधलाशंकरेंपैं ॥६॥ ऐसेंराज्यकरितांतयादिवोदासा ॥ अनुचितउपजलेंदेवा
धीशा ॥दिवोदासराजयासिवळसा ॥करणेंकल्पिला ॥७॥ ह्मणोनिदिवोदासाच्याराष्ट्रींहूनि॥इंद्रें
तत्काळनेलाहुताशन ॥मगराजाहोऊनिक्रोधायमान ॥ पाचारिलेंमंत्रिजना ॥८॥ मगमंत्रियांस
प्रश्नकरीराजेश्वर॥ अमरेशेंनेलाजीअंगार ॥तरीकवणतेऋषिदेवसुर॥ राहिलेयेथें ॥९॥जि
तुकीमाझीराज्यमेदिनी ॥तंवपर्यंतनराहिजेकोणी॥ शीघ्रआज्ञादीजेजेथेंशूळपाणी ॥तेथेंजा
इजेतुह्मी ॥१०॥मगसोमसूर्यआणिपवन॥वृष्टिकरआणिहुताशन ॥हेदिवोदासेंराष्ट्रींहूनि॥
घातलेबाहेरी ॥११॥ मगदेवींयोजिलाअपवाद॥ पाहतीराजाचाछिद्रभेद॥ तंवतोराजास
च्चिदानंद॥ पृथ्वीमंडळीं ॥१२॥मगशिवेंपाठविल्यायोगिनी ॥ त्यामहाविशाळदीर्घाननी॥
त्यासमस्तआलियाआनंदवनीं ॥ पाहिलाछिद्रभेद ॥१३॥ काहींकेल्यानचलेराजयासी ॥मग
त्याराहिल्यागंगातीरासी ॥तेंयोगिनीतीर्थजाहलेंवाराणसी ॥प्रसिद्धवेदीं ॥१४॥ यानंतरेंमंद
रपर्वतीं ॥ काशीवियोगेंप्रवाहलापशुपती ॥मगजवळीउभाहोतागभस्ती॥ त्यासिआज्ञाके
लीशिवें ॥ १५॥मगशिवाज्ञाघेऊनितोसविता ॥ काशीमार्गजाहलाक्रमिता ॥मगराजयाचें

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

छिद्रपाहतां ॥ व्यर्थजाह्लेमनोरथ ॥ १६ ॥ कांहींकेल्यानचलेराजयासी ॥ मगतोराहिलाकाशीनिवा
सी ॥ द्वादशरूपेंघेऊनिपंचक्रोशी ॥ रक्षितराहिला ॥ १७ ॥ प्रथमतोयमादित्यजाह्ला ॥ शिवेंप्र
सन्नहोऊनिस्थापिला ॥ तोअविमुक्तिमध्येंपूजिला ॥ श्रीमंतादिकीं ॥ १८ ॥ यानंतरेंरखोरवोल्कसं
गीतला ॥ जेसाअरुणगरुडांचाजन्मझाला ॥ तोकथाप्रसंगनिरूपिला ॥ षडाननातुह्मीं ॥ १९ ॥
मगतेगरुडाचीजननी ॥ विनताआलीआनंदवनीं ॥ तिणेंपूजिलातोसवितातरणी ॥ तोविनता
दित्य ॥ २० ॥ मगअरुणेंतपकेलेंवाराणसी ॥ प्रसन्नकेलेंवृषभध्वजासी ॥ सूर्यरथीसारथीके
लात्यासी ॥ त्यानामअरुणादित्य ॥ २१ ॥ यानंतरेंउत्तरार्कझाला ॥ विमळकुंडींलोलार्कस्था
पिला ॥ मगसुरारिसुतेंतोपूजिला ॥ तोसांबादित्य ॥ २२ ॥ मगगंगातीरींगंगादित्य ॥ अंतरगृहीं
असेवृद्धादित्य ॥ इत्यादिद्वादशरूपेंगभस्तिसत्य ॥ काशीस्थानींपैं ॥ २३ ॥ ऐशीद्वादशादित्यां
चीकथा ॥ मजनिरूपिलीस्वामिनाथा ॥ आणिकमजकथिलीसमर्था ॥ विरिंचिदेवाची ॥ २४ ॥
व्यर्थजाह्लेसूर्याचेमनोरथ ॥ ऐसेंजाणोनितोविश्वनाथ ॥ ह्मणेआतांकोणक्रमीलपंथ ॥ का
शीपुरीचापैं ॥ २५ ॥ तंवजवळीहोतातोसृष्टिकर ॥ जोशेषशायीचानाभांकुर ॥ त्यासिआज्ञा
देतसर्वेश्वर ॥ आदिमहेशजो ॥ २६ ॥ मगआज्ञावंदोनिविधाता ॥ तोकाशीमार्गजाह्लाक्र
मिता ॥ पञ्चक्रोशीमध्येंवंदिलीसीता ॥ स्वर्गगंगाते ॥ २७ ॥ पाहेराजयाचेंअधर्मद्वार ॥ तं
वतोसत्याधीशनृपवर ॥ मगराजयाजवळीविरिंचिसाचार ॥ यागकरावयाआला ॥ २८ ॥ ब्र-
ह्माकल्पीपंचयागकरणं ॥ राजावदेदशयागकरण ॥ मगआश्चर्यकरीचतुरानन ॥ ह्मणे
राजासत्वाधिक ॥ २९ ॥ मगविधीनेंकेलेदशअध्वर ॥ लिंगस्थापिलेंदशाश्वमेधेश्वर ॥ म-
गत्याचलिंगींतोसृष्टिकर ॥ राहिलावेदनिर्घोष ॥ ३० ॥ ऐसातोराजासत्वधीरसमर्थ ॥ व्यर्थ-
जाह्लेब्रह्मयाचेमनोरथ ॥ तंववियोगेंसंतप्तजाह्लायथार्थ ॥ मंदराचळींशिवपैं ॥ ३१ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

काशीवियोगाचादीर्घअंगार ॥ तृतीयनेत्रींचावैश्वानर ॥ तोसंतप्तकरीतसे अश्वर ॥ नावेकशिवश अ०
रीरीं ॥ ३२ ॥ यानंतरेंजवळीहोतेशिवगण ॥ त्यांसिआज्ञाकरीपंचानन ॥ मगतेहीकरावयाआले ॥ ६०
विघ्न ॥ रिपुंजयासी ॥ ३३ ॥ तेहींछिद्रपाहतांअशक्तजाहले ॥ मगतेलिंगस्थापूनिराहिले ॥ शिव
पूजेशिस्मरतेजाहले ॥ वाराणसीमध्यें ॥ ३४ ॥ यानंतरेंनिरूपिलीकथा ॥ शिवेंआज्ञाकेलीगण
नाथा ॥ तोदिवोदासासिकरीव्यथा ॥ लंबोदररूपें ॥ ३५ ॥ लंबोष्ठकाचामूळवृत्तांत ॥ तोनिरू-
पिलाजीमजसमस्त ॥ तोमहाविघ्नांसिकृतांत ॥ दिग्गजमुंडतो ॥ ३६ ॥ तोकाशीपुरीप्रवेशला
॥ राजलोकांसिअगम्यजाहला ॥ यानंतरेंराज्यभोगसरला ॥ दिवोदासाचापें ॥ ३७ ॥ गणेशंदेखि
लाछिद्रभेद ॥ पाचारूनिपाठविलागोविंद ॥ तोकमळजेसहितपरमानंद ॥ आलागरुडेंसी ॥ ३८
॥ मगमंत्रेंउपदेशिलाराजा ॥ स्वस्तिकारेंस्थापिल्याप्रृथ्वीप्रजा ॥ राजावंदिताजाहलागरुडध्वजा
॥ शक्तीसहित ॥ ३९ ॥ मगवैकुंठप्राप्तजाहलात्यासी ॥ मुक्तिस्थानींबैसविलेंपूर्वजांसी ॥ पीयूषा
हारजाहलादेवसभेसी ॥ पुत्रकलत्रांसहवर्तमान ॥ ४० ॥ यानंतरें मंदराचळींहून ॥ काशीमार्ग
क्रमितोपंचानन ॥ ऐशींसहस्त्रसंवत्सरपूर्ण ॥ राहिलातेथें ॥ ४१ ॥ पंचक्रोशीतटीं आलाशिव
॥ तेथेंतपींहोताकेशव ॥ त्यासिसिद्धिसमर्पीमहादेव ॥ राहिलातेथेंचिपें ॥ ४२ ॥ यानंतरेंअग्नि
बिंदुब्राह्मण ॥ त्यासिप्रसन्नजाहलानारायण ॥ वरदीधलाजोसंपूर्ण ॥ बिंदुमाधवतो ॥ ४३ ॥ म-
गशिवभेटीसगणेशहरी ॥ आलेपंचक्रोशीबाहेरी ॥ मगनमस्कारिलात्रिपुरारी ॥ गणेशेंविष्णू
नें ॥ ४४ ॥ मगत्यागणाधीशाचीस्तुती ॥ बद्धपाणीकरीपशुपती ॥ ह्मणेतुजम्यांकेलेंकाशीपती ॥
धुंडिराजा ॥ ४५ ॥ यानंतरेंतोआदिमहेश ॥ काशीमध्येंकरीप्रवेश ॥ मगभागीरथीमध्येंउमेश ॥
अवलोकीचक्षीं ॥ ४६ ॥ तेथेंउभाठाकलाविश्वनाथ ॥ तेंजाहलेंवृषभध्वजतीर्थ ॥ यानंतरेंविश्वं ॥२॥
भरययार्थ ॥ प्रवेशलेकाशीमध्यें ॥ ४७ ॥ तोंऊर्जमासप्रतिपदाशुद्ध ॥ भौमदिनक्रमूनिसहस्र

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ध ॥ तेदिनीं अनुराधासंपूर्णसिद्ध ॥ अमृतसिद्धियोगहोता ॥ ४८ ॥ यानंतरें तोस्मरारी ॥ सर्व दे-
वेंसिरहेत्रिपुरारी ॥ तीकथानिरूपिलीसविस्तरीं ॥ स्वामिनाथा ॥ ४९ ॥ तें दैत्यवधिलागजा-
सुर ॥ शिवासिप्राप्तजाहलेंगजांबर ॥ तेथेंत्रिलिंगस्थापिलेंउमाहर ॥ तोत्रिलोचनेश्वरपैं ॥
॥ ५० ॥ दुर्वातीर्थजाहलेंकृत्तिवासेश्वरी ॥ तेंमजनिरूपिलेंविस्तरीं ॥ तेथेंवायसजाहले
दिव्यशरीरी ॥ विधिवहनराजहंस ॥ ५१ ॥ यानंतरेंशैलेश्वराचीकथा ॥ मजनिरूपिलीस्वा-
मिनाथा ॥ तेथेंयेणेंजाहलेंसमर्था ॥ शैलेश्वरासी ॥ ५२ ॥ तेंसमूळनिरूपिलेंजीशिवसु-
ता ॥ तेकथाकिल्बिषदहनीअपूर्वता ॥ शैलेश्वरस्यापूनिमागुता ॥ स्थापिलारत्नेश्वर ॥ ५३
॥ मगरत्नेश्वराचाइतिहास ॥ तोमजनिरूपिलापूर्णसायास ॥ मणिकेश्वराचीकथाप्रका-
श ॥ तेहीनिरूपिली ॥ ५४ ॥ यानंतरें कथासविस्तर ॥ मजनिरूपिलातोवीरेश्वर ॥ तेथें
देवांगनालयजाहलासाचार ॥ त्यावीरेश्वरीं ॥ ५५ ॥ मगशिवआणिनंदिकेश्वर ॥ तोत्रि-
विधमूर्त्तिअवतार ॥ तेंसमूळकथानिरूपिलीसविस्तर ॥ शिवसुतामज ॥ ५६ ॥ यानंतरेंक-
थाजीशिवात्मजा ॥ ब्रह्म्याचासुततोदक्षराजा ॥ तेणेंनिषेधिलेंवृषभध्वजा ॥ तेंनिवेदिली
मज ॥ ५७ ॥ त्यादक्षाचीजेमूळउत्पत्ती ॥ तेमजनिरूपिलीमयूरपती ॥ तेणेंलिंगस्थापिलेंअ-
विमुक्तीं ॥ तयानामदक्षेश्वर ॥ ५८ ॥ मगदुर्गासुराचीकथापूर्ण ॥ तोअसुरवधिलाभवानीनें-
जाण ॥ तेंसमूळआदिअवसान ॥ कथिलेंमजप्रती ॥ ५९ ॥ यावरीलिंगेंभुक्तिमुक्तिदायक
॥ तींमजनिरूपिलींअनेक ॥ जींभवानीसिकथीत्र्यंबक ॥ काशीमध्यें ॥ ६० ॥ भागीरथीमध्यें
जींलिंगेंअसती ॥ तींसाठसहस्रकोटिगणती ॥ तींहींसांगीतलींमयूरपती ॥ मजकारणेंपैं ॥ ६१
॥ मगनिरूपिलेंभविष्यपुराणीं ॥ जेंकुक्कुटेंबैसलींविमानीं ॥ काशीमध्येंमुक्तिमंडपस्थानीं
॥ उद्धरिलेतेपैं ॥ ६२ ॥ तेपावनहोतींकैलासीं ॥ अमृतपानकरितीशिवसभेसी ॥ तेंनामपडलें

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मुक्तिमंडपासी ॥ कुक्कुटमंडपऐसें ॥ ६३ ॥ मगनिरूपिलेंदुसरें भविष्य ॥ जेव्यासींनिंदिलाविरू-
पाक्ष ॥ तोभवानीशंकर अपरोक्ष ॥ देखिलाद्वैतभेदें ॥ ६४ ॥ यास्तवव्यासासिबाधिलेंलांछन ॥
शिवमुखेंजाहलेंशापदान ॥ मगतोपावलाव्यथापूर्ण ॥ खरांचेरूपें ॥ ६५ ॥ मगतोघातला
काशीबाहेरी ॥ त्यादुर्दशाकीकटामाझारी ॥ उत्तरवाहिनीचेपूर्वपारीं ॥ स्थापिलेंगंधर्वतीर्थ ॥
॥ ६६ ॥ मगकथानिरूपिलीसाक्षेपा ॥ जेऋषिकन्याजाहलीधूतपापा ॥ तेअभिलाषिलीहोती
जेस्वरूपा ॥ धर्मराजियानें ॥ ६७ ॥ तेशापास्तवजाहलीसरिता ॥ तैसेंचिजाहलेंसूर्याचियासुता ॥
तेकथानिरूपिलीसंपूर्णता ॥ धर्मेश्वराचीपें ॥ ६८ ॥ यानंतरें कथा अपूर्वसार ॥ गयासुरपृष्ठींब्र-
ह्म्यानेंकेलाअध्वर ॥ तेंगयातीर्थजाहलेंगयासुर ॥ वधिलाजेथेंविष्णूनें ॥ ६९ ॥ आतांअसोत
ह्यासर्वहीकथा ॥ मजनिरूपिल्याजीसमर्था ॥ परीतृप्तिनव्हेविविश्वनाथा ॥ माहात्म्यपरिस-
तांपें ॥ ७० ॥ तेकथावीरेश्वराचीसमग्र ॥ कींतेंवेदपुराणांचेंकळसाग्र ॥ यांचेंलोक्यमंडलींका-
शीनगर ॥ प्रासप्राग्येंपैं ॥ ७१ ॥ ऐसेंतेंसंकलितमार्गेंसर्वशास्त्र ॥ सर्वदेवपुराणांमाजीपवि-
त्र ॥ अगस्तीसवदेषड्वक्त्र ॥ परियेसीग्रंथमाहात्म्य ॥ ७२ ॥ समुद्रांमाजीश्रेष्ठताजयाची
॥ स्पर्द्धेसिनतुळेकोणीक्षीराब्धीची ॥ शास्त्रांमाजीतैशीयाग्रंथाची ॥ नतुळतीस्पर्द्धापैं ॥ ७३ ॥
पर्वतांमाजीजैसासुवर्णाचळ ॥ कींपाताळांमाजीतळातळ ॥ तेथेंविश्वनाथाचेंचरणकमळ ॥ अ-
सतेंह्मणोनी ॥ ७४ ॥ द्वीपांमाजीजैसेंजंबुद्वीपजाण ॥ कींपुराणांमाजीस्कंदपुराण ॥ कींखंडां
माजीखंडसगुण ॥ काशीखंडदाहावें ॥ ७५ ॥ व्रतामध्येंव्रतएकादशी ॥ तीर्थांततीर्थवाराण-
सी ॥ ग्रंथांमध्येंसामवेदशाखाजैसी ॥ तैसेंकाशीखंडहें ॥ ७६ ॥ पशूंमाजीजैशीकामधेनु ॥
कींरत्नामध्येंचिंतामणु ॥ कींवनस्पतीमध्येंसगुणु ॥ कल्पवृक्षतो ॥ ७७ ॥ अष्टधातुमध्येंजे-
सेंचोसष्टिक ॥ कींउदकांमध्येंगंगोदक ॥ कींदिव्यमण्यांमध्येंअमोलिक ॥ कौस्तुभमणी ॥ ॥२॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥ ७८ ॥ कीं दिव्यांगनांमध्यें नृत्य उर्वशीचें ॥ त्यामध्यें लावण्य तिलोत्तमेचें ॥ तैसें ग्रंथामध्यें सगुणत्व यां ग्रंथाचें ॥ अहिक पारत्रिक सामर्थ्य ॥ ७९ ॥ सरितांमाजी जैशी त्रिवेणी ॥ कीं बृहस्पति जैसा उडुगणीं ॥ कीं दैत्यांमाजी जैसा एकनयनी ॥ भार्गवतो ॥ ८० ॥ गिरीमध्यें जैसा ब्रह्मगिरी ॥ जेथूनि निघाली गोदावरी ॥ ते त्रिस्थानें समर्थ महासुंदरी ॥ जाहली गौतमी ते ॥ ८१ ॥ तीं त्रिस्थानें ब्रह्मगिरी ॥ दुसरें गंगानाम अज्ञकेश्वरी ॥ तिसरें गंगासागरसंगमेश्वरी ॥ पूर्वसागरींचें ॥ ८२ ॥ यामध्यें जैसा प्रयाग प्रकाश ॥ कीं देवामध्यें जैसा अमरेश ॥ कीं वासामध्यें जैसा निवास ॥ वाराणसीचा ॥ ८३ ॥ जैसा काशीमंडळीं पंचानन ॥ कीं स्वर्गामध्यें कैलासभुवन ॥ तैसें ग्रंथामाजी समर्थपण ॥ या ग्रंथाचें पैं ॥ ८४ ॥ या ग्रंथाचें जो उच्चारी नाम ॥ त्यासि नित्यानित्य वंदी तो यम ॥ आणि पराभवे महाकर्म ॥ सहस्रजन्मींचें ॥ ८५ ॥ ग्रंथ देखिजे चक्षुमंडळीं ॥ मग नमस्कारिजे बद्धांजळी ॥ तेणें पूजिला सहस्रकमळीं ॥ काशीमध्यें विश्वनाथ ॥ ॥ ८६ ॥ नक्षत्रांमध्यें जैसें स्वातीजळ ॥ वृक्षांमाजी देवद्रुम विशाळ ॥ तैसें सर्वजनांसि करिती सुफळ ॥ अंबरगर्भींपैं ॥ ८७ ॥ तैशी हे ग्रंथकथा मंदाकिनी ॥ मृत्युलोकजनां उद्धरणी ॥ ग्रंथ नव्हे हा साक्षात शूळपाणी ॥ शंकर बोलिजे ॥ ८८ ॥ ग्रंथश्रवण कीजे बहुकाळीं ॥ तेणें शंकर पूजिला गंगानीरीं ॥ तरी मातृपितृपक्षांची वस्ती पुरी ॥ कैलासीं पैं ॥ ८९ ॥ षडानन ह्मणे गा अगस्ती ॥ अपार या ग्रंथाची पुण्यशक्ती ॥ उमेसि अनुवादले पशुपती ॥ तें परियेसी आतां ॥ ९० ॥ सर्व देवेंसि सहस्रनयन ॥ सर्व ऋषीश्वरेंसि चतुरानन ॥ लक्ष्मीसह वर्तमान नारायण ॥ इत्यादि ग्रंथ असे जेथें ॥ ९१ ॥ सप्तसागर गंगा सरिता पापभंगा ॥ काशीमध्यें स्थापिलें महालिंगा ॥ परी या ग्रंथाचिया प्रसंगा ॥ यत्न कीजे जेणें ॥ ९२ ॥ तरणि तारापति ग्रहमेदिनी ॥ कुलाचलमेरु तीर्थें त्रिभुवनी ॥ वैकुंठ कैलास तेस्थानीं ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

 ह्याग्रंथअसेजेथें ॥ ९३ ॥ स्वर्गमृत्युपाताळविवरें ॥ तेथेंजींतीर्थेंप्रत्यक्षाकारें ॥ तींसर्वहीवसतीमहिमा
 नुसारें ॥ ह्याग्रंथअसेजेथें ॥ ९४ ॥ ह्याग्रंथनित्यश्रवणपठन ॥ आचारशीलएकाग्रमन ॥ तरीश्रोतेव
क्तेपावन ॥ कैलासपदासी ॥ ९५ ॥ याग्रंथाचेप्रसंगपद्धीका ॥ अक्षरेंव्यंजनेंकान्हेमातृका ॥
तितुकींयुगेंत्याकैलासनायका ॥ अत्यंतप्रियहोय ॥ ९६ ॥ ह्याग्रंथप्रियज्यांश्रीमंतांसी ॥ अल्प
दिनश्रवणपठनासी ॥ जाणावेतेकैलासवासी ॥ शिवाचेसखे ॥ ९७ ॥ ह्याअध्यायएकचित्तेंश्र
वणपठनें ॥ तरीतेणेंमहाराष्ट्रकेलींवेदपुराणें ॥ द्वादशज्योतिर्लिंगपूजनें ॥ केलींमणिकर्णिकाज-
ळें ॥ ९८ ॥ स्वामीह्मणेगाऋषिअगस्ती ॥ याग्रंथाचीकितीसांगूंफळश्रुती ॥ साक्षातवसेउमापशुपती
॥ ह्याग्रंथजेथें ॥ ९९ ॥ अगस्तीसवदेषडानन ॥ याग्रंथानमस्कारीजोमस्तकतुकोन ॥ तरीतेणेंडोल-
विलेंत्रिभुवन ॥ नक्षत्रांसहित ॥ १०० ॥ अगस्तीसवदेषडानन ॥ परियेसीयाग्रंथाचेंपवित्रपण ॥ या
ग्रंथवर्धेसुगुण ॥ कवणाकवणासी ॥ १०१ ॥ जैसेंवनस्पतीमध्येंमलयागिर ॥ आपणासारिखेक
रीसर्वहीतरुवर ॥ कींजैसाव्योमींअसतांशीतकर ॥ तोवृधपद्मिणीसी ॥ २ ॥ ह्मणोनिपवि
त्रतेलोकसकळ ॥ तोदेशपवित्रभूपाळ ॥ तेंनगरपवित्रसर्वकाळ ॥ ह्याग्रंथज्यादेशीं ॥ ३ ॥ ज्या
नगरींसन्मानयाग्रंथाचा ॥ त्यानगरींचीपरामवेविघ्नव्यथा ॥ तेंनगरउद्धरेयमपंथा ॥ वंदितीस
र्वजन ॥ ४ ॥ स्वामीह्मणेअगस्तीअवधारी ॥ आतांकितीसांगोंशिणलीवैखरी ॥ साक्षातेंनग-
रशिवपुरी ॥ ह्याग्रंथश्रवणपठनजेथें ॥ ५ ॥ हेंसत्यगाकथिलेंत्रिनेत्रें ॥ मजनसांगवेषडवक्त्रें ॥
जेंबहुश्रुतत्यांचींमनश्रोत्रें ॥ अतृप्तपरिसतां ॥ ६ ॥ तरीईश्वरवाक्यअगाध ॥ शिवेंनिरूपि-
लेंअनादिसिद्ध ॥ शिवदाक्षायणींचाप्रतिबोध ॥ प्रश्निलाअगस्तीनें ॥ ७ ॥ तोस्वामीनेंनिरूपि
लासविस्तर ॥ शांतजाहलाऋषीचाअंगार ॥ तेंचवदलाव्यासऋषीश्वर ॥ वैशंपायनशुकाप्रती ॥
॥ ८ ॥ तोव्याससत्यवतीचासुत ॥ शतकीर्तिपराशररेतजात ॥ अष्टादशपुराणेंकथित ॥ शिष्यांप्र

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तीर्पें ॥ १०९ ॥ दुर्बळासिकाशीकरण्याचें आर्त ॥ त्यासिद्रव्यदेऊनपाठवीसमर्थ ॥ तरीत्यासिपुण्यजोडे
सत्यार्थ ॥ काशीयात्रादशएक ॥ ११० ॥ काशीमार्गींजाणारांसिपट्टकुळादिवस्त्रें ॥ द्रव्यपाठवीशुद्धमनो
मात्रें ॥ तरीपंचक्रोशीप्रासादाशीं छत्रें ॥ आणिपताकाउभविल्यातेणें ॥ ११ ॥ काशीकरांआज्ञादीजेस्व
नाची ॥ शिवासिप्रणामेंसांगिजेआमुची ॥ तरीत्यासिपुण्यघडेसत्यची ॥ काशीयात्रेचें ॥ १२ ॥ ऐसें-
व्यासेंकथिलेंशिष्यांप्रती ॥ तेमहाआनंदेंधरितीचित्तीं ॥ अरेहाग्रंथपरिसावापुढतपुढती ॥ पुण्य-
स्वार्थास्तव ॥ १३ ॥ संस्कृतबोलिजेजैशीमांदुसा ॥ शास्त्रेंसगुणरत्नेंभरिलींपरियेसा ॥ तींभेदावयाभा
षा ॥ महाराष्ट्रअसेकीं ॥ १४ ॥ हिंहीस्मरलेंगौप्यबोलणें ॥ बहुतश्रुतनेणतीआरुभजनें ॥ तरीसंस्कृ
ताचीमांदुसाउघडणें ॥ महाराष्ट्रकिल्लीकरूनी ॥ १५ ॥ ह्मणोनिपवित्रजीमहाराष्ट्रभाषा ॥ सर्वक
ळव्यक्तचिअसेव्यवसा ॥ जैशीसूर्यविध्वंसीनिशा ॥ मगसर्वहीदिसे ॥ १६ ॥ तैसेंमहाराष्ट्रेंचिणजें
कथन ॥ तेंसर्वजनाअव्यक्तदेखण ॥ ह्मणोनिमहाराष्ट्रतेंसाक्षातदिन ॥ विध्वंसीसंस्कृतनिशा ॥ १७
॥ आतांअसोहेभाषायुक्त ॥ श्रोतेसर्वज्ञजाणतीबहुश्रुत ॥ तरीआणिकएकदृष्टांत ॥ परिसाआतां ॥ १८
॥ ऐशीजाणिजेसंस्कृतभाषा ॥ जैशीनक्षत्रेंलोपतीदिवसां ॥ नातरीमहाराष्ट्रतेचिनिशा ॥ तेव्हांन
क्षत्रबिंबेंदीसती ॥ १९ ॥ श्रोतेहोऐसेंहीघडेप्रमाण ॥ हेंशास्त्रीं अनुवादलेऋषिजन ॥ तोकर्त्ताक
रवितापंचानन ॥ सकळसाक्षी ॥ १२० ॥ तोकरवितापंचाननसद्गुरु ॥ शुभगुणासिमीअसेंप्रार्थ गवि
श्वनाथाचेंउपासनीसतत ॥ शिवाज्ञेंचिअसावें ॥ २१ ॥ ह्मणोनित्यामनोरंगें आज्ञापिलें ॥ मापकेंभ्व
रमुद्रलेंमजसंस्कृतकथिलें ॥ मगम्यामहाराष्ट्रआरंभिलें ॥ जनाचेउपकारास्तव ॥ २२ ॥ तरीव्या-
सऋषिवदलासेअपार ॥ तितुकेंसांगतांहोईलबहुपसर ॥ ह्मणोनिसंकलितसांगतसेंविचार ॥
श्रोतयांलागीं ॥ २३ ॥ तरीग्रंथमाहात्म्यनिरूपण ॥ पुनरपिऐकासावधान ॥ ज्याग्रंथींपार्वतीरमण
॥ साक्षातवसे ॥ २४ ॥ तरीहेकाशीखंडकथाश्रवण ॥ जोकरीश्रवणपठन ॥ त्याचियापुण्यासिचि-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कान्खं. नयन ॥ मस्तकडोलवी ॥ २५ ॥ मजनवर्णवेजीमहिमाअपार ॥ ज्याग्रंथापाशींहरिविरिंचिरूपी अ०
॥५॥ श्वर ॥ गणेशसहवर्तमानकर्पूरगौर ॥ वसेनित्यपें ॥ २६ ॥ ह्माग्रंथज्यादेशींअसेपूर्ण ॥ त्यादेशीं
दुःखकैंचेंदैन्य ॥ परीभावेंकीजेश्रवण ॥ श्रद्धायुक्तपें ॥ २७ ॥ श्रद्धायुक्तकरितांश्रवण ॥ त्यासि
घडेग्रहणींकोटिगोदानपुण्य ॥ आणिशतभरीसुवर्णदान ॥ घडेप्रयागींविप्रांसी ॥ २८ ॥ ऐकतांनये
बधिरकर्ण ॥ वदतांनयेमुकेंवदन ॥ तरीतेणेंद्वयअक्षरें हृदयींपूर्ण ॥ धरिजेभावेंपें ॥ २९ ॥ तरीत्या
सिनिकाळमणिकर्णिकास्नान ॥ द्वादशज्योतिर्लिंगींघडेस्नपन ॥ कोटिएकब्राह्मणभोजन ॥ प्रया
गींकेल्याचेंफळहोय ॥ १३० ॥ याग्रंथाचीजयाआवड ॥ तोशंकराचालडिवाड ॥ तोयमगणांचेंतों
चीतोंड ॥ काशीखंडजयापाशीं ॥ ३१ ॥ ज्यागृहींकाशीखंडकथाश्रवण ॥ त्यासियमरावघालीलो
टांगण ॥ इंद्रासहवर्तमानदेवगण ॥ येतीशरणग्रंथासी ॥ ३२ ॥ अरेह्माग्रंथनव्हेगौरीरमण ॥ ज्या
चेश्रवणेंआकल्पदोषदहन ॥ आणिइच्छिलीवांच्छापूर्ण ॥ करीतसेग्रंथमिषें ॥ ३३ ॥ जेनित्यकरिती
ग्रंथपठन ॥ आणिश्रोताहीपरिसेसावधान ॥ तरीशिवह्मणेत्तमुखेंआपण ॥ नकळेमहिमात्याचापें
॥ ३४ ॥ तरीतोचिसकळतीर्थीन्हाला ॥ तोचितपेंतपिन्नला ॥ तेणेंचिअष्टांगयोगअभ्यासिला ॥
ग्रंथपठनावरी ॥ ३५ ॥ तेणेंचिकेलाकाशीवास ॥ कल्पपर्यंतपूजिलामहेश ॥ अंतींकैलासप
दींवास ॥ महाकल्पपर्यंत ॥ ३६ ॥ सकळहीधर्मतोचिआचरला ॥ सहस्त्रवेळासेतुबंधकेला ॥
लक्षवेळादक्षिणातीर्थेंत्याला ॥ घडलींजाणावें ॥ ३७ ॥ शतवेळागंगाप्रदक्षिणा ॥ सिंहस्थींघडलि
यापूर्णा ॥ कींकोटिएकव्रतबंधना ॥ केलेविप्रांचिया ॥ ३८ ॥ कींकन्यागतींसहस्त्रकन्यादान ॥
अविमुक्तीसिघडलीतयालागून ॥ कींअनाथाचींलक्षएकलग्नेंजाण ॥ केलियाचें पुण्यप्राप्त ॥ ३९ ॥
स्वामीह्मणेअगस्तीप्रती ॥ कितीसांगोंपुढतपुढती ॥ शेषासिनवर्णवेत्याचीस्थिती ॥ सहस्त्रवद ॥५॥
नें ॥ १५० ॥ ह्मणोनियाग्रंथाचामहिमाअपार ॥ वर्णितांश्रमेंसहस्त्रकर ॥ त्यापाशींतिष्ठेविरिंचि

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

हर ॥ सदासर्वदा ॥ ४१ ॥ तोचि योगियांचा मुकुटमणी ॥ तोचि तपियामाजी अग्रगणी ॥ तोचि सिद्धांचा
सिद्ध मुनी ॥ सकळांवरिष्ठ ॥ ४२ ॥ या ग्रंथाचा संग्रह जेणें केला ॥ ते ह्मांचि तो मुक्तिपदासि गेला ॥
जे जे इच्छा करी ते ते त्याला ॥ देतसे तो शिवस्वामी ॥ ४३ ॥ हा ग्रंथ जो परिसे आवडी करून ॥ त्याचा
कुष्ठरुजा यन लागतां क्षण ॥ ब्रह्महत्यादि दोषदहन ॥ होती निमिषार्धे ॥ ४४ ॥ परंतु भावेंकरीं जे जीभ्र
वण ॥ तैसेंच आचरे जो आचरण ॥ तरी त्यापासोनि विघ्न नयन ॥ क्षण एक परता नव्हे ॥ ४५ ॥ त्यासि-
तीर्थांची नाहीं चाड ॥ व्रतांचेंही न लगे कोड ॥ वेदशास्त्रेंही अखंड ॥ न लगे पढावीं ॥ ४६ ॥ ज्यापासि ग्रं
थ मार्गस्थानीं ॥ तरी त्याच्या मागें पुढें चाले शूळपाणी ॥ आठवी स्थळीं रक्षी तयाला गोनी ॥ शक्तिसह
वर्तमान गणेश ॥ ४७ ॥ त्यासि काहीं संकट पडे भारी ॥ तरी शिव स्वांगें निवारी ॥ ऐशी या ग्रंथाची
थोरी ॥ काय सांगों पैं ॥ ४८ ॥ अरे भाव चि धरोनि चित्तीं ॥ ग्रंथ परिसा पुढत पुढती ॥ तरी तेणें तारिले व-
सुमती ॥ जड जीव जितुके ॥ ४९ ॥ त्यासि तपसाधना ही न लगे करावी ॥ तीर्थादिकें ही न लगे फिरा
वीं ॥ जेथें पडेल तेथें सर्व ही ॥ प्राप्त असे तयासी ॥ १५० ॥ जीं जीं योगादिक साधनें ॥ जीं जीं तपअ
नुष्ठानें ॥ जीं जीं धर्मादिक दानें ॥ तीं तीं प्राप्त तयासी ॥ ५१ ॥ तयासीच सकळ धर्म घडला ॥ तेणेंचि
सकळ योगअभ्यासिला ॥ तेणेंचि काशीवास केला ॥ कल्पपर्यंत ॥ ५२ ॥ तेणेंचि कोटि लिंगें पूजि-
लीं ॥ तेणेंचि धूम्रपानें साधिलीं ॥ तेणेंचि प्रासादें बांधिलीं ॥ लक्ष एक ईश्वराचीं ॥ ५३ ॥ तेणें कोटि लिं
गें आवर्तन ॥ पुण्यस्थळीं केलें निर्माण ॥ कीं दशकोटि ब्राह्मणभोजन ॥ केलें तेणेंची ॥ ५४ ॥ तेणें
द्वादशलिंगां नंदादीप ॥ लाविले जी सदोदित ॥ कोटिरुद्र अभिषिंचित ॥ केले तेणें ॥ ५५ ॥ त्यासी
च वेदपठनाचें पुण्य ॥ त्यासीच शिवशास्त्राचें महिमान ॥ अष्टादश पुराणांचें श्रवण पूर्ण ॥ घडलें
तयासी ॥ ५६ ॥ काशीखंड चार अक्षरें ॥ कोणी जप जो करी निर्धारें ॥ त्यासि वंदिजे यमकिंकरें
॥ सदा सर्वकाळ ॥ ५७ ॥ त्यासीच पृथ्वी प्रदक्षिणा घडली ॥ त्यासीच सप्तसमुद्रीं आंघोळी ॥ त:

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

यपासीचंद्रमौळी ॥ शक्तिसहवर्तमानगणेश ॥ ५८ ॥ त्यासीत्रिकाळमूर्तीनिं दर्शन ॥ सकळतीर्थीच अ०
इळेंस्नान ॥ सकळ ऋषींस नित्य भोजन ॥ घडे भाव धरलिया ॥ ५९ ॥ सकळमंत्रांचामुगुटमणी ॥ ॥६०॥
चार अक्षरें जपे जो कोणी ॥ सकळही सामर्थ्यें न याला शूनी ॥ होईल भाव धरलिया ॥ १६० ॥ का-
शीक्षेत्राचा जैसा महिमा ॥ त्याहूनि द्विगुण ग्रंथराज उपमा ॥ हें सत्य सत्य शिव उमा ॥ अनुवादलीं
असती ॥ ६१ ॥ हें नव्हे कवींचें मत ॥ साक्षात बोलिला विश्वनाथ ॥ जो ग्रंथमाहात्म्य मानील अस-
त्य ॥ त्याची जिव्हा झडेल ॥ ६२ ॥ भावें परिसतां भुक्तिमुक्ती ॥ असत्य ह्मणतां नरकप्राप्ती ॥ ज्या
ग्रंथीं वक्ता पशुपती ॥ त्याचा महिमा कोण वर्णी ॥ ६३ ॥ या ग्रंथासि भावें जो करी नमस्कार ॥ त्या
चे सहस्रजन्मदोषांचा होय संव्हार ॥ आणि कल्पनार्चितीं जें जें नर ॥ ते तें तयासी प्राप्त होय ॥ ६४ ॥
जो त्रिकाळ करी ग्रंथदर्शन ॥ पूजा करूनि जो वंदी नरनारीजन ॥ तो निर्जीवन्मुक्त पावन ॥ सकळां
हीं वरिष्ठ ॥ ६५ ॥ सकळऋषींहूनि वरिष्ठ ॥ सकळदेवांघरीस श्रेष्ठ ॥ सकळगणांमाजी स्पष्ट ॥
आवडे शिवातें ॥ ६६ ॥ त्यासि आर्धीं च केलासीं ठाव ॥ शिवें केला स्वयमेव ॥ ऐसा भावाचा भोक्ता दे
व ॥ न ह्मणो उंचनीच ॥ ६७ ॥ पाहा एक बेलपत्रासाठीं ॥ मृगभिल्लांस्थापिले गगनपुटीं ॥ ऐसा उदा
र धूर्जटी ॥ भक्तवत्सलतो ॥ ६८ ॥ उगेंचि मुरवीं शिवनाम जपतां ॥ त्यासि ब्रह्मादिक शरण येती
तत्वतां ॥ तीर्थें मागती चरणतीर्था ॥ आह्मी मुनीत त्याचेनी ॥ ६९ ॥ सकळपापांसि तीर्थें दूर क-
री ॥ तीर्थांच्येही दोष भक्त निवारी ॥ भक्तमहिमा अगम्य लहरी ॥ कोणां वर्णवेल पैं ॥ १७० ॥ ऐसा नाम
स्मरणाचा महिमा ॥ या ग्रंथासि काय देऊं उपमा ॥ ज्या ग्रंथीं साक्षात शिव उमा ॥ अहर्निशीं वसता
ती ॥ ७१ ॥ ग्रंथासि उपमा दीजे ऐशी ॥ भूमंडळीं कवण वस्तु असे साम्यासी ॥ ग्रंथ उपमा द्यावया
सी ॥ नसेचि त्रैलोक्यमंडळीं ॥ ७२ ॥ अरे ज्या ग्रंथीं जाश्वनीळ ॥ जयासि त्रिभुवनज्ञान सकळ ॥ ह्म ॥६॥
णोनि चित्त करोनियां निर्मळ ॥ ग्रंथ पढावा नित्यनित्य ॥ ७३ ॥ संस्कृतभाषा अपार ॥ बोलिला से-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

व्यासमुनीश्वर ॥ तितुका वदलों नाहीं प्रत्युत्तरपसर ॥ ग्रंथअपार वाढेल ॥ १७४ ॥ यालागीं संक
लितनिरूपण ॥ केलें श्रोतयांलागून ॥ यग्रंथीं ठेवा मन ॥ आकल्पदोषदहनीं ॥ १७५ ॥ जि-
तुकें कांहीं विश्वेश्वराचें ध्यान ॥ तितुकें हीं ग्रंथा पासी निरूपण ॥ यास्तव ग्रंथ वंदन ॥ कराश्र
तिआदरेंसी ॥ ७६ ॥ आणिक शिव ह्मणे पार्वती प्रती ॥ गुह्यगुप्त केलें सें वेदांतीं ॥ तें उघडोनियां
तुज प्रती ॥ न सांगें चिमी ॥ ७७ ॥ कीं पुढें योग होईल नष्ट ॥ तीर्थांची खुंटेल वाट ॥ अधर्माची फु
टेल पाहाट ॥ यालागीं न वदें तुज ॥ ७८ ॥ तंव गौरी वदे शिवा प्रती ॥ तें मज निरूपावें यथानिगु-
तीं ॥ मज श्रवणाची बहुत प्रीती ॥ सांगा स्वामी ॥ ७९ ॥ तंव शिव ह्मणे उमे प्रती ॥ माझी आज्ञा वे
दां प्रती ॥ जे म्यां गौप्य करविलीसे स्थिती ॥ काशीखंडाची ॥ १८० ॥ ते प्रगट करूं नये वो जाण
हें गुह्यमत वेदांचें संपूर्ण ॥ हें गुप्तमत आपण ॥ प्रगट सर्वथा न कीजे ॥ ८१ ॥ तंव उमा वदे आनं
दकंदा ॥ मज संकलितची निवेदा ॥ येथें दुजा कोणी परमानंदा ॥ न करी श्रवण ॥ ८२ ॥ मग
शिव वदे पार्वती प्रती ॥ हें श्रुत न करावें कवणा प्रती ॥ कांहीं किंचित तुज प्रती ॥ श्रवण करवूं ॥
॥ ८३ ॥ तरी याग्रंथाचें श्रवण पठन महिमान ॥ एक वेळां सांगों तुजलागून ॥ चित्त एकाग्र करूनि
श्रवण ॥ कीजे गिरिजे ॥ ८४ ॥ जे पृथ्वीतळीं दोषी जन ॥ करिती वेश्यागमन सुरापान ॥ कन्या
विक्रय करून ॥ उदर भरिती ॥ ८५ ॥ जे परगृहीं अग्नि लाविती ॥ जे परनिंदा अखंड करिती ॥ जे सं
तांसि अखंड निंदिती ॥ वादीं होती तत्पर ॥ ८६ ॥ जे मातापितरांसि चरणें हाणिती ॥ जे धान्यकुंभा
सि अग्नि लाविती ॥ जे फळित वृक्षा तोडिती ॥ अम्र कर्दळी आदि अनेक ॥ ८७ ॥ जे पर्वतीं अग्नि
लाविती ॥ नांदतें घर बुडविती ॥ जे लक्षानुलक्ष ब्रह्मघात करिती ॥ जयांचा आचार अमंगळ ॥
॥ ८८ ॥ जो विधवागमनीं तत्पर ॥ जो नाहाडी करूनि भरी उदर ॥ जो कन्यागमनी असे नर ॥ सर्वदा पैं
॥ ८९ ॥ जो असत्य गोष्टी वदे सभेसी ॥ खव्याचें खोटें करी पंचाइतीसी ॥ जो लांच घेऊनि दुजिया

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सी ॥ बुडवीसमूळ ॥ १९० ॥ विनापराधें हत्या करी ॥ जो गाई सचरतां जीवें मारी ॥ जो स्त्रीहत्येची अ
शंका न धरी ॥ मनांत कांहीं ॥ ९१ ॥ गोत्रहत्या ज्याचे शिरीं ॥ असती कांसहस्त्रसंवत्सरीं ॥ बाळहत्ये-
ची गणना तरी ॥ नसे जयासी ॥ ९२ ॥ जे कन्याविक्रय गोविक्रय करिती ॥ मिथ्या अनाथासि बंदीं घा
लिती ॥ जे रात्रीं येऊनि रवणती घेती ॥ व्यर्थ छेदिती तस्कर ॥ ९३ ॥ जे अभक्ष्य भक्षण करिती ॥ जे
असंगाचा संग करिती ॥ जे अन्ययातीसि ऋतु देती ॥ कामातुर ॥ ९४ ॥ जे भगिनीसीं रति माग
ती ॥ नेदीं ह्मणतां बलात्कार करिती ॥ तिचें वचन अमान्य मानिती ॥ माता अभिलाषिती पापी नर
॥ ९५ ॥ जे द्रव्यासाठीं पित्यासि वधिती ॥ बंधु गोत्रजांसि विष देती ॥ अल्पासाठीं घात करिती ॥
ते पापी नर ॥ ९६ ॥ जे नाना पशूंची हत्या करिती ॥ जे यात्राकरस्यांस मार्गी बधिती ॥ जे अनाचारें
सदा वर्तती ॥ आचारभ्रष्ट ॥ ९७ ॥ जे स्वामीचा विश्वासघात करिती ॥ जे गुरुवचन अमान्य मा-
निती ॥ जे सत्पात्राची निंदा करिती ॥ सर्वकाळ ॥ ९८ ॥ जो तीर्थी करी दलाली ॥ डोळा चुकवूनि
वस्त्रपात्र उचली ॥ आणि आपण चितळ मळी ॥ काय जाहलें ह्मणोनी ॥ ९९ ॥ जे वतन भूमिका
हिरोनि घेती ॥ बळ केलिया जीवें मारिती ॥ पात्रापात्र न विचारिती ॥ ते महा अधम ॥ २०० ॥ जे-
परस्त्रियांसि बळें हरिती ॥ कुलांगनेसि दास्य देती ॥ उत्तम मध्यम न विचारिती ॥ मागती रती सर्व
त्रांसी ॥ २०१ ॥ जे ब्राह्मणांची लग्नें मोडिती ॥ गतभ्रतारकन्येसि वर नेमिती ॥ विप्र असोनि ऐशीं
कर्में करिती ॥ त्यांचा भार भूमी न साहे ॥ २ ॥ वधोनियां निद्रिताला ॥ ह्मणती आमुचा अभिमान सि
द्धी सगेला ॥ ऐशिया पापी नराला ॥ निर्गती नाहीं ॥ ३ ॥ महा तीर्थी अनाचारें वर्तती ॥ करूं नये तें
च करिती ॥ शेवटीं देवतीर्थासि ह्मी निंदिती ॥ पापी नर ॥ ४ ॥ ऐसे पापी नर सांगतां ॥ संवत्सर एक
लागेल लिहितां ॥ तरी दोष न सरती सर्वथा ॥ सांगतां डमे ॥ ५ ॥ हो तकां पंच महा दोषी जन ॥ गो-
हत्यारा ब्रह्मघातकी जाण ॥ महापातकी कृतघ्न ॥ असोल कां भलतें से ॥ ६ ॥ ऐशीं पातकें जयाचे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

शिरीं ॥ ज्यासिनिर्गतिनाहींचंद्रार्कवरी ॥ ब्रह्माविष्णुनअंगीकारी ॥ तयापातकियासी ॥ ७ ॥ ती-
र्थाचेंनचलेकांहीं ॥ प्रायश्चित्ततरीबोलिलेंचिनाहीं ॥ ऐशियानराचीनिर्गतिपाहीं ॥ असेचिनावे
दशास्त्रीं ॥ ८ ॥ ऐसेहेंनरपापीजन ॥ भावेंकरितीग्रंथपठन ॥ तत्काळदोषहोतीदहन ॥ जैसेंतृ-
णअग्निसंगें ॥ ९ ॥ परीकेलेंकर्मनयेपुन्हाकरूं ॥ केलेंतरीकोणेकाळींनउद्धरेनरु ॥ अनंतयुगें
तोनिर्धारु ॥ नरकचिभोगी ॥ २१० ॥ इतुकीसंख्याजाहलियाजाण ॥ मगत्यासियोनिकोणकोण
॥ तेंहीपरिसासावधान ॥ सांगोंतुह्माप्रती ॥ ११ ॥ श्वानसूकरव्याघ्रउरग ॥ अजाकुक्कुटबकक
ग ॥ बेडुकवृश्चिकसरडग ॥ ऐशाअनेकयोनी ॥ १२ ॥ कल्पानुकल्पपर्यंत ॥ तेचयोनीतया
सप्राप्त ॥ कोणेकाळींनरयोनींत ॥ नयेनयेसर्वथा ॥ १३ ॥ याकारणेंमागीलकर्मदूरकरून ॥
सद्भावेंपरिसतांग्रंथनिरूपण ॥ तरीकेलेंदोषदहन ॥ तत्काळपैं ॥ १४ ॥ ऐसाग्रंथमहिमाअ-
पार ॥ जेथेंतिष्ठतीइंद्रादिसुरवर ॥ अष्टदिग्पाळसमग्र ॥ अहर्निशीतिष्ठतीपैं ॥ १५ ॥ अठ्यांशीं
सहस्रऋषीश्वर ॥ शक्तीसहवर्तमानवसतीनिरंतर ॥ यक्षगणगंधर्वकिन्नरसमग्र ॥ ग्रंथापाशीं
तिष्ठती ॥ १६ ॥ सिद्धसाधकसर्वजन ॥ नवनिधिअष्टमहासिद्धिपूर्ण ॥ सोळासिद्धनवनाथना
रायण ॥ अहर्निशींग्रंथापाशी ॥ १७ ॥ विधिहरशक्तिसहवर्तमान ॥ ग्रंथापाशीक्रीडतीपूर्ण ॥ ज्या
ज्यापतिव्रताआपण ॥ ग्रंथदर्शनइच्छिती ॥ १८ ॥ नातरीगायन्नगदेत्यदानव ॥ देखोनियेतीग्रं-
थवैभव ॥ तीर्थराजतरीसहस्वयमेव ॥ असतीयाग्रंथीं ॥ १९ ॥ साक्षातशिवचिआपण ॥ शक्तिस
हवर्तमानग्रंथींजाण ॥ मागेंपुढेंशिवगण ॥ इच्छितीदर्शनग्रंथाचें ॥ २२० ॥ हरिहरउपासनिकना
रीनर ॥ ग्रंथींतिष्ठतीअष्टहीप्रहर ॥ चंद्रसूर्यादिघटिकाकर ॥ सर्वकाळतिष्ठती ॥ २१ ॥ ग्रंथापा
शीदेवशिवसहवर्तमान ॥ निरंतरअसतीपैंआपण ॥ यास्तवग्रंथाचेंवंदन ॥ करावंस्वहितार्थ ॥
॥ २२ ॥ जेंजेंसांगीतलेंग्रंथाप्रती ॥ तितुक्यांसहीनमस्कारपावती ॥ सकळदर्शनाचांभासा ॥ चं

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दींग्रंथतयापडे ॥ २३ ॥हासाक्षातशिवभवानीसंवाद ॥जेवदलाअनादिसिद्ध ॥ आगमधुंडो
नियांस्वयेंबोध ॥ केलापार्वतीप्रती ॥ २४॥ शिववदलाभवानीप्रती ॥इकडे व्याससांगेवै-
शंपायनानिगुतीं ॥तेंचिस्वामीनिरूपीअगस्तीप्रती ॥संकलितभावें ॥ २२५॥याकारणेंग्रंथ
वंदिजेनित्यनित्य ॥पठनकीजेभावसंयुक्त ॥तरीदोषजाऊनिकैलासप्राप्त॥ तथानरासीपैं ॥
॥ २६॥छळवादीनष्टदुर्जन॥ याग्रंथासिठेवितीलदूषण॥ तत्काळकुष्ठरोगीहोतीलजाण॥हे
सत्यआज्ञाशिवाची ॥ २७॥ ग्रंथनदीजेमहानष्टासी ॥ग्रंथनदीजेमतवादियांसी ॥ ग्रंथनदी-
जेमहादुष्टांसी ॥शिवाज्ञाऐशीअसे ॥२८॥ग्रंथनदीजेनिगुज्यासी ॥ग्रंथनदीजेरवळासी
॥ग्रंथनदीजेअविश्वासियासी ॥शिवाचीआज्ञाअसे ॥ २९॥ येथेंशिवभवानीवदनामृत ॥
पूर्वसुकृतेंहोयप्राप्त ॥नष्टासियेथींचादृष्टांत॥ कल्पांतींहीनव्हेची ॥ २३० ॥ आकाशासिका-
जळलाविती॥लावील्याचेमारवेहाता ॥तेवींग्रंथासिशब्दठेविता ॥बोलेतोचिदोषीहोय॥३१॥
हेंशिवपार्वतीचेंगुह्यज्ञान॥ धर्मशास्त्रकथानिरूपण॥ सकळआगमाचेंसारपूर्ण ॥शिवेंनि-
रूपिलेंभवानीसी ॥ ३२॥हे कथासकळवेदांचेंसार॥ सकळशास्त्रांचेंनिजजिव्हार ॥सकळगु
णांचेंगुणगांभीर्य ॥काशीखंडकथा ॥ ३३॥ सकळतीर्थांचेंमाहेर॥ सकळयोगियांचें योगसा
र ॥ सकळतपाचेंतपैश्वर्यथोर॥ काशीखंडकथाहे ॥ ३४ ॥ यास्तवग्रंथकीजेनित्यश्रवण ॥
ग्रंथापाशीपंचानन ॥इच्छिलेंफळदेतसेजाण॥मनाआवडेजेंजें ॥ ३५॥ काशीखंडकथानिधा
न ॥ आवडींकरावेंश्रवण॥ कल्पदोषांहोयदहन ॥एकश्लोकपरिसतां॥ ३६॥ मजनवर्णा
वेग्रंथमहिमान ॥ ब्रह्मादिकांअतर्क्यजाण॥ शेषश्रमलाजीआपण॥ महिमागहनग्रंथाचा
॥ ३७॥ग्रंथाभिमानीपंचानन ॥इच्छाफळदेतसेपूर्ण ॥ अंतींकैलासपदपावन ॥देतसेशिव
स्वामी ॥ ३८ ॥स्वामीह्मणेअगस्तीप्रती ॥ग्रंथमाहात्म्यनिरूपिलेंतुजप्रती ॥तुजहींप्राप्त

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सांगावयासी ॥ ऐसेंसामर्थ्यअसेकवणासी ॥ स्वामी ह्मणेअगस्तिऋषी ॥ नबोलवेषड्वक्त्रें ॥ ५५ ॥
कायसांगोंग्रंथमहिमान ॥ ज्याग्रंथींऋषिदेवत्रिनयन ॥ शक्रसहवर्तमानजाण ॥ सर्वकाळतिष्ठती
॥ ५६ ॥ तरीऐशीग्रंथाची फळश्रुती ॥ कायसांगोंश्रोतयांप्रती ॥ ब्रह्मादिदेवांअगम्यस्थिती ॥ तेफ
श्रुतीवदावी ॥ ५७ ॥ तंवअगस्तिह्मणेस्वामिनाथा ॥ तुह्मीवदलेतियथार्था ॥ नकळेकाशीखंडमहिम
ता ॥ मजतत्त्वतांकळोंसरली ॥ ५८ ॥ तरीएकअसेजीविचार ॥ ज्याग्रंथींवक्ताशंकर ॥ श्रोता
तरीपार्वतीऐसाचतुर ॥ काशीखंडग्रंथीं ॥ ५९ ॥ तेंश्रवणतुह्मांजाहलेंसकळही ॥ तरीसंकलि
तमार्गेंसांगोंकाहीं ॥ श्रवणकरावयाइच्छापाही ॥ उद्भवलीथोर ॥ २६० ॥ स्वामीदीनावरीकृपा
करून ॥ मजकरापांकथाश्रवण ॥ ऐकावयाक्षुकेलेंमन ॥ अधिकाधिक ॥ ६१ ॥ तोंस्वामीह्म
णेअगस्तिमुनी ॥ फळश्रुतिनवदवेमज वदनीं ॥ ऐसेंसामर्थ्येंकोणालागूनी ॥ ग्रंथफळश्रुती
चें ॥ ६२ ॥ याग्रंथाचामहिमागहन ॥ सांगेऐसाअसेकोण ॥ वदेविरिंचिनारायण ॥ नकळे
महिमानग्रंथाचें ॥ ६३ ॥ तंवअगस्तिह्मणेस्वामीप्रती ॥ तूंकेवळज्ञानमूर्ती ॥ किंचितकिंचि
तमजप्रती ॥ निरूपाग्रंथमहिमा ॥ ६४ ॥ तंवस्वामीवदेअगस्तीप्रती ॥ अपारयाग्रंथाचीफल
श्रुती ॥ बोलतांश्रमल्यावेदस्मृती ॥ तेथेंतुजप्रतीकायसांगों ॥ ६५ ॥ आतांसंकलितांचेंहिकिं
चित ॥ ऐकाएकाग्रकरोनिचित्त ॥ तुजनिरूपूंइत्थंभूत ॥ किंचितांतकिंचितऐकेपां ॥ ६६ ॥ जो
ग्रंथकरीलश्रवणपठन ॥ जोग्रंथकरीत्रिकाळवंदन ॥ ज्यासिअखंडशिवस्मरण ॥ त्यापाशींत्रि
नयनसर्वदा ॥ ६७ ॥ त्याजपासूनिअर्धक्षण ॥ परतानव्हेचीत्रिनयन ॥ त्याचेंजडभारानिवा
रून ॥ अंतींपदपावणेकैलास ॥ ६८ ॥ जोनित्यवाचीग्रंथबोली ॥ जोत्रिकाळग्रंथदृष्टीं-
न्याहाळी ॥ त्याजपासोनिचंद्रमौळी ॥ अणुमात्रपरतानव्हे ॥ ६९ ॥ हाग्रंथजोपढेनर ॥ त्या
चियापुण्याचानाहींपार ॥ तोचिसकळयोगाभ्यासीनर ॥ सकळांवरिष्ठ ॥ २७० ॥ त्यासिन

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

होईलअविमुक्ती ॥एकुणतिसावे द्वापारीं ॥२३९॥ तंववरी क्रमिजे याप्रांतासी ॥ काशीखं
डकथाधरोनिमानसी ॥ तूंपावसीअविमुक्तीसी ॥निश्चयेंसीपैं ॥२४०॥ ग्रंथमाहात्म्यजा
हलेंसंपूर्ण ॥यापुढेंग्रंथफळश्रुतितोकेवळदीन ॥तरीसंकलितचिकरूंश्रवण ॥फळश्रुती
पैं ॥४१॥हाअध्यायजोकरीलश्रवण ॥ प्रयागींसहस्त्रवरुषेंघडेमाघस्नान ॥गयेसिघडेग
यावर्जन॥सहस्त्रएक ॥ ४२॥ तयासिकाशीवासशतजन्मपर्यंत ॥ कींसहस्त्रकमळींनित्य
पूजीउमाकांत॥ कींग्रहणींकोटिधेनुसालंकृत ॥ अर्पिल्याऋषिवृंदांसी ॥४३॥कींशतभार
सुवर्णदान ॥रविग्रहणींअर्पीद्विजांकारण॥ द्वादशयात्रासेतुबंधन॥ झाल्यातयासी ॥४४॥
निर्धनासिहोयधनप्राप्ती ॥ अपुत्रिकासिहोयपुत्रसंतती ॥ वांझेसिहोयफळप्राप्ती ॥याअध्या
याचेश्रवणें ॥ ४५ ॥ अरेकोडियांचीकोडेंजाती ॥ संबंधादिपीडाहरती ॥सकळविघ्नेंपराभ-
वती ॥ अध्यायश्रवणें ॥ ४६॥बंदींपडलाहोयमुक्त॥ चिंतिलेंपाविजेआर्त ॥ग्रहपीडादिस
मस्त ॥नबाधितीतयासी ॥ ४७॥ विघ्नाचेंहोयनिर्विघ्न ॥ आकल्पपापेंहोतीदहन॥ ज्ञान
इच्छीतरीसंपूर्ण ॥ योगीराजचिहोयपैं ॥ ४८ ॥जरीइच्छितीशिवदर्शन ॥ तरीसाक्षातत्र्यं
बकपंचानन ॥निर्गुणरूपेंपैंआपण ॥ग्रंथचिअसे ॥ ४९॥ भुक्तिइच्छीतरीदरिद्रहरण॥
मुक्तिइच्छीतरीकैलासपदपावन ॥ सेवाह्मणूनतरीग्रंथचिआपण॥ त्रिकाळवंदिजे ॥२५०
हाअध्यायश्रवणकरिती ॥त्यासिघडेअविमुक्ती ॥ आणिचिंतिलापदार्थपावती ॥अध्या
यश्रवणें ॥ ५१॥ याअध्यायाचीफळश्रुतिसांगतां ॥ नवर्णवेजीब्रह्मादिकांतत्वतां ॥ शेष
श्रमलागुणवर्णितां ॥शिवस्वामीचे ॥ ५२ ॥तेथेंमीमतिमंदकेवळदीन ॥कायवदूंजीशिवा
चेगुण ॥जयाग्रंथींत्रिनयन ॥अखंडवसेपैं ॥ ५३ ॥ अध्यायफळश्रुतीचेंनिरूपण॥ संक
लितकेलेंश्रोतयांलागून॥ स्वहितार्थकराश्रवण ॥महापातकेंनासती ॥ ५४॥ आतांफळश्रुति

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

लगेधूम्रपानसाधन ॥ त्यासिनलगेवेदपठन ॥ त्यासिनलगेशास्त्रश्रवण ॥ तपसाधननलगेत्यासी ॥ ७१
॥ त्यासिजावेंनलगेएकांतीं ॥ त्यासिपाहणेंनलगेआत्मस्थिती ॥ त्यासिआसनमुद्राहीनलगती ॥ ए-
कभक्तीवांचूनी ॥ ७२ ॥ मुक्तीस्तवसकळसाधनें ॥ मुक्तीस्तवतीर्थेंभ्रमणें ॥ मुक्तीस्तवयोगाभ्या
सकरणें ॥ प्राणियांसी ॥ ७३ ॥ मुक्तीस्तवदेहदमिती ॥ मुक्तीस्तवसाधनेंकरिती ॥ मुक्तीस्तवब्र-
ह्मचर्यआचरती ॥ नारीनरपें ॥ ७४ ॥ मुक्तीस्तवसन्यासघेती ॥ मुक्तीस्तवआश्रमस्थिती ॥ मुक्ती
स्तवएकांतसेविती ॥ ज्ञातेनर ॥ २७५ ॥ मुक्तीस्तवनानायत्न ॥ प्राणीकरितीनानाविधजाण
॥ तेमुक्तीपंचानन ॥ ग्रंथश्रवणेंदेतअसे ॥ ७६ ॥ ऐसेंग्रंथराजमहिमान ॥ ज्याग्रंथींशिवशक्तिस
हवर्तमान ॥ निर्वाणफळदेतसेजाण ॥ श्रवणावारीं ॥ ७७ ॥ तरीत्याफळश्रुतीचाहोतांपाठी ॥
शिवदेतसेभुक्तिमुक्ति ॥ जेंजेंइच्छीतेंतेंप्राप्ती ॥ उमाकांतप्रसादें ॥ ७८ ॥ ह्यणोनिनवदवेमहि
मान ॥ अपारग्रंथसामर्थ्यगहन ॥ एकचिश्लोकाचामहिमापूर्ण ॥ नवदवेब्रह्मादिकां ॥ ७९ ॥
एकश्लोकश्रवणकरून ॥ होतसेकैलासपदपावन ॥ अनंतयुगेंशिवभुवन ॥ प्राप्तहोयतयासी ॥
॥ २८० ॥ ऐसेंशिवस्वामीचेंवचन ॥ ग्रंथासिवरदींधलापूर्ण ॥ श्रवणपठनेंपापदारुण ॥ पराभूत
होतसे ॥ ८१ ॥ ग्रंथाचाएकचिश्लोकपठन ॥ जेणेंकेलाभावधरून ॥ त्यासिकृतांतअनन्यशर
ण ॥ येतसेपैं ॥ ८२ ॥ तेणेंकोटिएकप्रासादमंदिरें ॥ ध्वजछत्रेंसिमनोहरें ॥ निर्मिलींबहुतप्र
भारत्नाकारें ॥ शिवस्वामीकारणेंपैं ॥ ८३ ॥ तयासिसहस्रजन्मप्रयागस्नान ॥ कींपंचसहस्र-
गयावर्जन ॥ कींअसंख्यवरुषेंविश्वनाथतेण ॥ पूजिलासुवर्णकमळीं ॥ ८४ ॥ त्यासिजन्मोज
न्मींअविमुक्तिस्थळीं ॥ त्रिकाळस्नानमणिकर्णिकाजळीं ॥ नित्यरूपींचंद्रमौळी ॥ भागीरथी
तोयें ॥ ८५ ॥ तेणेंदशकोटिगोदानें ॥ रविग्रहणींअर्पिलींविप्रांकारणें ॥ कींसहस्रएकतुरंग
मदानें ॥ दीधलींसत्पात्रीं ॥ ८६ ॥ कींकोटिभोजनब्राह्मणांसी ॥ दीधलेंतयानेंवाराणशीसी ॥ दि

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कारवं व्यांबरवस्त्रेंपरिधानासी ॥ दीधलींतेणेंदीनजनांतें ॥ ८७ ॥ तेणेंशतकावडीमणिकर्णिकाजळेंसीं ॥ रा अ०
॥१०॥ मेश्वरपूजिलासद्भावेंसी ॥ कींदिव्यकमळीं मल्लिकार्जुनासी ॥ पूजिलेंपुण्यमासीं ॥ ८८ ॥ कींमाघव ॥८०॥
द्यचतुर्दशीकारणें ॥ शिवरात्रीसकेलींजागरणें ॥ कीं द्वादशलिंगींपूजनें ॥ केलींतेणेंनिशिदिनीं ॥
॥ ८९ ॥ तेणेंदुष्काळींअन्नछत्रेंघातलीं ॥ शीतकाळींवस्त्रेंअर्पिलीं ॥ उष्णकाळींउदकेंपाजिलीं ॥
सुगंधमनोहरें ॥ २९० ॥ कींतोलक्षाग्निप्रलयींसावधान ॥ कोटिकन्यादानींप्रवीण ॥ तेणेंपृथ्वीचेंदी
धलेंदान ॥ द्विजोत्तमांसी ॥ ९१ ॥ तेणेंकोटिएकव्रतबंध ॥ विधियुक्तकेलेशुद्ध ॥ कींलक्षएकअ
श्वमेध ॥ केलेतेणेंपैं ॥ ९२ ॥ तेणेंसालंकृतभद्रजाती ॥ लक्षएकअर्पिलेशाळिग्रहणाप्रती ॥ कींप
रोपकारांशरीरसंपत्ती ॥ वेंचिलीपुण्यस्थळीं ॥ ९३ ॥ कींकोटिएकग्रहदानें ॥ अर्पिलींसत्पात्रांका
रणें ॥ अन्नवस्त्रांसहवर्तमानतेणें ॥ जन्मपर्यंत ॥ ९४ ॥ तेणेंनंदीसारिखींवृहनें ॥ अर्पिलींशिवा
कारणें ॥ कींकामधेनूचींगोठणें ॥ जन्मपर्यंतदीधलीं ॥ ९५ ॥ तेणेंकोटिएकबंदीमोचनें ॥ केलींब
हुतदेऊनिधनें ॥ कींसवत्सगोदानें ॥ दीधलींविप्रांदशलक्ष ॥ ९६ ॥ तेणेंसहस्त्रभारसुवर्ण ॥ अर्पि
लेंप्रयागतीर्थीपूर्ण ॥ लक्षकाशीयात्रेचेंदर्शन ॥ दीधलेंदानसंकल्पीं ॥ ९७ ॥ तेणेंकाशीयात्रेकरू
केलेतृप्त ॥ द्रव्यशुक्तिदेऊनिनेलेसमस्त ॥ दानेंगौरविलींकल्पांत ॥ संख्यानतुळे ॥ ९८ ॥ त्यासी
चसकळधर्मघडला ॥ त्यासीचपूर्णबोधजाहला ॥ त्यासीचगुरुएकांतघडला ॥ त्यासिआवडेले
सापैं ॥ ९९ ॥ तोशिवाचाआप्तजाहला ॥ तोचिपैलपारउतरला ॥ तोवाचासिद्धहीजाहला ॥ शिव
कृपेकरूनियां ॥ ३०० ॥ त्याचियासामर्थ्याचीगणना ॥ कवणकरीलजाणा ॥ त्यासिसूर्यसुलय
ललोकांगणां ॥ आपणस्वांगेंसी ॥ १ ॥ त्याचीब्रह्मादिदेवस्तुतिगाती ॥ त्याशिअष्टहीदिग्पालवंदिती ॥१०॥
॥ सकळसुरवरशरणयेती ॥ कांपेचित्तींयमरावो ॥ २ ॥ त्याचियासामर्थ्यासितुळे ॥ नपुरतीचतिं
न्हींताळें ॥ मायातुकिजेजाश्वनीळें ॥ सद्भावपूर्णदेखोनी ॥ ३ ॥ तोचिसकळधर्मआचरला ॥ त्या

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सीचसकळयोगसाधला ॥ तेणेंचि काळ आंकणा घातला ॥ शिवनामघोषें करूनी ॥ ३०४ ॥ तोज्याक-
डे कृपादृष्टींपाहे ॥ तोतत्काळचिब्रह्महोय ॥ मस्तकींहस्तठेऊनियांपाहे ॥ कैलासींप्रतिष्ठाकरी ॥ ५ ॥
तपांतीकैलासासिजावें ॥ तरीतेणेंकैलासकेलेंयेथेंआघवें ॥ ऐसेंशिवनामघोषगौरवें ॥ उद्धरिलेंवि
श्व ॥ ६ ॥ तोतपेंसूर्याहूनितेजाळ ॥ अस्तनवाहे तोकिंदाळ ॥ वर्षतांमेघहोयनिश्चळ ॥ परीहासदापु
रता ॥ ७ ॥ स्वामीह्मणेअगस्तिनिर्मळा ॥ उपमानपुरेदिङ्मंडळा ॥ तोचिस्वयेंजाण्वनीळा ॥ समानतु
के ॥ ८ ॥ एकश्लोकाचीफळश्रुती ॥ इतुकाविस्तारजाहलायंथीं ॥ मगयाग्रंथाचीफळश्रुती ॥ कोण
सुमतीवदेल ॥ ९ ॥ ग्रंथमहिमाअगाधजाणा ॥ कितीवदूंमीपुनःपुन्हा ॥ जयाग्रंथींपंचानना ॥ शक्ती
सहवर्तमानअसणें ॥ ३१० ॥ ह्मणोनिभावेंकराग्रंथश्रवण ॥ आकल्पपापहोयदहन ॥ नारीनरशू
द्रब्राह्मण ॥ श्रवणेंमुक्तीसर्वांसी ॥ ११ ॥ ऐकतांमहापापीदुर्जन ॥ श्रद्धायुक्तकरितांश्रवण ॥
तोउद्धरेगुरुकृपेंकरून ॥ येथेंसंशयनाहीं ॥ १२ ॥ दुरात्मेनष्टपापीदुर्जन ॥ हामिथ्यामानितीग्रं
थकथन ॥ त्यांचीजिह्वाझडोनिपूर्ण ॥ कुष्ठपणपावेल ॥ १३ ॥ कृमीहोतीलसर्वांगासी ॥ सुखा
वलोकनेंप्राणनाशी ॥ सकळदोषांचीमिरासी ॥ होऊनिठाके ॥ १४ ॥ त्यासिचंद्रार्कवरीनरक
प्रासी ॥ यमगणत्यासिबहुजाचिती ॥ तप्तभूमीसलोळविती ॥ सांडसेंतोडितीमांसत्याचें ॥ १५ ॥
असोतयाचेजाचणीसी ॥ संवत्सरनपुरे बोलण्यासी ॥ वदतांशीणवाचेसी ॥ होतसेबहुत ॥ १६ ॥
ह्मणोनिभावार्थेंचिकीजेश्रवण ॥ तरीआकल्पदोषांचेंहोयदहन ॥ हेंसत्यत्रिवारजाण ॥ अगस्तिमु
नी ॥ १७ ॥ सत्पात्रासिदेऊनिदान ॥ श्रद्धायुक्तकीजेश्रवण ॥ तरीशतएककाशीयात्रांचेंपुण्य ॥ घ-
डेतयासी ॥ १८ ॥ हेंमागेंतुह्मांश्रवण ॥ ग्रंथमहात्म्यींकेलेंनिरूपण ॥ पुनःपुन्हात्रिवारपूर्ण ॥ क
ळवळीनिबोलिलों ॥ १९ ॥ हेकथामुक्तिदायिनी ॥ सकळदुःखनिवारिणी ॥ सकळदोषदहनी ॥
अंतींइच्छिलेंफळप्राप्तहोय ॥ ३२० ॥ स्वार्थास्तवश्रवणकराग्रंथ ॥ ग्रंथमिषेंपावेलविश्वनाथ ॥ पुत्र-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

प्रजासकळमनोरथ ॥ पुरवील विश्वनाथपैं ॥ २१ ॥ भुक्तिमुक्तिदानींसमर्थ ॥ देतसे शिवअनाथनाथ ॥
याग्रंथासारिखासमर्थ ॥ नाहीं नाहीं भूमंडळीं ॥ २२ ॥ श्रवणासाठीं भुक्तिमुक्ती ॥ सकळपदार्थअर्थप्रा
प्ती ॥ दुःखदैन्यें पराभवती ॥ निमिषार्धें ॥ २३ ॥ हेचि कथाशिवें भवानीसी ॥ सांगीतली अतिआदरेंसी ॥
तेचि कथाव्यासऋषी ॥ निरूपी वैशंपायना ॥ २४ ॥ तेचि कथाशिवनंदन ॥ वदला अगस्तिमुनीलागून
॥ श्रवणपठनें महादारुण ॥ पापें सर्वही भस्म होती ॥ ३२५ ॥ तंव अगस्ति ह्मणे स्वामिनाथा ॥ परमसुखी
जाहलों तंव वचनामृता ॥ हरली तापत्रयव्यथा ॥ तुमचे चरणप्रसादें ॥ २६ ॥ अगस्ति पावला समाधा
न ॥ लोपामुद्रा आनंदघन ॥ कळसा आलें ग्रंथनिरूपण ॥ विश्वनायकपैंसी ॥ २७ ॥ सोपें सुग
म बहुसार ॥ पाहतां तरी भुक्तिमुक्तींचें मंदिर ॥ येथींचा अर्थान्वयचतुर ॥ बहुश्रुत जाणती ॥ २८
॥ संस्कृत ह्मणिजे कूपनीर ॥ त्यासि पाहिजे पात्रदोर ॥ महाराष्ट्र ह्मणिजे सरितानीर ॥ तृषावंतीं
सेविजे ॥ २९ ॥ सुगमकथामार्ग मोकळा ॥ नारीनरस्त्रियाअबळा ॥ श्रवणेंचि पाविजे जांश्वनीळा
॥ श्रद्धापूर्वकपैं ॥ ३३० ॥ ह्मणोनि महाराष्ट्र कथा जगतारिणी ॥ अंतरीं धरा बहुयत्नीं ॥ तोचि-
जीवन्मुक्त त्रिभुवनीं ॥ कथाश्रद्धाळू जो ॥ ३१ ॥ काशीखंडकथा जगतारिणी ॥ अंतरीं धरावी स
र्वजनीं ॥ तेचि जीवन्मुक्त त्रिभुवनीं ॥ कथाश्रद्धाळू जे ॥ ३२ ॥ काशीखंडकथा महापवित्र ॥
जो वदे तयाचें धन्य वक्त्र ॥ धन्य एक त्याचें श्रोत्र ॥ कथाचरित्र परिसतां ॥ ३३ ॥ दोनचि अक्षरें
काशी काशी ॥ जपतां नाश होय पातकांसी ॥ गुरुमुखें आणोनि मानसी ॥ अविमुक्तीं वास की
जे ॥ ३४ ॥ मागें शिलीम राजा भूपती होता ॥ तेणें पृथ्वीजनासि मार्ग केला मुक्ता ॥ ह्मणोनि सर्वज
न पूजिती भवानीकांता ॥ राजा रंक एक श्रद्धा ॥ ३५ ॥ आतां मस्तक ठेऊनि गुरुचरणीं ॥ ग्रंथस
मास करी आज्ञा मागोनी ॥ गुरुवांचूनि त्रिभुवनीं ॥ समर्थ कोणी असेना ॥ ३६ ॥ ऐशी गुरु
आज्ञा घेऊनि पूर्ण ॥ श्रोतयांसाष्टांग वंदन ॥ जें जें देखाल ग्रंथीं न्यून ॥ तें तें पूर्ण तुह्मीं कीजे ॥ ३७

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥इति काशीखंडं समाप्तं॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

शिवदासगोमाबद्धांजळी ॥ मस्तकठेवूनिक्षितिमंडळीं ॥ संतपाउलेंवंदोनिमोळीं ॥ श्रोतयांससमर्थी ॥ ३३८ ॥ इतिश्रीस्कंदपुराणेकाशीखंडेउत्तरार्धेग्रंथमाहात्म्यवर्णनंनामअशीतितमोध्यायः ॥ ८० ॥ पूर्वोत्तरार्धसहितःकाशीखंडग्रंथः समाप्तः ॥ श्रीसांबसदाशिवार्पणमस्तु ॥ ॥

॥ अध्याय ॥ ८० ॥ ओव्या ॥ ३३८ ॥ ॥ हें पुस्तक मुम्बईंत सखाराम भिकुशेट खातु यांयीं शिलायंत्रछापखान्यात छापून प्रसिद्ध केलें. शके १८०३ वृषनामसंवत्सरे ज्येष्ठकृष्ण ॥ ५ ॥ सन १८८१ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri